।। श्री स्वामी समर्थाय नमः।।

# ।। श्री नवनाथ नवशती ।।

वैद्य गणेश लक्ष्मणराव शिंदे
(B.A.M.S.)

मनकर्णिका पब्लिकेशन

।। श्री ।।

# ।। प्रस्तावना ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री नवनाथाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

अरे संसार संसार। न लागे कधी याचा पार।
संसारी बुडालो आम्ही अपार। भोगतो दुःखे जीवनी अनिवार।
घड्याळामागे धावतो अन्नासाठी। वासनांची भूक क्षमेना कशी ती।
वासना वाढल्या विसरलो धर्म नेम। अंतरात आमुच्या नांदे विषय प्रेम।
परी न लाभे सुख परम श्रमलो। पदोपदी कसे दुःखाने गांजलो।
कलीयुगाचा प्रभाव न कळे आम्हासी। अस्वस्थता परम आली चित्तासी।
स्वामी माऊलींना येई कळवळा। लेकुरे बुडती तीज पाहवेना।
देऊन मग लेखणी स्वामीभक्त या गणेशाहस्ती। निर्मिली स्वामींनी ही श्री नवनाथ नवशती।।

आजचे युग संगणक युग मानले जाते. या युगात विज्ञानाच्या वरदानाने लाभलेल्या अनेक सुख सोईंचा गजबजाट वाढला आणि ती मिळविण्यासाठी मनुष्य अपार श्रमु लागला. मनुष्य जीवनाचा अर्थ विसरला, तात्पर्य विसरला अन् सुखाच्या साधनांमध्येच तो स्वत:चे सुख शोधू लागला. परमात्म्याने आखून दिलेल्या धर्म,अर्थ,काम,मोक्ष या चार पुरुषार्थातील धर्म अन् मोक्ष यांचा विसर पडला अन् अर्थ, कामाच्या मागे धावणारा मनुष्य कलीच्या चक्रात भोवंडून गेला.

त्या बिचाऱ्या मनुष्याला स्वत:चा रस्ता मिळेनासा झाला. आज कलिचा प्रभाव वाढतच चालल्याचे आपल्याला पदोपदी जाणवते. परिणाम काय ? तर मनुष्य मात्र सुखसाधनांच्या भोवती फिरण्याच्या नादात पदोपदी दु:खी मात्र होऊ लागला. लक्षात घ्या मनुष्य देह दुर्लभ! मनुष्य जन्म दुर्लभ! या जीवनात चारही पुरुषार्थांचे यथायोग्य पालन करुन मोक्षाची वाट मोकळी करुन घेणे आवश्यक!

त्यातच हे कलियुग असल्यामुळे मानवाचे आयुष्यही अतिशय अल्प! तरी ही एक गोष्ट मात्र विचारात घेणे आवश्यक की याच कलीयुगात कठोर तपसाधनेचे फळ केवळ ‘नामजपाने’ मिळविणे शक्य आहे. या युगात यज्ञ संकल्पना कर्म यज्ञातून साकारता येते. त्यासाठी निष्काम कर्माची वाट मोकळी

आहे. ऐहीक जीवनात राहून त्याचा लाभ घेता घेता परमार्थाची वाट केवळ 'नामस्मरणाने' चोखाळता येते. क्रीयमाण कर्माचे फळ निष्काम कर्मामुळे भोगावे लागत नाही अन् भक्तिमार्गाने, ज्ञानमार्गाने संचित लयाला नेता येते. त्यासाठी ज्ञानमूलक भक्तिचा प्रचार अन् प्रसार करण्यासाठी ज्ञानेश्वर, तुकारामादि संतांचा अवतार झाला त्या जगत्पालक भगवान श्रीकृष्णाच्या आज्ञेने! त्याच्याच आज्ञेने या कलीयुगात मानवांचे रक्षण करुन धर्मस्थापनेसाठी अवतरले नवऋषि नवनाथांच्या रुपातून! या नवनाथांच्या अवतार संगतीचे आणि त्यांच्या पराक्रमाचे आणि कार्याचे वर्णन 'श्री नवनाथ भक्तिसार' या ग्रंथात विस्तीर्णपणे करण्यात आले आहे. याच्या पठनाने रोगभोगादिंचे शमन होऊन परमशांतीचा लाभ होऊन मानवास सुखसमृद्धीचे जीवन लाभते. परंतु आज १० ते १२ तास काम केल्यानंतर फारसा वेळ आपल्या हाती लागत नाही. म्हणूनच श्री स्वामी समर्थांनी आपल्या कृपाहस्ते स्पर्श करुन नवनाथांचे विस्तीर्ण चरित्र केवळ नऊ अध्याय, नऊशे ओव्यात आणून आपल्या भक्तजनांना आपल्या कृपाशीर्वादाचा लाभ घडविला आहे या 'श्री नवनाथ नवशती' या गंथरुपातून! तो साकारण्याची कृपा या सिंधू लक्ष्मण सुत गणेशावर केली अन् ही गंथ निर्मिती झाली. ही सुवर्ण संधी मला स्वामीभक्त गणेशास लाभली हा माझ्यावरील स्वामी समर्थांचा कृपावरदहस्त! अशीच स्वामीकृपा हा ग्रंथ पठन

करणाऱ्या,श्रवण करणाऱ्या प्रत्येकावर होवो आणि सर्वांना स्वामींच्या कृपादृष्टीचा प्रसाद अखंड लाभो अशी स्वामी चरणी विनम्र विनवणी करतो.

या ग्रंथात नवनाथांची कथा आली आहे. हे नवनाथ हे नऊ नारायणांचे अवतार आहेत. द्वापारयुग संपल्यानंतर कलीचा प्रभाव विलक्षण वाढत चाललेला पाहून जगत्पालक भगवान श्रीकृष्णांनी नऊ नारायणांना बोलावून अवतार धारण करण्याची आज्ञा दिली. ह्या नऊ नारायणांचे अवतार म्हणजेच हे नऊ नाथ - नवनाथ! यांना कलीयुगात धर्मरक्षण करुन मानवी जीवास रोगशापादि भयातून मुक्त करुन धर्माचा मंगल प्रदीप तेवता ठेवण्याची आज्ञा दिली.

या नवनाथांचा अवतार त्यांचे तपसामर्थ्य, त्यांची मंत्र, अस्त्रशक्ती अन् त्यांनी मिळविलेली वरदहस्त संगती याचे विस्तृत वर्णन थोडक्यात कमी ओव्यात सांगण्याचा प्रयत्न या ग्रंथात करण्यात आला आहे. संक्षिप्त करण्याच्या नादात मूळ अर्थास छेद जाणर नाही याची पूर्ण काळजी घेण्यात आली आहे. त्यामुळे या 'श्री नवनाथ नवशती' ग्रंथाचे पठन करुन नवनाथांचा वरदहस्त अन् स्वामीं माऊलींचा कृपाप्रसाद प्राप्त करुन घेता येईल.

सर्वात महत्वाची गोष्ट इथे आवर्जुन नमूद करीत आहे की कलीयुगाच्या प्रभावाने जेव्हा धर्म

रक्षणचा प्रश्न निर्माण झाला तेव्हा सर्वजगत्पालक भगवान श्रीकृष्णांनी नऊ नारायणांना आज्ञा दिली आणि हे नऊ नारायण म्हणजेच

कविनारायण - मच्छिंद्रनाथ रुपातून, हरिनारायण - गोरक्षनाथ रुपातून

अंतरिक्षनारायण- जालंधरनाथ रुपातून, प्रबुध्दनारायण - कानिफनाथ रुपातून

पिप्पलायन नारायण - चर्पटीनाथ रुपातून, आविर्होत्र नारायण - नागनाथ रुपातून

द्रुमिल नारायण - भर्तरिनाथ रुपातून, करभाजन नारायण - गहिनीनाथ रुपातून

चमस नारायण - रेवण रुपातून

अशा प्रकारे या सर्वांनी पृथ्वीतलावर अवतार घेतला आहे. कृष्णद्वैपायन व्यास प्रणीत 'श्रीमद् भागवतात' याचा उल्लेख आहे. म्हणजेच कृष्णद्वैपायन व्यास ऋषिंचा ही कृपा वरदहस्त या 'श्री नवनाथ भक्तिसार' ग्रंथास आहे. कृष्णद्वैपायन व्यास हे भगवान विष्णूंचे ज्ञानावतार आहेत. या सर्व नाथांना अत्रिसुत दत्तात्रेयांकडून विविध अस्त्रविद्या, मंत्र दीक्षा प्राप्त झाली. प्रत्यक्ष भगवान शंकरांनी वारंवार त्यांना वरदहस्त दिला. प्रत्यक्ष विष्णूने स्वतः प्रकट होऊन त्यांना आशीर्वाद दिला. हिंगुला देवीने मच्छिद्रास स्पर्शास्त्र, भिन्नास्त्र प्रदान केले. सर्व देवता, सर्व भूतपती, दिक्पाळ, आदित्य,

मारुती हे सर्व जण नाथांच्या विद्येस वरदहस्त देते झाले अन् या नाथांसाठी स्वत: कार्यार्थी झाले. ब्रह्मदेवाने त्यांचे हे अलौकिक सामर्थ्य पाहिल्यावर त्यांच्या कडून ते मिळविण्यासाठी त्याने नऊ नाथांना अमरलोकी पाचारण केले. या नऊ नाथांनी अनेक वर्षे म्हणजे शके सतराशे दहा पर्यंत सर्वत्र तीर्थयात्रा केल्या आणि नंतर सूक्ष्म लोकातच कार्य करायचे ठरवून विविध स्थानी ते समाधिस्थ झाले. सूक्ष्म रुपातून त्यांच्या कृपा आशीर्वादाची प्रचिती आजही अनुभवता येते. भक्त कल्याणवत्सल श्री स्वामी समर्थ आजही सूक्ष्म रुपाने आपल्या भक्तांचा मातेच्या ममतेने सांभाळ करीत आहेत. म्हणूनच त्यांनी स्वत:च कार्यप्रेरणा देऊन हा 'श्री नवनाथ नवशती' ग्रंथ स्वामीभक्त वैद्य गणेश लक्ष्मण शिंदे यांच्या हाती लेखणी देऊन साकारला.

या ग्रंथाच्या पठनाने अन् श्रवणाने इतकेच काय पण या ग्रंथाचे जतन करुन नवनाथांचे स्मरण केल्यानेही नवनाथांच्या कृपा आशिर्वादाचा अन् स्वामी माऊलींच्या वरदहस्ताचा लाभ सर्व स्वामीभक्तांना होऊ दे अशी परमदयाळू श्री स्वामी समर्थांच्या चरणी प्रार्थना करुन हा ग्रंथ भक्ताहाती सोपवीत आहे.

मायेचा या खेळ चालला असे भयंकर। होतो मानव दीन दु:खी पीडीत लाचार।
परी स्थूलातच चालतसे तिचा हा व्यापार। सूक्ष्मातून नवनाथ हे करती संचार।
स्वामी माऊली आहेत स्मरणगामी। नवनाथ होती कार्यार्थी त्यांच्या नामस्मरणी।
रोगभयादि भूतप्रेतांच्या भयंकर खेळावरती। ग्रंथ पठन करता होईल मात त्यावरती।
सुटून मायेचा जंजाळ पाशातून होईल मुक्त। स्वामी म्हणती आहे येथे माझाच वरदहस्त।

।।श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।।

।। श्री ।।

# ।।मनोगत।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री नवनाथाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

जाहला संपूर्ण ग्रंथ नवनाथ नवशती ।
स्वामी माऊलींनी करविले कार्य या गणेशाहस्ती ।
राहू दे अशीच कृपा सदा या दासावरती ।
आहे अशीच स्वामीचरणी माझी नम्र विनंती ।

आज हा ग्रंथ भक्ताहाती सोपविताना आनंदाने नेत्र दाटून येतात, स्वामींची आपल्यावरची परमकृपादृष्टी पाहून अंतःकरण हेलावून जाते अन् मनास अलौकिक अशा आनंदाची प्राप्ती होते.

स्वामी माऊलींच्या कृपाशीर्वादाने एक फूटावरचे दिसू लागले आणि ज्ञाननेत्र विकसित होत गेले अन् स्वामींच्या असीम सामर्थ्याची जाणीव या पामर दासास होऊ लागली.अर्थातच ही स्वामी कृपा

केवळ आपल्यासाठी नसून ती आपल्यावर होण्यास असंख्य स्वामी भक्तांची निष्काम स्वामी भक्तीच कारणीभूत असून मी स्वत: केवळ एक साधन आहे याची यथायोग्य जाणीव मला मनापासून आहे.आज जे कार्य स्वामी माझ्या हातून घडवीत आहेत ते असेच अविरत पणे घडत राहू दे अशीच स्वामींच्या चरणाशी नम्र विनंती आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून तसा दैवी संकल्पच असावा म्हणूनच स्वामींनी अनेक प्रतिकूल गोष्टींवर मात करुन नेटाने कार्य पुढे नेण्याचे सामर्थ्य या स्वामीभक्त गणेशास दिले आणि त्यामुळेच तसेच स्वामीभक्तांच्या मनातील निर्व्याज स्वामीभक्ती मुळे चिंचवड येथे शक्तीपीठाची स्थापना स्वामी जयंतीच्या दिवशी झाली. मन कृतार्थ झाले अन् या आदिमायेने किती मोठे कार्य आपल्या हातून घडविले याची जाणीव होताच स्वामीभक्तीने अंत:करणास गहीवर आला.

आज या शक्तीपीठाच्या स्थापनेमुळे आपला जास्तीत जास्त वेळ स्वामीकार्यासाठी वेचता येईल म्हणून अतिशय आनंद ही झाला. ‘जिथे स्वामी पाय तिथे न्यून काय’ याची प्रचिती नित्यनेमे दररोज आम्ही अनुभवत आहोत.

हे कार्य करीत असतानाच स्वामींनी आपला वरदहस्त देऊन ‘श्री स्वामी समर्थ अमृतसार नवशती’

हा ग्रंथ पूर्ण करवून घेतला अणि आता हा ‘श्री नवनाथ नवशती’ ग्रंथ साकार होत आहे. खरेच स्वामींची कृपा झाली की भक्तास काय बरे अशक्य आहे? ‘अशक्य ते शक्य’ घडविणारी माय अन् तिचा वरदहस्त असल्यावर नवनाथांचे चरित्र नवशतीत न अवतरते तरच नवल! परमेश्वरी कृपा झाल्यावर ‘मूकं करोति वाचालम् पंगुं लंघयते गिरीम् ! यत्कृपा तमहं वन्दे परमानन्द माधवम्’ तसेच ‘परमानंद परमगुरुम्’ म्हणणे अगदी सार्थ ठरते.

असं म्हणतात परमेश्वराच्या प्रेमाचा महिमा काय वर्णावा? आणि इथे सौदा तर किती फायद्याचा! आज असा काळ आला आहे जिथे स्वार्थाशिवाय काहीच नाही. तिथे हा विचार फार महत्त्वाचा ठरतो. अहो जिथे मोठा स्वार्थ अगदी कमी श्रमात साधता येतो ती ही वाट फार महत्त्वाची नाही का ? इथे फक्त परम भक्तीयुक्त, अंत:करण पूर्वक नामस्मरण करता ईश्वरी कृपेच्या धारा बरसू लागतात अन् जीवनच संपूर्ण आनंदमय होते. माऊलीला सर्वच लेकरे सारखी म्हणूनच आजच्या परिस्थितीत अगदी संसार सागरात पूर्णपणे बुडालेल्यांना सुद्धा भवसागर तारुन नेण्याचे सामर्थ्य असलेला हा ग्रंथ गुरुमाऊलींनी या स्वामीभक्त सिंधुलक्ष्मण सुत गणेशाच्या हातून साकारला. आज अतिशय कृतकृत्यतेने स्वामी चरणी साष्टांग वंदन करुन ‘आपल्या मायेची पाखर सर्व स्वामीभक्तांना सदैव लाभू दे’ अशी

स्वामी माऊलींच्या चरणी नम्र विनंती करुन हा ग्रंथ प्रथम स्वामी चरणी समर्पित करुन त्यांच्याच आज्ञेने समस्त भक्तांहाती सोपवतो.

अर्थातच या ग्रंथनिर्मितीची प्रेरणा मला लाभली असली तरी हा साकारताना स्वामीभक्तांच्या सहकार्याची आवश्यकता होतीच त्याविना हा ग्रंथ झाला नसता. त्यांची सेवा स्वामीचरणी ऋजु होऊ दे अशी नम्र विनंती. स्वामीभक्त श्री गजानन एकतारे अन् त्यांची पत्नी सौ.अर्चना एकतारे यांनी हा ग्रंथ संगणकीकृत करुन फार महत्त्वाचे सहकार्य दिले आहे. 'मनकर्णिका पब्लिकेशनचे' प्रकाशक स्वामीभक्त श्री गिरीश दगडूलाल गांधी यांनी या ग्रंथाच्या प्रती मुद्रित करुन दिल्या. स्वामीभक्त सौ.प्रियंवदा अरविंद जोशी यांनी लेखनास सहाय्य केले.

या सर्वांना स्वामी कृपाशीर्वादाचा लाभ होवो. नवनाथांची कृपा त्यांच्यावर निरंतर असू दे. तसेच आम्हा सर्वांच्याच अंत:करणात स्वामीभक्तीचे अृमत सदैव असो अशी श्री स्वामी समर्थांच्या चरणी नम्र विनंती करतो.

सर्व स्वामी भक्तांसाठी हया 'श्री नवनाथ नवशती ' या अमृत स्वरुपी ग्रंथातून सदैव स्वामीकृपेचा अन् नवनाथ कृपेचा अमृत झरा अक्षयपणे वाहत राहू दे अशी स्वामी माऊलींच्या चरणी नम्र विंनती

करुन हा ग्रंथ श्री श्री श्री स्वामी चरणी अर्पण करतो.

।श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

वैद्य गणेश लक्ष्मणराव शिंदे

## अनुक्रमणिका


| अध्याय | अध्यायाचे नाव | पृष्ठ |
|---|---|---|
| पहिला | कायाअंतरीक्षा अध्याय | |
| दुसरा | रोगादिबाधा मोचनाध्याय | |
| तिसरा | भूताधी/भूतादी नाशनाध्याय | |
| चवथा | तस्करादि संकटमोचनाध्याय | |
| पाचवा | रीपू क्षालनाध्याय | |
| सहावा | पितृदोष निवारणाध्याय | |
| सातवा | अंतरबहीर्मल शोधनाध्याय | |
| आठवा | जारणादिपरयंत्रादि निवारणाध्याय | |
| नववा | राजाधीपत्यकराध्याय | |

।। श्री ।।

## ।। अध्याय पहिला ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री नवनाथाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

प्रारंभी वंदन तुज विघ्नहर्त्या। सकलसृष्टी साम्राज्य कर्त्या। संपूर्ण विश्वाच्या करण कारण कर्त्या। नमितो तुज मी अत्यादरे।।१।। आता नमितो सरस्वती वीणापाणी। सकल कला विद्यांची जननी। अखंड वाहू देत ही लेखणी। करण्या वर्णन नवनाथांचे।।२।। वंदितो आता गुरु स्वामी अचल। जे प्रत्यक्ष परमात्माच केवल। तयांच्या कृपा आशीर्वादे सकल। ज्ञान होई शब्दांकित।।३।। जे प्रत्यक्ष दत्तगुरु महाराज। अक्कलकोट स्वामिराज। फेडूनी अज्ञान जडमतिचा भार। केले लिहिते या पामरा।।४।। आता वंदू माता पिता। ह्या जीवाचे प्रत्यक्ष उद्धारकर्ता। आशीर्वच त्यांचे लाभता। चिंता कसची या गणेशा।।५।। वंदितो प्रथम थोर कविमणि। ज्ञानेश्वर तुकाराम रामदासादि। ज्यांच्या कृपे स्फुरे निःशब्दा वाणी। साकारावा ग्रंथ मजहस्ती।।६।। नमन आता श्रोतृवृंदा। सकल ज्ञानधी

विद्यासागरा। आशीर्वचने आपुल्या करी पूर्णा। कौतुक हे ग्रंथ निर्मिण्याचे।।७।। जेव्हा धर्मा येई बहु ग्लानी। वाढु लागे अधर्म या अवनी। दुष्टा निर्दालून तेव्हा साधु रक्षणी। घेती अवतार भगवान विष्णु।।८।। परि असे हे कार्य धर्म रक्षणाचे। त्यासाठी प्रत्यक्ष धर्म शिक्षणाचे। सहाय्य हवे देवता योगी सिध्दांचे। करिती योजना विष्णुराज।।९।। द्वापारानंतर असे कलीची गती। माजेल अधर्माचे साम्राज्य जगती। रक्षुन धर्मा मानव कल्याणासाठी। आखिती योजना श्रीकृष्ण।।१०।। आज्ञा देती ते नऊ नारायणांप्रती। घ्यावा अवतार धरणी वरती। देऊन धर्माचे रक्षण सर्वांप्रती। मोक्षमार्गी जना चालवावे।।११।। यादव सभेमाजी ऋषी पुसती। सांगावी योजना आम्हा प्रती। केव्हा कुठे कोणी व्हावे प्रकटी। कृष्णदेव त्या सांगती।।१२।। कविने व्हावे मच्छिंद्र,हरि-गोरक्ष,अंतरिक्ष-जालंधर। प्रबुध-कानिफ,पिप्पलायन - चर्पटी,नागनाथ-आविर्होत्र। द्रुमिल-भर्तरि,गहिनी होई करभाजन। चमस-रेवण असे प्रकटावे भूतली।।१३।। श्रीकृष्ण-ज्ञानदेव, शंकर-निवृत्ती। ब्रह्म-सोपान,योगमाया-मुक्ताबाई। उद्धव-नामदेव रामदास-मारुती। वाल्मिकी-तुलसीदास,जांबवान-नरहरी।।१४।। शुक-कबीर,पुंडलीक-बलराम। कुब्जा प्रकटेल जनाबाई होऊन। विविध भक्त सिध्द घेऊन जन्म। रक्षतील धर्म, मोक्ष,भक्ती, ज्ञान,योग।।१५।। ही सर्व कथा असे भक्तिकथामृतात। वदते झाले प्रत्यक्ष जगन्नाथ। आता नवनारायण

झाले व्यक्त। कथा त्याची ऐकावी।।१६।। श्री कैलास पर्वती अपर्णा माऊली। अनुग्रह शिवाकडे त्या मागती। म्हणती पवित्र मंत्र द्यावा मजलागी। जो आपण नित्य जप करिता।।१७।। शिव म्हणती उपदेशीन मंत्र सकळीक। परी पाहिजे एकान्त अलौकिक। अपर्णा म्हणे शोधू मही एकान्त स्थान। अवश्य म्हणती नंदिकेश्वर।।१८।। उमा महेश्वर पातले यमुना तटी। नंदीस उभे करुन त्या नदीतटी। पाहून एकान्त यमुना तटाकी। नदीकाठी ते बैसले।।१९।। पार्वतीस उपदेशिती महेश्वर एकान्ती। संजीवनी पवित्र मंत्र एकांती। न जाणती मच्छोदरी कवि नारायण असती। उपदेश गर्भी मच्छिंद्राने ऐकला।।२०।। उपदेशाचे फल पूसती शिव पार्वतीते। म्हणती सांग सापडेल खूण ते माते। दावी बोलून मजसी तू अपर्णे। आधीच झाला मच्छींद्र बोलता।।२१।। शंकर बोलती मच्छिंद्राते। महाराजा बरेच तू आहेस येथे। उपदेशाचा या लाभ स्वाभाविके। झाला तुजसी कविराया।।२२।। ऐक परी एक आनंद संगती। दत्तमुखी मंत्रोपदेश करवीन तुजसी। यावे जन्म झाल्यावरी बदरिकाश्रमी। तेथेच देईन मी तुज भेटी।।२३।। दिवस भरता मच्छी प्रसूतीकळा समयास। अंडे टाकोनि जल तटाकास। मच्छी गेली जलोदरास। यमुनातिरी घडे हे महाराजा।।२४।। मीन वेचाया बक येती यमुनाजळी। संचरती ते यमुना तटाकी। पाहिली अंडज शुक्तिका त्यांनी दृष्टी। खाद्य म्हणोनी भेदिती ती।।२५।।

शुक्तीचे शकल पडले मही। खालील शकली बाळ विदेही। बाळ तेजाचा लखलखाट भारी। पाहुनी खग ते पळाले।।२६।। कामिक नाम धीवर त्याकाली। देखिला रम्य बालक त्याने तिरी। मोहमयता त्याच्या चित्ती द्रवली। म्हणे अतिकोमल हे बालक।।२७।। देववाणी त्याने परिसली। म्हणती देव महाराजा कामिक मूर्ती। अरे हा कवि नारायण मच्छोदरी। नेऊनी मच्छिंद्र नाम दे त्याते।।२८।। कामिकाची त्या सुशील कांता। नाम जियेचे शारद्वता। अति वात्सल्ये ती सांभाळी बालका। झाली बालका पाच वर्षे।।२९।। पिता बालका नेई सांगाती। पकडूनी मत्स्य म्हणे मच्छिंद्रासी। सांभाळी बालका या मीनांसी। बालक पाहे मत्स्य तडफडती।।३०।। देई सोडून मग तो जळामाजी। पिता कोपिष्ट झाला बालावरी। बाल म्हणे उदरभरण असे नको मुळी। भिक्षा मागुनी जीणे बरवे की।।३१।। चुकवूनी दृष्टी मग पित्याची। गमन करी अद्वैत वनाप्रती। योग्य स्थळ तेथ न मिळे त्यासी। पातला मग तो बदरिकाश्रमी।।३२।। द्वादशवर्षे आचरुन मग उत्तम तप। शरीरा क्लेश देऊनी लागे हरिभजनास। जेणे झाला केवळ अस्थिपंजर। तव अकस्मात अत्रिसुत पातला।।३३।। स्तविता झाला तो उमारमणा। अर्पूनि त्यासी स्तुती कुसुम माला। दक्ष जामात त्रिशूलपाणि तोषला। प्रत्यक्ष जाहला कामदहन।।३४।। योगक्षेम शिव पूसता झाला दत्ता। जेणे सांगितली क्षेम वार्ता। म्हणे बदरिकाश्रमी व्हावी दृष्टी महाराजा।

उभयता पाहू चालले कानन।।३५।। मच्छींद्र दैवे अशी लोभभावना। उभयता रमती बदरिकाश्रमा। मंदराचल महा निकट त्या कानना। तयावरुनी वर्षती तोयधर।।३६।। श्रीदत्तदेव आणि उमारमण। विपीन वाटी चालती ते सहज। तो त्यांनी देखिला मच्छिंद्र। रमला बहु जो तपामाजी।।३७।। पाहुनी तपी हा मुकुटमणी। धाडिती दत्तास त्रिशूलपाणी। जाणण्या कामना तपाकारणी। पूसूनी यावी महाराजा।।३८।। पूसती तयासी अत्रिनंदन। वरदायक शब्द मच्छिंद्र करुन श्रवण। प्रकट करुनी मनीचा विनम्रभाव। म्हणती सांगा आपण कोण ? ।।३९।। ऐकूनी तोषला अनुसूया सुत। व्याघ्र पदी ऋषि अत्रि नाम। तयांचा सुत मी दासोत्तम। महीलागी अवतरलो ।।४०।। द्वादशवर्ष तपाचे श्रम फळले आज। म्हणोनी सांडोनी सकळ नेम। लोटूनी पदी करी पादक्षालन। न फुटती शब्द करी रोदन।।४१।। रुद्र विष्णु ब्रह्म आपण सदय। त्रिवर्गरुपी असून देह ऐक्यमय। साक्षात महीवरी अवतरलास। ऐसे म्हणूनी करी नमस्कार।।४२।। तदा दत्ताने कृपा हस्ते स्पर्शुनी मौली। कर्णी तयाच्या गुंजुन मंत्रावली। तात्काळ फिटोनी अज्ञान दशाकाजळी। जाहले ऐक्य ब्रह्म सनातन।।४३।। आत्रेयाने घेऊनी तयासी जवळी । पूसे इंदिरावर कोठे ते सांग झणी। तदा मच्छिंद्र वदे लवलाही। जळी स्थळी सर्वत्र ईश्वरच असे सर्वस्वी।।४४।। मग या सच्छिष्याला धरुनी करी। आले उभय आदिनाथाप्रति।

मच्छिंद्र वाकुनी तयाच्या पायी। मस्तक ठेऊन वंदितसे।।४५।। मग त्रिवर्ग येऊन त्या स्थानी। दत्तासी म्हणे पंचमूर्धनी। वेदकारण निज सार गूढज्ञान उपकारी। निवेदी यासी महाराजा।।४६।। सकळ सिध्दी आत्मज्ञान। जारण मारण शापादपि निवारण। मंत्रशक्ती अन् अस्त्र निबर्हण। वंशवरद मंत्रज्ञान मस्तकी स्थापिले।।४७।। सद्विद्या नागबकादि वातास्त्र। नगनागादि महावज्र। पावक जलधी अस्त्र पवित्र। सांगोपांग केले अत्रिबाळे।।४८।। नाथ ऐसे देऊन नाम। शृंगी कर्णवेध आदी लक्षण। देऊन तयासी संप्रदायाधिकार। श्रीदत्त शंकर निघून जाती।।४९।। मच्छिद्रनाथे दक्षिणपंथी करुन गमन। सप्तशृंगीस येऊन अंबास्तवन। करुनी प्रसन्न अंबेस मागे वर। काव्य स्फूर्तीस्तव वर द्यावा।।५०।। म्हणे देवी यास्तव शाबरी विद्या। करावी त्यासाठी कठोर साधना। त्यास्तव नेले त्यासी मार्तंड पर्वता। तेथे अश्वत्थ वृक्ष दृश्य झाला।।५१।। वृक्षावर असती सूर्यादि देवता। बावन्न वीर बारा मातृका। ब्रह्मगिरी वरील नदीजल आणण्या। सांगितले तयासी देवीने।।५२।। नदीपात्रात असती कुंडे अनेक। पांढरीच्या वेली टाक त्यात एकेक। जेथे वेल राहील जीवंत। कुंडात त्या स्नान तू करावे।।५३।। स्नान करीता येईल तुज मूर्च्छा। परी आदित्याची बारा नामे जपता। जीवनास अपाय होणार नाही तत्त्वता। येशील तू शुध्दीवर।।५४।। जलसिंचने होईल प्रसन्न देवता। परी एकेकच एकेवेळी मात्र

त्या। पाणी आणून न कंटाळता। देवता प्रसन्न करुन घेई।।५५।। तथास्तु म्हणून मच्छिंद्र गेला पर्वता। नागाश्वत्थ वृक्षी जल शिंपडता। प्रसन्न होऊनी सूर्यदेवता। वरदान तयाते दिधले।।५६।। मच्छिंद्रे जल आणून शतकुंडांतून। करुन त्याने सकल देवतार्चन। देवतांनी अतिप्रसन्न होऊन। काव्यशक्ती तयासी अर्पिली।।५७।। मच्छिंद्रे काव्यग्रंथी करुनी लेखन। शाबरी विद्येचे करुनी जतन। अंबेचा मग आशीर्वाद घेऊन। निघाला तो देशाटनी।।५८।। मच्छींद्र गेला बंगालदेशी। तेथे फिरत असता तीर्थवासी। आला चंद्रगिरी गावासी। नरसिंह तेथे राजा होता।।५९।। तया गावी एक गौडब्राह्मण। सर्वोदयाळ जो पाळी आचारनेम। कांता तयाची सरस्वती गुणोत्तम। सुशील सात्विक लावण्यखाणी।।६०।। परी उदरी नाही संतान परम। तेणे उचंबळोनी योग काम। नावडे तिजसी गृहस्थाश्रम। बहुत दुःखी ती होती।।६१।। मच्छिंद्राप्रती करी विनंती। प्रेमा उदेला नाथचित्ती। मग आदित्यनामे मंत्रविभूती। तिचे हाती वोपितसे।।६२।। म्हणे करी सेवन ही विभूती।भस्म नोहे हा पूर्ण गभस्ती। जो हरिनारायण उदयो कीर्ति। प्रभा मिरवेल या जगती।।६३।। हर्षिली सरस्वती घेऊनी विभूती। कथा सांगे ती सख्यां प्रती। त्या सांगती हे कानफाडे कृत्रिममंत्री। कपट आम्हा यात दिसते।।६४।। ऐसे बोल बोलता युवती। येऊनी आपल्या सदनाप्रती। अति भयभीत ती भस्म चिमुटीसी।

भिरकावितसे उकरडा।।६५।। तयामाजी भस्म चिमुटी। सांडती झाली ती युवती। तयामाजी साक्षात हरिजेठी। संचार करी महाराज।।६६।। येरीकडे इकडे मच्छिंद्रनाथ। पूर्व समुद्री जगन्नाथ। करोनी सेतुबंधा येत। रामेश्वर दर्शनासी।।६७।। सेतुबंधी करुनी स्नान। अचानक देखिला वायुनंदन। क्लेश शरीरा जरा व्यापुन। सान अत्यंत शरीरी।।६८।। वरुनी वर्षाव पर्जन्य करीत। मारुती इकडे दरडी उकरीत। तयासी म्हणती मच्छिंद्रनाथ। पर्जन्यी कैसे होईल घर।।६९।। ऐकोनी तयाचे वायुनंदन। म्हणे फार चतुर तू आहेस कोण ?। तदा तो म्हणे मी यती पूर्ण। मच्छिंद्र असे नाम माझे।।७०।। वायुसुत म्हणे मी मारुतीच्या शेजारास। भावे राहोनी एक वेळेस। तयापासूनी कला सहस्त्रांशी प्राप्त। लाधली असे शक्ती मजसी।।७१।। दावीन तुज मी या समयी। तयाचे निवारण करुनी दावी। नाहीतर येथेची तव नाम यती। सोडोनिया जावे तुवा।।७२।। यती वदती मग का उशीर। दावी तुझा चमत्कार। मारुती करुनी मग उड्डाण। शतानुशत पर्वत फेकी।।७३।। ऐसे मारुती पर्वत फेकी। मध्ये अटकून ते परत येती। पर्वत परतले पाहून दृष्टी। मारुती अति क्षोभ पावे।।७४।। मग तो वायुसुत योजून शक्तीपूर्ण। एक महापर्वत अती विस्तीर्ण। उचलोनी बाहु तो मस्तकी ठेऊन। फेकण्या हाती घेतला।।७५।। उदक घेऊन मच्छिद्र योजी वाताकर्षण मंत्र। तेणे वात भरोन चलन वलन थांबत। मारुतीचे ऊर्ध्व

राहीले हस्त। पर्वत मौळीच राहीला।।७६।। ऐसे युद्ध त्यांचे झाले तुंबळ। मारुती तया समोर निर्बळ। अनिल तदा सुतास घेऊन जवळ। बोलता झाला तयाते।।७७।। बा मारुती न चले बळ तुझे माझे। जेणे तुझिया बापा बांधले। त्यासी तुझे भय काय आले। भक्तिशक्ती असे अघटीत।।७८।। अनेक प्रकारे दाऊनी शक्ती। मारुती मच्छिंद्राते परीक्षीती। पाहुनी मच्छिंद्राची मंत्रशक्ती। धन्य धन्य म्हणतसे।।७९।। तदा विनम्र होऊन मच्छिंद्रनाथ। मारुतीच्या चरणी लागत। शाबरी विद्येचे कवित्वी देऊनी वर। आज भांडण व्यर्थ का केले ? ।।८०।। मारुती म्हणे बा माझे दर्शन। तुजसी करणे आहे मजकारण। अरे स्विकारीला मी ग्रहस्थाश्रम। जानकीवचनी या रामदासाने।।८१।। माऊली म्हणे करी पूर्ण कामना। तुवा आचरावे गृहस्थाश्रमा। होऊनी नि:शब्द झालो खिन्न मना। जाऊनी बैसलो रामासमोर।।८२।। तो म्हणे मी नव्व्याणवावा राम क्षिती। तू ही नव्व्याणवावा असशी मारुती। चौदा चौकडी राज्याची रावण नियती। परी आपण मारुन आलो।।८३।। आता तेथे असे केवळ स्त्रीराज्य। जाणे तुज तेथे आहे निश्चित।भुभु:कारे स्त्रीया होतील गरोदर निश्चित। अढळ राहील ब्रह्मचारीपण।।८४।। परि भूभूत्कारे न संतोषे मैनाकिनी सती। आरंभी ती अनुष्ठान महती। बैसलीसे ती दृढ तपा परती। मांसा तोडूनी देई आहुती।।८५।। मग प्रसन्न मी झालो तीते। मजसी मागे ती रतिसुखाते। मग मी

सांगता झालो तीते। मच्छिंद्र पुरवील ते कामना।।८६।। मच्छिंद्र म्हणे ऊर्ध्वरेता। कोणते कार्य मज निरोपिता। येणे ब्रह्मचर्यत्व समूळ वृथा। आचवले जाईल की माझे।।८७।। तदा तया बोलिले मारुती। तवपासूनी ती प्रसवील पुत्रासी। मीननाथ असेल नाम त्यासी। उपरिचर वसुचा अवतार तो।।८८।। मच्छिंद्र देऊन रुकार तयाप्रती। प्रथम करीन तीर्थयात्रा मज कार्यापरती। तदनंतरच जाईन स्त्री राज्याप्रती। ओम मारुती म्हणतसे।।८९।।निघाला मच्छिंद्र यात्रेकरता। हिंगुलामातेच्या दर्शना करता। त्याने निबीड अरण्य प्रवेशिता।अष्टभैरव तेथ रक्षण्या होते।।९०।। पापपुण्य झाडा ते मागती। म्हणे मच्छिंद्र त्या सर्वाप्रती। मी सर्वातीत असे एक यती। भैरव अंगावर धाविन्नले।।९१।। बनवी मच्छिंद्र वज्रदेही स्वतःस।वाताकर्षण मंत्रे फेके तो भस्मास।भैरव विरुद्ध योजिले अस्त्रा प्रति अस्त्रास। अष्टभैरव निश्चेष्ट पडले।।९२।।मातृका वृतांत कथिती देवी प्रती। वदे देवी मोहवावे त्या ब्रह्मचाऱ्याप्रती।मच्छिंद्र योजी तदा कामास्त्राप्रती। वेड्यापिश्या त्या जाहल्या।।९३।। वस्त्रहीन त्यांची दशा झाली तिकडे। तैसेच पुरुष नाचती तयापुढे। भानावर त्या येता पडे त्या साकडे।धावल्या मग त्या देवी प्रती।।९४।। मच्छिंद्र स्वतः येई देवीकडे। देवीने मातृकांस वस्त्र अर्पिले। चिंतीता मनी देवीस उलगडे कोडे। कविनारायण मच्छिंद्र जाहला।।९५।। देवी संतोषली तयाचे शौर्य पाहून। प्रत्यक्ष प्रगटून तया दर्शन देऊन। पराक्रमाचे

त्याच्या कौतुक करुन। जाहली प्रसन्न वरदा हिंगुला।।९६।। मग देवी म्हणे मच्छिंद्राप्रती। पाहू इच्छीते मी तव योगशक्ती। द्यावी आज्ञा मच्छिंद्र वदती। म्हणे ती पर्वता उडवी आकाशी।।९७।।मच्छिंद्र उडवी पर्वत आकाशी। ठेवूनी तरंगत त्या अंतराळांतरी। तैसेच परत खाली ठेऊन माघारी। प्रसन्न देवीस तो करी।।९८।। देवीने तयासी ठेवूनी तीन दिवस। अर्पून त्या स्पर्शास्त्र भिन्नास्त्र। वरदाने देऊन बहुवस। बोळविले तयासी वनसीमेप्रती।।९९।। असो ऐसा प्रसाद घेऊन। निघे बारामल्हाराचा मार्ग धरुन। मग सुरस मच्छिंद्र पराक्रम कथन। श्रोतृवृंदी श्रवण करावे।।१००।।

जीवन हे सुडौल धारण करती। ती माय अवनी सांभाळ करती। निसर्ग तो या जीवाचा आहे की। पैल पैलतीराचा जरी संबंध नसती। या कायेचा खेळ विश्वात खेळती। अंतरिक्षात तयाचे ठसे उमटती। जन्माचा तो जीव सुंदर भोगुनी। होईल काया अंतरिक्ष ह्या अध्याय पठनी। देईल आत्मा साक्ष माया ती विरजोनी। सुटेल जीव मग सहज त्या पाशातूनी। जशी घुंगरे नर्तकीच्या झळकती पायात। तद्वत आत्मा झळकवती या विश्वात। वाचता हा अध्याय फिटे कायेचे पांग। मुक्त होऊनी आत्मा जाईल अंतरिक्षात।

।।श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।।

।। श्री ।।

# ।। अध्याय दुसरा ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री नवनाथाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

जयजयकार तुज वसुनंदना। कृपा कटाक्षा प्रेमळ घनश्यामा। ग्रंथ करण्या द्यावी प्रेरणा। लक्ष्मणसुत या गणेशासी।।१।। मागीले अध्यायी केले कथन। हिंगुला मातेसी करुनी प्रसन्न। मार्गी प्रवेशून बारामल्हार कानन। मच्छिंद्र तेथे मुक्काम करती।।२।। रात्र झाली असता दोन प्रहर। मच्छिंद्र पाही भुतावळ अपार। म्हणे तो याते करावे प्रसन्न। उपयोगी पडतील कार्यालागी।।३।। ऐसा विचार कल्पूनी चित्ती। प्रयोगी अंबिकास्त्र स्पर्श शक्ती। ते अस्त्र प्रेरिता भूतगणा प्रती। सुटका नाही पदाते।।४।। चालले होते ते भूतगण। वेताळ भेटी दर्शनाकारण। वेताळ पाही भूतावळी न्यूनपण। विचारी मग अन्य भूतांते।।५।। शरभ तीरीची भूतजमात। का आली नाही येथ। गमन करीते झाले भूत। शरभ तीरी ते पातले।।६।। पाहती ठायीच उभे भूतगण। पूसता तया त्याचे कारण। म्हणे कोणीतरी एक सिद्धजन। तेणे ही कला

रचियेली।।७।। भूतगण येती मच्छिंद्राप्रती। जाऊ द्यावे म्हणती वेताळाप्रती। तो फार बलाढ्य आहे निश्चिती। देव दानव गंधर्व ही त्या मानती। ।८।। म्हणे मच्छिंद्र त्या भूतगणांसी। न मी भीत त्या वेताळासी। येऊ द्या त्याला मजपासी। पाहीन बळजेठी कैसा तो।।९।। वार्ता ऐकूनी संतापे वेताळ। जमवूनी एकमेळी भूतावळ। सप्तद्वीपांची सारी भूतावळ। अष्टभूतपती समवेत।।१०।। संगे घेऊन समस्त भूतपती। तैसेच संगे घेऊन महाभद्रासी। वेताळ आला मच्छिंद्राप्रती। भूतपती कोल्हाळ करिती।।११।। मच्छिंद्र आराधी मंत्रशक्तीते। योजून सकल मंत्र अस्त्राते। मनी जपून वज्रास्त्र मंत्राते। वज्रासमान करी शरीर।।१२।। भूते सोडती विविध अस्त्रांसी। वैश्वानर ज्वाळ तरु कडकडती। मच्छिंद्र करुनी जलादास्त्रे दाटी। शांत केला द्विमूर्धन।।१३।। ऐसे बहु तुंबळ युध्द होत। मच्छिंद्र वाताकर्षण विद्या जल्पत। तो वाताकर्षण मंत्र सिध्द होत। संचारी तो अष्टदेहांप्रती।।१४।। जव जव आकर्षण वात होत। हस्तपादांचे चलन राहत। बोलती मग भूतपती एकमेकाप्रत। शरण वेगी रीघावे।।१५।। म्हणती आमुचा वाचवावा प्राण। मग नाम तुझे मिरवू जगाकारण। सांगशील ते कार्य करुन। भूतांसहित येऊ की।।१६।। यावरी बोले मच्छिंद्रनाथ। साबरी विद्या मम कवित्व। त्याते साह्य भूतांसहित। कार्यार्थी तुम्ही असावे।।१७।। मग अष्टही म्हणती अवश्य। कार्य करु निःसंशयास। मग साधन

प्रयोग अन् नैवेद्य। पृथक् पृथक् त्यांनी सांगितला।।१८।। तदा होऊनी विमुक्तास्त्र जोडोनी कर। उभे राहती समस्त समोर। वाणी वदती जयजयकार। धन्य मच्छिंद्र म्हणोनी वंदिती।।१९।। मग मच्छिंद्र वदे त्यांसी। जो कोणी पठेल ह्या समरासी। बाधा न कधी करावी त्यासी। प्रिय त्याचे सर्व करावे।।२०।। तया सदनी जे काही विघ्न। करावे तयाचे निवारण। त्याच्या सदनास न रहावे आपण। त्यासी करु नये व्यथा।।२१।। रुकारुनी मग मच्छिंद्र वचनास। अष्ट दैवत अष्ट कोटी पिशाचा सहीत। सर्वांनी नमूनी मच्छिंद्रनाथ। स्व स्व स्थानासी सर्व गेले।।२२।। नंतर मंच्छिद्रनाथ सत्वर। पाहता झाला बारामल्हार। तेथीचा विधी करुनी सर्व। कन्याकुमारी प्रति तो निघाला।।२३।। यापरी मच्छिंद्र कोकण स्थानात। कुडाळप्रांत आडळगावांत। ग्रामाबाहेरी दुर्गालयात। काळिका दर्शना मच्छिंद्र गेला।।२४।। तेथे शिवहस्ताचे काळिका अस्त्र। त्या अस्त्राने वधिले असती दैत्य। शिव जाहले होते प्रसन्नचित्त। म्हणती देवीस वरदान माग।।२५।। ती म्हणे युद्ध पराक्रमे अति। मी श्रम पावले अंबिकाहस्ती। परी आता माते विश्रांती। सुखवासा भोगू दे।।२६।। काळीका देवीस करुनी नमन। म्हणे म्या मंत्रकाव्य केले निपुण। तरी मम कवित्व विद्या गौरवून। कार्या उदित होई का।।२७।। ऐकून ऐसे मच्छिंद्र वचन। क्षोभले देवीचे अंतःकरण। भवपाणि मी श्रमले असून। शिणवू पाहसी दुरात्म्या।।२८।। अरे

मी देव रुद्रकरी असता। तव करी वसू हे काय भूता। तू ते काही शंका बोलता। वाटली नाही रे दुरात्म्या।।२९।। मच्छिंद्र म्हणे देवी ऐक। बळीने मानिला वामन मशक। परी परिणामी पाताळ लोक। निज दृष्टी त्या दाविला।।३०।। बोलली भद्रकाली परमक्रोधे। म्हणे कवण प्रताप आहे तूते। तो मज दाखवी मशका येथे । वामनकृत्ये बळी जेवी।।३१।। मच्छिंद्र म्हणे बहु युद्धासी। मिरवलीस तू शिवकार्यासी। ते मज दावी अहर्निशी। परीक्षा घेईन मी तुझी।।३२।। सिंहा आरोळी देऊन भद्रकाली। महातेजे प्रगटे अंतराळी। दारुण ती वासवशक्तीची भगिनी। हालवले ब्रह्मांड सप्तपाताळ।।३३।। हडबडले अष्ट दिग्गज दिक्पाळ। भयभीत मानव दानव सकल। स्वर्गी दचकले देव सकल। रक्षी स्व जीवित बा मच्छींद्रा।।३४।। मच्छिंद्र करी कवळुनी भस्म चिमुटी। मंत्र अस्त्राते आणूनी पोटी। वासवशक्ती जपून फेकी भस्मचिमुटी। वासवशक्ती प्रकट झाली।।३५।। झोंबली दोन्ही अस्त्रे अति बळवंत। परी काळी वासवशक्तीते ग्रासीत। मग होऊनी ती अति उन्मत्त। मच्छिंद्रा वरी चालून गेली।।३६।। तदा भस्म चिमुटी घेऊनी करात। मच्छिंद्र स्मरे प्रयोग रुद्रमंत्रास। प्रकटली एकादश रुद्र महाभद्र। युद्ध तुंबळ चालले।।३७।। मच्छिंद्र प्रेरीतसे वज्रास्त्र। तैसेच प्रयोगितसे धूमास्त्र। परी चपळ काळिका वज्रास्त्रास। आपटती झाली शैलाद्रिमही।।३८।। तेणे घाये शैलाद्रि पर्वत। निम्मा चूर

झाला नेमस्त। ती साक्ष उत्तर हिंदुस्थानात। सह्याद्री पर्वत नसेची।।३९।। असो ऐसे वज्रास्त्र सरले। आणि तिने धूम्रास्त्र गिळीले। ते पाहूनी मच्छींद्रनाथ वेगे। वाताकर्षणास्त्र जपतसे।।४०।। देवी वर तो वाही मंत्रास्त्र गुप्त। काळिका देवी पडे निश्चेष्टीत। सावध झाला कैलासनाथ। काळिकास्त्र संकटी पडले ।।४१।। शिव समजे मच्छिंद्रनाथ आले। मग शिव त्या ठायी प्रकटले। मग मच्छिंद्रनाथ धावुनी वेगे। शिवचरणी तो लागतसे।।४२।। शिवास आनंद जाहला थोर। म्हणे बाळा तू असशी अतिथोर। करुनी दाविलास चमत्कार। मम करीचे काळिकास्त्र जिंकीले।।४३।। नाथ म्हणे बा पंचवक्त्रा। कवित्व करविले साबरी पवित्रा। त्याते वर देऊन मम कार्याकरता। काळिकास्त्र हे मिरवावे।।४४।। अवश्य म्हणती उमारमण। परी सावध करी काळिके लागून। मी तव कार्यासी साह्य होईन। वचन दिधले मच्छिंद्रा।।४५।। मच्छिंद्रे मंत्रून फेकली भस्मविभूती। सावध उठली काळिकादेवी। तिने दृष्टी पाहीला शूलपाणी। शिवपदी ती लागली।।४६।। शिव तिज म्हणे मम करी विराजलीस। आता सहाय्य होऊन मच्छिंद्रास। साह्य करुनी त्याच्या कार्यास। जगा उपकर्ती तू व्हावे।।४७।। शिवाज्ञे ती मच्छिंद्रा देई वचन। साबरी विद्या हे असे कविरत्न। जेथे जेथे येईल माझे नाम। तेथे साह्य मी असे।।४८।। यापरी तेथूनि मच्छिंद्रनाथ। उत्तरपंथे गमन करीत। नमूनी मग हरेश्वर दैवत। गदातीर्थी

तो पातला।।४९।। मानववेषी त्रिशूळ डमरु युक्त। अज्ञान तम नाशक पूर्ण चंद्र। द्वंद्वलेश शिवपुत्र वीरभद्र। मच्छिंद्रास तेथे भेटला ।।५०।। वीरभद्र पूसे स्वामी आपण कोण। येरु म्हणे मी मच्छिंद्र अभिधान। मग पूसे कवण पंथ कोण दर्शन। तो म्हणे नाथपंथी जोगी महिमान।।५१।। वीरभद्र पूसे तव गुरु ऐसा कोण। भलतेची मत करी तो स्थापन। विद्वान नसे असे मूर्खाहून पूर्ण। शतमूर्ख तो असावा।।५२।। म्हणे मच्छिंद्र दुर्जन अधमा। तुझे दर्शनही न करणे आम्हा। जावे आपण आपल्या कामा। पावशील शिक्षा मम हस्ते।।५३।। ऐसे मच्छिंद्र भाषण ऐकून। परम क्षोमले वीरभद्र मन। म्हणे भ्रष्टा तुझाच मी प्राण। आताच घेईन या वेळी।।५४।। मग करी त्याने धनुष्य काढून। सत्वर ओढूनी लावला गुण। निर्वाण अर्धचंद्र बाण भात्यातून। काढून युद्धास सज्ज झाला।।५५।। मच्छिंद्र म्हणे धनु सिद्ध करुन। सोंग दाविसी मजलागून। नव्हे योग्य परी घे ऐकून। पावसील मरण आताची।।५६।। तदा वीरभद्रे सज्जिले धनुष्य। म्हणे आता जप करी राम मंत्र। मच्छिंद्राने मग कवळुन भस्म। वज्रस्थापना केली शस्त्रास्त्री।।५७।। परस्पर अस्त्रीअस्त्र नष्ट झाले। बहु तुंबळ तयात युद्ध माजले। मूळ मायेची शक्ती योजिली मच्छिंद्रे। वीरभद्राच्या कालास्त्री।।५८।। तै ब्रह्मांड विलयी जाऊ लागता। प्रकटले सर्व देव त्या करता। म्हणती मच्छिंद्रा बा आता। घेई आवरुनी अस्त्रासी।।५९।।

मच्छिंद्रे ऐकली देववाणी। मग वासनिक अस्त्र प्रयोजूनी। महाप्रलय हरला त्यानी। देव नमिती मच्छींद्रा।।६०।। त्रिदेवाने शांतविला मच्छिंद्र। सन्निध बोलावूनी वीरभ्रद। म्हणे कविनारायणच मच्छिंद्रनाथ। तरी परस्पर प्रीती वाढवावी।।६१।। यावरी बोले रुद्र प्रसन्न होऊन। मच्छिंद्राची कामना असे कोण। ती सर्व मीच पूर्ण करीन। वरदचित्ते करुनिया।।६२।। मच्छिंद्र म्हणे म्या वरिला विद्याकाम। साबरी विद्या मंत्र बोला समान। त्वरे जाऊनी सकल जगाचा काम। मंत्रपाठी पुरवावा।।६३।। वीरभद्रेही त्यासी दिधला वर। देवही वदती असो आम्ही समग्र। मंत्रापोटी सकल कार्य थोर। आम्ही करु सहसाही।।६४।। नमे तो रुद्र ब्रह्मा चक्रवर्ती। विष्णु ही होऊन प्रसन्न चित्ती। चक्र अस्त्र देऊनी त्यासी। तुष्ट मानसी करीतसे।।६५।। मग विधिराजे ही प्रसन्न होऊन। वज्रास्त्र दिधले कृपा करुन। मग कुबेरे ही उदार होऊन। सर्व सिध्दी त्याच्या दासी केल्या।।६६।। वरुण आपास्त्रमंत्र त्याते अर्पी। अग्नी अर्पितसे त्या मंत्र अग्नी। अश्विनी देती मंत्र मोहनी। मच्छिंद्र अति तोषला।।६७।। सर्व देव जाहले संतुष्ट मनी।मच्छिंद्रास समवेत नेले तयांनी। वैकुंठ कैलास सकल स्वर्ग भुवनी। सप्तवर्ष राहूनी तो परतला।।६८।। मच्छिंद्र आला भूतलासी। पुनः चालीला तीर्थाटनासी। जाता झाला पश्चिम देशी। वज्रवन त्याने पाहीले।।६९।। तेथे महादैवत वज्रभगवती। तैसेची तीनशे साठ उष्णकुंडे असती।

पाचारुन तेथील पुजाऱ्यासी। मच्छिंद्र वृतांत विचारीतसे।।७०।। पूर्वी म्हणे वसिष्ठे यज्ञ केला। तेव्हा सकल देव आले स्नानाला। त्यांनी निर्मूनी उष्णोदकाला। कुंडे केली आपलाली।।७१।। मग उंचवट जागा पाहून सरस्वती पात्री। जल्पिले त्यांनी आपास्त्र मंत्र उच्चारासी। घेऊन भोगवती उदक हस्ती। अग्निमंत्र तो जल्पतसे।।७२।। भोगावती उष्ण नीरी करुन स्नान। भगवतीसही तयाने घातले स्नान। देवी भगवती झाली पूर्ण प्रसन्न। एकमास वस्तीस तिने ठेवले।।७३।। मग मच्छिंद्र पूसे भगवती प्रती। माते वज्रेश्वरी हे नाम तुजसी। कैसे झाले प्राप्त सांग मजसी। तेव्हा भगवती बोलीतसे।।७४।। वसिष्ठे आरंभिला यज्ञ या स्थानी। शक्र पातला यज्ञ सभास्थानी। परी सभेत उत्थापन मान न देई कोणी। परम क्षोभला अमरनाथ।।७५।। परमकोपे मग सोडी तो वज्रास्त्र। मग राम दर्भी मंत्रून शक्तिमंत्र। सोडीता झाला वज्राकारण। बहु तातडी लगबगे।।७६।। मग त्या दर्भी मंत्र प्रयुक्ती। मी प्रकट झाले महाभगवती। वज्र गिळूनी उदर आहुती। करिती झाले त्या समयी।।७७।। मग शक्रे विनविले रामाप्रती। रामे वज्र दिधले तया मागुती। मग सकल ऋषि देवी मजप्रती। वज्रेश्वरी नाम स्थापिले।।७८।। यज्ञ जाहला समाप्ती। सकल गेले स्नानाप्रती। परी श्रीरामें येऊनि ते क्षिती। माते स्थापिले अद्यापी।।७९।। वज्रेश्वरीस मग करुन प्रसन्न। द्वारावती तीर्थ करुन। अयोध्येसी आला मच्छिंद्रनाथ। रामदर्शना तो जातसे।।८०।।

रामवंशी पाशुपत नृप त्या समयी। आला होता तो रामदर्शनी। द्वारपाले मच्छिंद्रनाथास अडवूनी। झुगारुनी दिधले तया।।८१।। मच्छिंद्रनाथ करी विचार मनी। दंडावे प्रत्यक्ष रायास या समयी। फेकी भस्मचिमुटी स्पर्शास्त्र योजूनी। तदा राया दंडवत रामा करीतसे।।८२।। राय उठू पाहे न सोडी मेदिनी। रायाने सेवक मंत्री बोलावूनी। पूसे योग्यास पहावे पिडीले कोणी। प्रधानमंत्री मग विचारीतसे।।८३।। शोध शोधिता सेवक कथिती। मग प्रधान धावे मच्छिंद्राप्रती। विनम्रतेने नमुनी त्या चरणाप्रती। विनवी राया आमुचा उठवावा।।८४।। मग जल्पून विभक्तास्त्र भस्मचिमुटी। सोडीता त्याने धरेप्रती। राव उठूनी बैसला धरित्री। येऊनी नमी तो मच्छिंद्रनाथा।।८५।। त्याने सदनी नेऊनी मच्छिंद्रनाथ। प्रेमे भक्तीने तोषिला तो भक्तराज। मच्छिंद्र विचारी मज सांग महाराज। इच्छा मनी कोणती असे।।८६।। नृप विनवितसे घडवावे प्रभुदर्शन। मग तयासी सभेबाहेर आणून। धूमास्त्र वायुअस्त्र भ्रमीअस्त्र योजून। पीडिले तयाने सूर्य नारायण।।८७।। मग त्याने जल्पिला वाताकर्षण। वाजींचे सारथ्याचे थांबे श्वसन। सूर्य ही दाटला श्वासेकरुन। रथ उलथोनी मही पडला।।८८।। मही आदळता दिव्य रथ। खाली पडला श्रीआदित्य। स्यंदनी वाजी अति होत। कासाविस श्वासाने।।८९।। परी मही पडता तेजो राशिबाळ। मही पेटला अति अनल। तेणे दाहूं पाहे सकळ। महीवरले उद्‌भिज्ज।।९०।। ते पाहूनी

मच्छिंद्रनाथ। जलदास्त्र स्मरे त्वरीत। तेणे करुनी अपरिमित। जलवृष्टी मही होतसे।।९१।। परी आदित्य पडता निश्चेष्टीत। ब्रह्मा विष्णु महादेव प्रकट होत। अती घाबरले स्वर्ग दैवत। मच्छिंद्रापाशी ते पातले।।९२।। मच्छिंद्रास ते पूसती। सांग बा रे इच्छा कोणती। म्हणे साह्य साबरी मंत्राप्रती। व्हावे आपण सर्वांनी।।९३।। घडवावे पाशुपतास श्रीराम दर्शन।प्रकटले प्रत्यक्ष राम लक्ष्मण। मच्छिंद्र वंदितसे श्रीराम चरण। पाशुपत नृपती चरण धरी।।९४।। रामे धरीला त्यासी वक्षस्थानी। मच्छिंद्रास प्रेमे कुरवाळुनी। म्हणे साबरीमंत्री साह्य होईन मी। परी सोडवी बा भास्करास।।९५।। जल्पतसे वातास्त्र मच्छिंद्रनाथ। सावध होई मग दिननाथ। सावध होऊनी जागी बैसत। दाही दिशा तो न्याहाळीतसे।।९६।। सकल दैवते जाऊनी तेथ। नमिला महाराज प्रताप आदित्य। आदित्य म्हणे मी पाहु इच्छीत। क्षत्रिय कोण ऐसा आहे।।९७।। मग जल्पुन चंद्रास्त्र जलदास्त्र।मच्छिंद्रनाथ जातसे तयाप्रत। वंदूनी त्याच्या चरण कमलास। विनवी साहाय्य मजसी करावे।।९८।। वरद आपुला असावा मंत्राकारणी। ऐकूनी ऐसी मच्छिंद्रवाणी। अवश्य म्हणतसे वासरमणी। कार्य करीन जगाचे।।९९।। संतुष्ट झाला सविता नारायण। विमानी बैसून गेले सर्व देव। मग पाशुपतास संतुष्ट करुन। मच्छिंद्रनाथ निघाले यात्रेसी।।१०० ।।

शरीर व मन हे दोघे भाऊ। राहतात देही सख्खे अन् सावत्र। दोहोंच्या मित्र शत्रु संबंधातून। या कायेस जडवी ती रोगादि सर्व। करती हे मंदिर व्याधीने जर्जर। ठाण मांडोनी देही भोसकती खंजीर। या अध्यायातून करि जो पठन नाथरहस्य। पळती दूर तयाचे रोगादि सर्व। करिती आच्छादन देहावरी वज्राचे। दरवळे सुगंध अन् तेज अध्यात्माचे। पडतील निपचित सारे रोगादिक। पुरवतील चोचले भक्तांचे हे नवनाथ । हाकुनी हा रथ देतील नवनाथ साथ। देऊनी साद भक्ता देतील साक्ष। करोनी देह मंदिर बलवंत धैर्यशील। बनुनी माय हे जीवन स्वस्थ करतील।

। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु ।

।।श्री।।

## ।।अध्याय तिसरा।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री नवनाथाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

नमन आपणा जगदुध्दार। अवतारदीक्षा श्री ज्ञानेश्वर। फोडोनी आपण भगवद्‌गीता भांडार। सकळ जनां वाढीले।।१।। ऐसे आपण कविमहाराज। मम कामनेचे करुनी चोज। नवशती ग्रंथार्थी विपुल सुरस। असावी सरस्वती मम लेखणी।।२।। सप्तमोक्षपुऱ्या पाहुनी मच्छिंद्रनाथ। अयोध्या मथुरा अवंतिका यथार्थ। अन्य तीर्थे करुन फिरुन बंगालदेश। चंद्रगिरीस तो पातला।।३।। गावात करित असता भिक्षाटन। होई स्मरण पडता दृष्टी सदन। भस्मचिमुटी पुत्र संजीवन मंत्रून। येथेच दिधली होती निश्चये।।४।। सांगून द्वादश वर्षे लोटल्यापाठी। पुन्हा मी येथे येईन शेवटी। ऐसे म्हणूनी भस्मचिमुटी। सरस्वतीस मी दिधली होती।।५।। मग उभा राहूनी त्या अंगणी। हे सरस्वती ऐसी पुकारी वाणी। भिक्षा देण्या आली ती शुभाननी। मच्छिंद्र पूसे नाम तियेसी।।६।। सरस्वती ऐसे ऐकून कानी। मच्छिंद्र

म्हणे ऐक जननी। दावी तव बालक मज झणी। ती म्हणे नसे मज पुत्रसुख।।७।। मच्छिंद्र म्हणे नको वदू असत्य। म्या तुज दिधली वरद भस्म चिमुट। भस्म नोहे ते संजीवनी पीठ। पुत्राचे तुझ्या दर्शन घडवी।।८।। सांडिली भस्म चिमुटी उकिरडा भुवनी। भयग्रस्त ती झाली तेणे करुनी। संचरला कंपवात तिज हृदयी। म्हणे आता शिक्षा मजलागी।।९।। मग चरणी तिने ठेवून भाळ। जोडून आपुले करकमळ। म्लानमुखी ती दीन विकळ। वृत्तांत सकल निरोपी।।१०।। नाथ मग मनी करी विचार। मंत्र संजीवनी आहे अमर। निश्चित सूर्य वीर्ये देहवर। रचिला असेल कोठेही।।११।। म्हणे दावी मज ते ठिकाण। जिथे सांडिली तू भस्म चिमुट। मग मच्छिंद्रा सवे नेऊन। दावी ती गोवर पर्वता समान।।१२।। मच्छिंद्र म्हणे गोवरगिरी तव जन्म। तरी गोरक्ष ऐसे तुझे नाम। न लावीता आता उशिर बघ। बाहेर निघ गोरक्षनाथा।।१३।। गोवरातून तया बाहेर काढीले। बाळे तयाने चरण वंदिले। मग मच्छिंद्रनाथे प्रसन्नचित्ते। ॐकाराक्षर मंत्र तया बोधिला।।१४।। मग ते करिती जगन्नाथी गमन। मार्गी लागला कनकगिरी ग्राम। वदती मच्छिंद्र गोरक्षास। भिक्षा मागुनी क्षुधा हरी।।१५।। जाती गोरक्ष भिक्षेस गृहाप्रती। गृहीणी पाही गोरक्षासी। दाटुनी वात्सल्य परमप्रीती। जाई गृहांतरी लगबगी।।१६।। षड्रसान्न वडे पातवड्या मिष्टांन्न त्या वाढीले। गोरक्षे आणून मच्छिंद्रास दिधले। मच्छिंद्र अती प्रीती जेवीले।

परी इच्छा मनी वड्यांची।।१७।। ऐकून गोरक्ष जाई त्या गृहाते। म्हणे आणखी वडे देई माते। ती म्हणे अजून पाहीजेत तुज वडे। तरी डोळा काढूनी दे मजसी।।१८ ।। झणी त्याने काढिला नयन। झाली ती बहु भयभीत मन। मग तयासी सातपाच वडे देऊन। नेत्र ही तयासी प्रत्यर्पिला।।१९।। गोरक्षाने दिधला गुरुस्तव नयन। संतोषिले मच्छिंद्र भक्ती पाहून। मग मंत्र संजीवनी जल्पून। नेत्र पुनरपि स्थापिला।।२०।। मच्छिंद्र नाथे मग तया समीप घेऊन। गुरु शिष्य उभयी केले भोजन। मच्छिंद्रनाथ जाहले संतुष्ट पूर्ण। विद्यार्णवी गोरक्षास केले त्यांनी।।२१।। निरोपिती ब्रह्मज्ञान, रसायन, कविता। वेद, शास्त्र, ज्योतिष तथा। व्याकरण, धनुर्धर, जल तरंगता। संगीत,काव्य अकरावे।।२२।। अश्वारोहण कोकशास्त्र। निपुण नाट्य तथा चार। चतुर्दश विद्यांचा सागर। पूर्णपणे निरोपिला।।२३।। सकळ शास्त्री तैसेची केला प्रवीण।वातास्त्र,जलदास्त्र,कामास्त्र,वातकर्षण। पर्वतास्त्र,वज्रास्त्र,नागास्त्र,संजीवन। ब्रह्मास्त्र,रुद्रास्त्रादि निरोपिती।।२४।। यावरी साबरीविद्या कवित्व। प्रत्यक्ष करुनी सकळ दैवत। तयांचा वरदपाणी निश्चित। गोरक्ष मौळी मिरविला।।२५।। असो वर देऊनी सद्विद्येसी। सकल वंदिती मच्छिंद्रासी। म्हणती महाराजा गोरक्षासी। तपालागी बैसवी।।२६।। असो ऐशा प्रकारे एके दिवशी। गोरक्ष घोकिता सद्विद्येसी। मंत्र संजीवनी पाठ मुखासी। करीत बैसला होता तो।।२७।।

तदा हाती कर्दम घेऊन मुले खेळती। शकट करुन दे गोरक्षा म्हणती। तो म्हणे मज न ये च निश्चयेसी। तदा ती स्वत:च शकट निर्मिती।।२८।। मग ती म्हणती गोरक्षाप्रती। आम्हा करुनी दे शकट सारथी। मग कर्दम गोळी घेऊनी हाती। रचितसे गोरक्ष उत्तम पुतळा।।२९।। गोरक्ष मुखी संजीवनी जपत। म्हणून पुतळ्यातुनी प्रकटे बालक। दृश्यत्व पावले संजीवन अर्थ। करभंजन जन्मला।।३०।। भूतभूत म्हणत बालके पळती। भयभीत मुले थरथर कापती। पाहुनी मच्छिंद्रनाथ बालकांप्रती। पूसे काय घडले जी।।३१।। मुले सांगती वृत्तांत निश्चिती। म्हणे प्रकटले भूत गोरक्षाहाती। म्हणून पळालो भयभीत चित्ती। गोरक्षास भक्षिले असेल त्याने।।३२।। मग मच्छिंद्र जाती त्या ग्रामी। ट्याहा रडता पाहे बालका लागुनी। करभंजन प्रकटला हे जाणूनी। उचलोनी हृदयी कवळिती।।३३।। मग शोधूनी गोरक्षनाथास।मच्छिंद्र म्हणती तयास। ऐकूनी त्याच्या वृत्तांतास। म्हणती अरे करभंजन प्रकटला।।३४।। ग्रामजन म्हणती वृत्त ऐकोनी। बाळाचे कष्ट करु पाहे जननी। करुन देऊन यासी धर्म जननी। तियेते हे बालक अर्पावे।।३५।। कोणासी अर्पावे मच्छिंद्र पूसती। द्यावे यासी मधु नामा विप्रासी। पतिव्रता गंगा तयाची पत्नी। झुरती प्रतिदिन पुत्रासाठी।।३६।। मच्छिंद्र वदती मधु गंगे प्रती। बालक हा असे अति तेजस्वी। स्वपुत्रासमे सांभाळावे यासी। बारा वर्षानंतर येईल गोरक्ष।।३७।। गंगा मग पूसे बारा

वर्षानंतरी। बालक घेऊन जाल मजकडूनी। मग माझे जननीपण या जगी। कैसे मी मिरवावे।।३८।। म्हणती संशय नको सांगतो तुज। तू माय हा तुझाच सुत। करभंजन नाव ठेवी यास। अति वात्सल्ये सांभाळी।।३९।। बारा वर्षानंतर येईल गोरक्ष। देईल यासी अनुग्रहास। पुढे जाईल तो तीर्थस्थानास। बालक राहील तुजजवळी।।४०।। ऐसे बोलून निश्चित वचन। बालक त्या सतीस अर्पून। आपणासवे गोरक्षास घेऊन। मच्छिंद्र तीर्थस्थानास निघाले।।४१।। यावरी गोरक्ष मच्छिंद्रनाथ। पातले हिमाचल बद्रीकेदारात। तेथे बद्रिकाश्रमी शिवालयात। वंदूनी शिवासी आराधिती।।४२।। अंकी गोरक्षा घेतले शिवाने। सकल विद्याभ्यास याचे म्हणे। तपाविण विगलित साच ठेले। बैसवी यास तपास मम आश्रमी।।४३।। ओम म्हणूनी आदिनाथा विनवोनी । मच्छिंद्र निघाला तीर्थाटनी। सकल महीची तीर्थे करुनी। सेतुबंध रामेश्वरी जाऊन पोचला।।४४।। वायुसुतास नमी मच्छिंद्रनाथ। आनंदला मग मकरध्वजतात। ओढूनी मग मच्छिंद्र हस्त। आवडी हृदयी आलिंगला।।४५।। तयासी मग म्हणे मारुती। जाऊनी त्वा स्त्रीराज्याप्रती। पूर्ण करीन मैनाकिनीची रती। वचन दिले मज महाराजा।।४६।। ऐसी ऐकून हनुमंतवाणी। अवश्य म्हणे मच्छिंद्रमुनी। स्त्री राज्यी विराजीतसे मैनाकिनी। उभयता तत्र गमन करती।।४७।। मग उभयतांचे करुन स्वागता। म्हणे वातनंदना अंजनीसुता। द्वितीय हे कोण

सांग आता। आपल्या आगमे आनंद झाला।।४८।। तो म्हणे तपास्तव भक्ती वरदावळी। पुरुष लाधशील मच्छिंद्रबळी। तोची हा होय येणे काळी। रतिसुखा तव निववावे।।४९।। मग मारुती सेतुबंधा येऊन। बैसला करीत राम चिंतन। येरीकडे मच्छिंद्र नंदन। सुखामाजी हेलावे।।५०।। मग ऋतु पावली राजसबाळी। ते कामरतीचे सुखे वेळी। भद्रमुनी अंशे प्रगटुनी रती। देह धरिता पै झाला।।५१।। तदनंतर मैनाकिनी प्रसुत झाली। जन्म तिने दिधला पुत्रासी। बाळ म्हणजे प्रत्यक्ष बालार्क देखूनी। मीननाथ नाम ठेवीले।।५२।। असो इकडे हस्तिनापुरी कुरुनंदन। बृहद्रवा करीतसे राज्यशासन। ज्याने केला उत्तम यज्ञ। रक्षेतुनी बाळ प्रगटला। ।५३।। मग परमप्रेमे घेऊनी हस्ती। आला धर्मपत्नी सुलोचने प्रती। ती पुसे कवणाचे बालक हस्ती। म्हणे यज्ञी प्रसाद लाधला।।५४।। वंशासी आपल्या मीनकेत। दिव्य स्वरुपा आहे हा सुत। तयाचा पाठीराखा निश्चित। ईश्वरे स्वये प्रेषिला।।५५।। यज्ञकुंडीच्या ज्वाळामाळी। प्रसन्न झाला तेणे काळी। ज्वाळात उदेला म्हणूनी सकळी। नाम जालिंदर ठेवीले।।५६।। मग योग्य वयी करुन मौजीबंधन। नंतर मग करुन विवाह संपन्न। द्यावा याते गृहस्थाश्रम। बेत त्यांनी योजिला।।५७।। परी बाळ तो अति विलक्षण। जाणूनी मात पित्याचे मन। निघाला मग तो घर सोडून। महाकाननी तो प्रवेशला।।५८।। परी तेथे घडले विपरीत। वनी वणवा लागला बहुत।

ज्या दरीत होता जालिंदर। वैश्वानर तेथे पसरला।।५९।। मग शांत होऊनी मूर्तिमंत। बाळ त्वरे केला जागृत। तयासी सांगतसे मी वैश्वानर। जननी जनक तुझा मी।।६०।। पित्या लागुनी मग तो म्हणे। कामना विरहीत मन माझे। मम नर जन्माचे सार्थक व्हावे। ही विनंती तव चरणी।।६१।। पुत्र वचन ऐकून तोषला अनल। धन्य म्हणतसे बालकज्ञान। मग अनुसुया नंदनाप्रती गमन। पुत्रा समवेत तो करी।।६२।। पाहुनी उभयता पिता पुत्रा। आनंद झाला अनुसुया सुता। म्हणे कामना कोणती सांगा आता। पूर्ण अवश्य करीन मी।।६३।। अग्नि म्हणे या अनुग्रह देऊनी। शस्त्रास्त्र विद्या सकल ओपूनी। मिरवूनी याच्या गुरुस्थानी। धन्य याते करावे।।६४।। अत्रिनंदन म्हणे अवश्य। निवासावे मज समीप बारा वर्ष। मिरवोनी सर्व शस्त्रास्त्र। विद्या पारंगत करीन मी।।६५।। कृपा दाट होता नव्हाळी। वरदहस्ते त्याने स्पर्शिता मौळी। कर्णी ओपिता मंत्रावळी। अज्ञान काजळी फिटतसे।।६६।। मग सवे घेऊनी जालिंदरासी। नित्य गमन करी महीसी। स्नान करुनी भागीरथीसी। विश्वेश्वरासी नमिताती।।६७।। तेथूनी भोजन पांचाळेश्वरी। भिक्षा मागावी कोल्हापुरी। निद्रा जयाची मातापुरी। माहुरगड त्या म्हणताती।।६८।। असो ऐसे द्वादश वर्षांत। सकळशास्त्री प्रवीण केला नाथ। आयुष्य भविष्य गमनार्थ। सकळ विद्या निरोपिल्या।।६९।। अत्रिनंदन म्हणे संतुष्ट होऊन। एक वचन करावे द्विमूर्धन। दैवते

करुनी द्यावी प्रसन्न। वरालागी महाराजा।।७०।। अवश्य म्हणूनी वैश्वानर। जालिंदरा वाहुनी स्कंधावर। भुवनत्रयी फिरुनी समग्र। केली प्रसन्न सकळ दैवते।।७१।। सकल दैवते वर देऊनी त्यासी। सांगाती झाली पूर्ण तयासी। तेणे पावेल सकल सिध्दिसी। ऐसे सकळ वदलेती।।७२।। मग आले उभय बद्रिकाश्रमी। बदरीनाथे त्यांते त्रिरात्र ठेवूनी। सांगे त्यांसी विधीची करणी। तयाचा बिंदूरेत गजकर्णी पडला।।७३।। तोच प्रबुध्द नारायण विख्यात। अवतार दिक्षा देह स्थित। दिग्गजाच्या त्या कर्ण विवरात। तयासी शिष्य म्हणूनी मिरवावा।।७४।। ते म्हणती आता कृपा करोन। दाखवावे आम्हासी गजस्थान। शिवाने तयांसी हिमाद्री आणून। दिग्गजमूर्ती दाखवला।।७५।। जालिंदर तयासी म्हणे ये बाहेरी। कर्ण कानिफ नाम तव देहावरी। ऐकून कानिफ येऊनी कर्णद्वारी। नमस्कारी तयांते प्रेमाने।।७६।। मग जालिंदरे देऊनी हस्त। खाली उतरविला कर्णसुत। स्कंधी वाहूनी स्नेहभरित। शिवापाशी तो आला।।७७।। शिवासी त्याने केले वंदन। शिवाने त्याते प्रेमे कवळून। जालिंदरा मग बोले वचन। अनुग्रह देऊनी सविद्य करावा।।७८।। मग त्याने स्पर्शोनी चंद्रमौळी। कर्णी तयाच्या ओपूनी मंत्रावळी। पारंगत करुनी शस्त्रास्त्री। सविद्य त्या कानिफा केले।।७९।। मग जालिंदर म्हणे देवतांप्रती। वरप्रदान आपण करावे यासी। दैवते म्हणती तुम्ही शिष्य अगणित मिती। वर किती हो ओपावा।।८०।। निघाली

दैवते विमानी बैसोनी। जालिंदरे कोपे वातास्त्र मंत्रूनी। मग अस्त्रा भिडोनी अस्त्रानी। तुंबळ युद्ध तयांत माजले।।८१।। अंती कामिनी अस्त्र प्रकट करता। फजिती दैवता झाली असता। कानिफ दैवताते वसन झाला देता। संतुष्ट दैवते जाहली।।८२।। मग दैवते कानिफाते वरदहस्त देत। जालिंदर म्हणे करीन मी ही साबरी कवित्व। त्याते तुम्ही सर्वांनी असावे साह्य। अवश्य म्हणूनी ती वचन देती।।८३।। हरहरी हसती पाहुनी ही फजिती। त्यानंतर तयांसी बोले उमापती। नागपत्र अश्वत्थ स्थानी करुन आहुती। त्वा कवित्व रचावे।।८४।। मग जालिंदर आणि कानिफनाथ। द्वादश वर्षे राहुनी तेथ। चाळीस कोटी वीस लक्षात। उभयी चरित्र रचियले।।८५।। परम संतोषले मग उमापती। त्यांच्या समीप कानिफा बैसवूनी तपासी। श्री जालिंदर निघे तीर्थयात्रा प्रवाही। हेलपट्टणी तो पातला।।८६।। तेथे तृणभार मिरवोनी माथी। पितामह वायुकृपा त्यावर होती। म्हणून अधर चाले मस्तका वरती। लोक पाहती निजदृष्टी।।८७।। मग तेथील सकल जन। करु इच्छिती जालिंदर दर्शन। परी ते न आवडे तयालागून। गल्ली कुची वस्ती तो करीतसे।।८८।। तेथे गोपिचंद विराजे नृपनाथ। तयाची माता सद्‌गुण भरीत। मैनावती तियेचे नाम असत। जालिंदरास तिने देखिले।।८९।। परिचारिकेस म्हणे ती मैनावती। कोणे स्थानी हा राही वस्ती। वार्ता पाहूनी यावे निश्चिती। अवश्य म्हणून ती

गेली।।९०।। परतुनी ती मैनावतीस वदत। कुश्चित जागा दुर्गंध व्यक्त। तया स्थानी एक पिशाचवत। निर्मोही तो वसतसे।।९१।। मग तबकी उत्तम फळे घेऊनी। उभयता आल्या त्या स्थानी। विनम्रते नमिती त्याच्या चरणी। कसोटी तियेची तो पाहतसे।।९२।। तो तिजवरी महीचे पाषाण फेकी। परी ती आपला ठाव न सोडी। मग हस्ते झाडूनी पाषाणझाडी। किमर्थे आलीस पुसतसे।।९३।। ती म्हणे ही प्रपंच रहाटी। कृतांत सदैव असेच पाठी। परी हे संसाराचे ओझे निवटी। कृपा झणी करुनीया।।९४।। गुरुभक्ती अति दावूनी प्रेमा। सेवा ती करतसे मनोधर्मा। ऐसी सेवा करता षण्मास उगमा। दिन लोटून गेले पै।।९५।। यापरी कोणे एके दिवशी। काळुखी दाटली अपार महीसी। तिच्या अंकावरी ठेवून मस्तकासी। गुरु निद्रा करीतसे।।९६।। मायिक भ्रमर अंकी पाडुनी छीद्र। रुधिर दाटले मही अपार। ते पाहुनीया जालिंदर। गुरुभक्ती धैर्य ओळखीतसे।।९७।। मग त्याने मंत्रोपदेश ओपिला कानी। खूण व्यक्त दाविली संजीवनी। तेणे खूणे पारायणी। ब्रह्म व्यक्त ती झाली असे।।९८।। मग नित्यनित्य प्रेमभक्ती। विशाल मिरवे ती भावस्थिती। परी एक काम उदेला चित्ती। पुत्रमोहें करुनीया।।९९।। म्हणे चिरंजीव पद देऊनी माते। अचल केले त्रैलाक्याते। याच रिती माझ्या सुताते। कृपा करावी महाराजा।।१००।।

चालीता वाट जीवनाची सतत सुखाची असते आस। समृध्दि येता मागोमाग पडे दु:खविळखा देती ती साद। अडवूनी वाट सुखाची करती नर्तन अक्राळ विक्राळ। दु:खांचा अन् असमाधानाचा करिती ती भडीमार। काळ योनीरुप भूतप्रेतादिक नाचविती देहास। नाशविती सुख अन् करविती आसक्त दु:ख। भक्तिभावे करिता नऊ बालवीरांचे महात्म्य कथन पठण। सारुनी दूर सावट भूतादिकांचे करती मुक्त जीवन। नाठाळ अटकळपणा जरी करतील ते भूत। स्वसामर्थ्याने तया करतील ते नेस्तनाबूत। करिता हया अध्यायाचे भक्तिभावे पठण। हा हा कार करुनी भूत प्रेतादिक शरण। करतील रक्षण भक्तांचे नवनाथ घालून पांघरुण। अभय देऊनी भक्ता नवनाथ करतील सुखे पालन।।

। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु ।

।। श्री ।।

# ।।अध्याय चवथा।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री नवनाथाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

जयजयाजी पंढरीनाथा। समचरणीं भक्तताप शमिता। कटी कर नासाग्री दृष्टी ठेवता। पुंडलीकासाठी तू प्रकट झालासी।।१।। भक्तप्रेमी तू करुणासागर। बोलवी तू नवनाथ भक्तिसागर। करी नवनाथ नवशती साकार। कृपा कटाक्ष ठेवी गणेशावरी।।२।। जालिंदर कृपे ब्रह्मार्णवी दाटली। ब्रह्मैक्य पावली मैनावती। परी मोहे पुत्राचे ती ग्रासली। म्हणे याचा उद्धार कैसा होई।।३।। पुत्र गोपीचंद एके दिवशी। सह स्त्रीवृंद बैसला स्नानासी। पाहुनी ऐसे भोग माय दुःखी। पडले अश्रु भूप शरीरी।।४।। बिंदू पाहुनी शंकीत होऊनी। पाही तो ऊर्ध्वदृष्टी करुनी। आश्चर्य भरीत झाला देखूनी। माता रुदन करीतसे।।५।। जननी चरणी ठेवूनी माथा। जोडुनी आपल्या उभयहस्ता। म्हणे मजसारिखा सुत असता। दुःख का करीशी माते।।६।। दुःख कारण सांग मज आता। हरीन तव दुःख सरिता। न तरी

मी तव पुत्र कैसा। मिरवितो नृप जगालागी।।७।। म्हणे ती कृतांत महीं विखार। भयभीत करी वारंवार। टपूनी बैसला जैसा मांजर। मूषकाते उचलावया।।८।। आपण आपुले पहावे हीत। सारासार नरदेहांत। भक्तीने वश करुनी रघुनाथ। चिरंजीव झाला बिभीषण।।९।। ऐसा प्रकाश सांप्रदाय मिरवून। नारद शुक झाले ब्रह्म सनातन। तेवी तू बाळा माझा नंदन। जगामाजी मिरवी का।।१०।। या उपरी बोले नृपनाथ। बोलसी माते सत्यार्थ। परी प्रस्तुत काळी ऐसा नाथ। कोण मिळेल आम्हाते।।११।। ऐसी ऐकूनी तयाची मात। त्याते बोलती झाली मात। नाथ तैसाची आपुले गावात। जालिंदरनामे मिरवितसे ।।१२।। ऐसा नाथ जरी मिळे मजसी। तन, मन, धन ओपीन चरणासी। तरी तू आता वाईट चित्तासी। सहसा न मानी जननीये।।१३।। ऐसे वदोनी समाधानी। नृप गेला स्नानालागुनी। परी लुमावती त्याची कामिनी। गुप्तवेषे श्रवण करीतसे।।१४।। लुमावती मग पट्टराणी। राज स्त्रीया बोलावूनी सदनी। म्हणे मैनावती राज जननी। राजास जोग देऊ म्हणतसे।।१५।। आपल्या गावात जालिंदर। जोगी आहे वैराग्यपर। त्याचाच अपाय करुनी थोर। संकटाते निवारावे।।१६।। निवेदावे आपण रायास। काम न आवरे मैनावतीस। भोगण्या त्या जालिंदरास। जोग पुत्रास देऊ पाहते।।१७।। ऐसे सकळ सांगून रायाते। उदय करावा कोपानळाते। मग जालिंदरनाथ सहजते। होईल भस्म

कोपामाजी।।१८।। निशा होता राव प्रवेशी अंतःपुर। रतिसुखाचा मग करुनी आदर। लुमावती जोडोनी कर। रायासी ती बोलतसे।।१९।। म्हणे आहे जी एक कुडे। मातेने रचिले तुम्हापुढे। जालिंदर योगी विषयपाडे। वश्य केला आहे तिने।।२०।। तुम्हासी त्याचा अनुग्रह देऊन। दूरदेशी तुम्ही जाता तपाकारण। जालिंदराप्रती देऊन राज्यासन। भोग भोगणे आहे तिजसी।।२१।। ऐसी ऐकूनी तियेची वार्ता। क्रोधानळ उचंबळला माथा। मग तैसाची उठोनी गेला। जालिंदराप्रती सह सेवक।।२२।। शीघ्र आणोनी कामाठ्यांसी। गर्ता योजिली कूपा सरसी। नाथ जालिंदरास ते उद्देशी। कूपामाजी लोटीला।।२३।। अश्वलीद तेथे पडली होती। लोटूनी ती त्या गर्तेवरती। नाथजती बूजवूनी त्या गर्ता। राय स्वस्थानी लोटला।।२४।। असो गर्तेमाजी जालिंदर नाथे। वज्रासन घालून खालते। आकाशास्त्र प्रेरुनी भोवते। स्वस्थचित्ती तो बैसला।।२५।। वार्ता समजे राजस्त्रीया लागून। जालिंदर गेला असे निघोन। स्त्रीयांचे होऊन परम समाधान। येऊनी पहुडल्या त्या सेजेसी।।२६।। असो पुढे आतां श्रोती। श्रवण करावी रसाळ उक्ती। सिंहावलोकनी घेऊनी गती। मागील कथा विलोकावी।।२७।। बदरिकाश्रमी पूर्ण तपासी। गोरक्ष कानिफा जान्हवी तीरासी। तप आचरिता द्वादशवर्षी। उद्यापन उरकीले।।२८।। कानिफा निघाला उत्तरदेशी। महापती तो गोरक्ष शेखी। उत्तरपूर्ण मध्य कोणासी। संचार करीत

चालिला।।२९।। प्रयाग, गया, काशी करुन। श्रीगुरुते शोधी गजकर्ण नंदन। यापरी पूर्ण दक्षिण कोण। गोरक्ष शोधी मच्छिंद्रा।।३०।। कोठे भेटेल मज गुरुनाथ। सांगेल परी मजला कोण। ऐसे भ्रमत गौड देशाकारण। हेळापट्टणी पातला।।३१।। जन म्हणती नाथ तापसी। आला होता या गावासी। नाम जालिंदर या जगासी। मिरवत होता महाराजा।।३२।। ऐसी ऐकून तयांची वाणी। गोरक्ष विचार करी मनी। स्वामीच नाम पालटूनी। जगामाजी विचरला।।३३।। गेला कोठे तो पूसे जना। वदती एक वर्ष राहून ग्रामा। कोठे गेला ते न ठाऊक आम्हा। हंबरडा गोरक्ष फोडीतसे।।३४।। मग कनवाळू ते जन सकल। म्हणती नाथा न करी तळमळ। तुम्हा मायलेकरांचा मेळ। ईश्वर करील पुढारा।।३५।। ऐसी वदुनी तयांनी वाणी। गावात धाडिला भिक्षेलागुनी। मग तो गोरक्ष सदनोसदनी। अलक्ष गाजवीत जातसे।।३६।। अल्लख ऐकूनी जालिंदरनाथ। अल्लख म्हणतसे मही आत। ते अल्लख स्वर गोरक्षाप्रत। श्रवण झाले तातडी।।३७।। गोरक्ष म्हणे कवण नामी। येरी म्हणतसे जालिंदर म्हणूनी। तो गोरक्षास पूसे गुरुनामी। गोरक्ष म्हणे मच्छिंद्रजती।।३८।। मग जालिंदर सांगे झाली कथा। कोपानळ पेटे गोरक्षमाथा। द्यावी म्हणती मजसी आज्ञा। नृपाचे भस्म करीन मी।।३९।। जालिंदर म्हणे या कार्या पुढील कार्य। जेणे दुणावेल नाथपंथ। तरी आपण आता क्षमा करुन। न बोलावे वर्तमान जगासी।।४०।।

मम सुत कानिफा भेटेल तुम्हास। सांगावा वृत्तांत त्यासी सकळीक। मज काढून करुन रायास कल्याण। वाढवील तो नाथपंथ।।४१।। येरीकडे कानिफनाथ। गावोगाव भ्रमण करीत। शिष्यालागी तो बोधीत। सच्छिष्य तयासवे चालती।।४२।। स्त्रीराज्याप्रती करिता गमन। म्हणती तो देश कठीण। वाचत नाही तेथ पुरुष रत्न। शिष्य फिरती माघारी।।४३।। मग कानिफ फेकी स्पर्शास्त्र। पदे झाली मही व्यक्त। हस्तही झाले मही लीप्त। कानिफा पुढती निघाले।।४४।। मग शिष्य गुरुसी विनविती। विभक्तास्त्र मंत्र कानिफा प्रयोजिती। सकल शिष्य मुक्त होती। वंदिती चरण सद्गुरुंचे।।४५।। दिन लोटल्या होता रात्री। भुभु:कार करण्या निघाला मारुती। कानिफा स्पर्शास्त्र प्रयोजिती। मारुती म्हणे प्रतापी येथे आलासे।।४६।। येता झाला तो सीमेप्रती। तो कटक पाहूनी नाथपंथी। म्हणे यत्ने करुनी स्त्रीराज्याप्रती। म्या मच्छिंद्रास पाठविले।।४७।। हे जाऊन बोधून मच्छिंद्रासी। आणतील तयासी स्वदेशी। होईल दु:खी मैनाकिनी सती। म्हणून हनुमान युद्ध आरंभती ।।४८।। हनुमान धरती पर्वतरुप। अस्त्र युद्ध मग प्रारंभी कानिफ। काळिका, अग्नी, इंद्र, वायु, अस्त्र। कानिफाने एकत्र योजिली।।४९।। हनुमंते अग्निअस्त्र अब्धी बुडविले। वायुस विनवून वायु अस्त्र क्षमवले। पिता वायुने हनुमंतास बोधिले। म्हणे रळी न करावी याशी।।५०।। अग्न्यस्त्रे उकळु लागले समुद्रजल। मग तो स्वत: होऊन मूर्तिमंत।

आपपती म्हणे त्या उभयतांस। सख्य करावे एकमेकाप्रती।।५१।। मग कानिफे त्रयांसी करुन नमन। पुसतसे मारुतीस रळीचे कारण। मारुतीची कामना श्रवण करुन। वदे नाही बोलणार मच्छिद्रासी।।५२।। कानिफ सहशिष्य स्त्रीराज्य प्रवेशी। पातला तो ग्रामद्वाराशी। ऐकून मच्छिद्र दचकला मानसी। म्हणे आला की गोरक्षनाथ।।५३।। मच्छिद्र येवोनी ग्रामद्वारी। कानिफास पाहोनी सामोरी। गुरुपंथा त्याने पुसली तयासी। जालिंदर जन्मापासून कानिफा सांगे।।५४।। मग मच्छिद्र म्हणे जालिंदरनाथ। दिला तुज अनुग्रह उत्तम यात। तरी तू कानिफा नाम सुत। गुरुबंधु रे तू माझा।।५५।। मच्छिद्र विचार करी चित्तात। कानिफा आता जाईल स्वदेशात। श्री गोरक्षका करील सर्वश्रुत। म्हणूनी यासी पाठवू नये।।५६।। यासी करावा येथेच राहता। करीतसे म्हणूनी बहु आतिथ्या। उद्भवावी मनी कामवासना। म्हणूनी उपाय योजितसे।।५७।। कानिफा असे सिध्द योगिराज। उपाय चालला नाही तेथ। लोटता ऐसाची एक मास। अनुज्ञा जाण्यास मागतसे।।५८।। मग अवश्य म्हणोनी मच्छिद्रनाथ। नानासंपत्ती द्रव्य ओपीत। गज वाजी उष्ट्र अमित। द्रव्यही बहुत तया दिधले।।५९।। सशिष्य लंघुनी स्त्रीदेश सुगम। पुढे गौड बंगाल स्थान उत्तम। फिरत असता हेळापट्टण ग्राम। कीर्ती तयाची बहु होतसे।।६०।। कीर्ती त्याची ऐकून नृपनाथ। पुढे प्रेरिता झाला दूत। दूतांकरवी उत्तम

वृत्तांत। मुनिकटकाचा आणविला।।६१। पुढे नाथध्वज येऊन।शिबिरे चालती त्यामागून। शिष्यकटकासी मागुनी गमन। कानिफनाथाचे होतसे।।६२।। कानिफे पाहीले गोरक्षासी। गोरक्षे पाहीले कानिफासी। दृष्टादृष्टी होता आदेशी। एकमेकाशी बोलू लागले।।६३।। कानिफ गुरु कोण पुसे गोरक्षास। तो मच्छिंद्र जन्मा पासून कथा सांगत। मच्छिंद्र मम गुरु मी दासानुदास। नाथपंथ असे आमुचा।।६४।। मग गोरक्ष पूसे कानिफालागून। कानिफा सांगे जालिंदरकथन। जन्मापासूनी त्याचे सकल वर्तमान। दत्तकृपा ही असे आगळी।।६५।। कामना उदेली कानिफा चित्ती। की मच्छिंद्र गुरु गोरक्षाप्रती। दत्तकृपेचे अनुसंधान याजवरती। पाहू कैसे असे विद्यारत्न।।६६।। तोच दृष्टीसमोर आम्रवन। पक्व फळी देखिले सघन। म्हणे वाटते करावे भक्षण। गोरक्ष नको नको म्हणतसे।।६७।। मग गोरक्ष म्हणे असे करावे। शिष्यांस तेथे न प्रेषावे। गुरुप्रसादे प्रताप मिरवावे। आम्रफल आणवावे आपण येथूनी।।६८।। कानिफा कवळुनी भस्मचिमुटी। विभक्तास्त्र आकर्षण मंत्र पोटी। मंत्र प्रेरुनी फेकी भस्मचिमुटी। वृक्षावरुनी फळे तयांपुढे आली।।६९।। गोरक्ष विचार करी मनी। कानिफे दाविला प्रताप मजलागुनी। आपणही दावू विद्या चमत्कारासी। कानिफाते मग बोलतसे।।७०।। भक्षुन फळे ही उत्तम राहीली। परी जैसी तैसी करावी वहिली। पुन्हा त्यांस योजूनी वृक्ष डहाळी। पुढील मार्गी

गमन करावे।।७१।। कानिफ पुसे ऐसा कोण ब्रह्मासुत। करी तैसे पुन्हा निर्मोनी मूर्तिमंत। गोरक्ष म्हणे जो गुरुपुत्र पवित्र। नसे अघटित हे करणे त्यासी।।७२।। ऐसे वचन ऐकोनी कानिफनाथ। क्षोभे म्हणे तव गुरु मच्छिंद्रनाथ। स्त्री राज्यी असे बनुन मैनाकिनी नाथ। भोग भोगितसे पापांचा।।७३।। गोरक्ष म्हणे तुझा जालिंदरनाथ। प्रतापहीन शक्तीहीन बहुत। लीद गर्ती पचवीतसे दशवर्ष। बंगालदेशी हेळापट्टणी।।७४।। आता मग गुरु प्रतापी कैसा। भक्त सोडवीत असे नरक क्लेशा। तयाचा वर प्रसाद असे कैसा। आताची तू पाही रे भ्रष्टा।।७५।। मग तयाने संजीवन जल्पून। दिली फळे होती तैशी ठेवून। कानिफा मग गोरक्षास आलिंगून। म्हणे तव कृपे गुरु शोध लागला।।७६।। मग गोरक्ष जाई स्त्री राज्याप्रती। कानिफा येई हेळापट्टण पंथी। वृत्तांत समजता गोपीचंद रायासी। सपरिवार तो आला सामोरा।।७७।। पाहुनी तया क्षोभले कानिफ मन। या रायास जरी मी करीन भस्म। कार्ये माझे तैसेची राहील सुगम। मम गुरु कोठे ठावे याजसी।।७८।। गोपिचंदनृप कानिफा विनवितसे। कृपया ओपुनी अनुग्रहाते। आपला शिष्य म्हणून मजपरते। त्रिलोकी या मिरवावे।।७९।। म्हणे तो माझा अनुग्रह मागसी। परी ज्याचा अनुग्रह असे मजसी। तो माझा स्वामी महागर्तेसी। अश्वविष्ठेत तू स्थापिला।।८०।। मग राव पातला सदनाप्रती। सकल वृत्त सांगतसे तो मैनावती। ती सत्वर आली

शिबिराप्रती। म्हणे मी जालिंदर शिष्या असे।।८१।। मग ती विनवी कानिफासी। अयोग्य कृत्य घडले पुत्राहाती। परी भगिनीपुत्र म्हणून त्यावरती। गुरुकृपा आपण करावी।।८२।। मग जालिंदराचे अनुग्रहासहित। आश्वासीतसे तिजसी कानिफनाथ। सदनी येऊनी तिने सांगुन वृत्तांत। भयमुक्त गोपीचंद केला।।८३।। असो गोपीचंद दुसरे दिनी। नाथाग्रहे शिबिरी जाऊनी। मौळी ठेवूनी नाथाचे चरणी। उभा राहीला तो सन्मुख।।८४।। कानिफा पुसे नृपनाथासी। महीत कोठे घातले जालिंदरासी। अवश्य म्हणूनी नृप दाखवे सच्छिष्यांसी। मग पुन्हा ते आले शिबिरी।।८५।। मग रायासी म्हणे कानिफनाथ। जालिंदर काढायाची सांगा रीत। गोपीचंद म्हणे आपण समर्थ। सकळ जाणते सर्वस्वी।।८६।। गोपीचंदासी सांगे गजकर्णसुत। कनक, रौप्य, ताम्र, पितळ, लोहापासून। पाच पुतळे तू करवूनी आण। तुज समान हे राया।।८७।। मग गरतीकाठी आपण बैसोन। पुतळा त्यावरी ठेवोनी हेमवर्ण। राजाहाती कुदळ देवोन। घाव घाली असे म्हणतसे।।८८।। नृपाने घालिताची घाव। आतुन पुसे जालिंदर। कोण घाली घाव वदे नाम। नृप म्हणे मी गोपीचंद जी।।८९।। नाम ऐकून गरतीतून शापवचन। कनकप्रतिमेस झगटे वैश्वानर। क्षण न लागता महीवर। भस्म होऊनी पुतळा पडे।।९०।। मग रौप्यवर्णी पुतळयामागे। राव त्याने केला उभा वेगे। परी तैसेची जालिंदर शापयोगे। पुतळा झाला

भस्मपार ।।९१।। ऐसेची सर्व पुतळे भस्म होती। विचार मग मनी करी तपी। माझ्या क्रोधवडवानळातूनही। त्रिलोचनकुमर कैसा वाचला।।९२।। कानिफा नृपास सांगे घाव घाल। जालिंदर पुसे तू कोण आहेस। ऐकून गुरुवचन बोले गजकर्णनंदन। स्वनामा मागे गोपिचंद नाम सांगतसे।।९३।। मग गर्तेबाहेर येवोनी नाथ। प्रेमे आलिंगला सुत। म्हणे बा प्रसंगे होतासी येथ। म्हणोनी नृपनाथ वाचला।।९४।। मग गोपीचंदास बोले अग्निनंदन। बाळा बा झालासी तू चिरंजीव। परी अशाश्वत शाश्वत दोन पद। आवडेल ते स्वीकारी बा।।९५।। मग नृप म्हणे गुरु महाराज। मौळी मम ठेवावा वरदहस्त। मग नृपमौळी जालिंदरे स्पर्शून। कर्णी मंत्रावळी ओपिली।।९६।। मग भस्मझोळी भिक्षाझोळी देऊन। पाठविले तयासी राजसदनास। ते म्हणती ऐशा वेशी युवती भेटून। तपालागी जाई बा।।९७।। तैसा तया पाहुनी स्त्रीया शोक करती। परी तयासी पाहुनी मैनावती। सिध्दान्न भिक्षा देई पुत्राप्रती। भिक्षा घेई म्हणतसे।।९८।। ऐसा राजगृहीचा वत्तांत ऐकून। मान तुकवी अग्निनंदन। तीन रात्री तयासी ठेवून। बहुता अर्थी उपदेशिला।।९९।। मग तयासी प्रेषूनी बद्रिकाश्रम। पुत्र मुक्तचंदा राज्यी बैसवून। राजस्त्रीयांचे करुनी समाधान। सर्वांस मैनावती करी ओपीले।।१००।।

व्यवहारी या जगात करती मानव सतत धडपड। प्राप्त करुनी आनंद भरती ते सुखाची कावड।।
संचय करुनी पैका अन् धातु कनकादिक। हरोनी द्रव्य तस्कर घालिती दुःखाचे घणघाव।।
येता परि भक्तिभावे नवसिध्दांस शरण। होई क्षमन गवसती तस्करादिक अन् धन।।
करतील पालन हे नवसिद्ध करोनी मंत्रपठण। करतील शांत भक्ता सारी संकटे निवारुन।
देतील सुखाची छाया भक्तास होऊनी प्रसन्न। मोहमाया नाशतील देतील आनंद कृपा करुन।।
नवनाथ नवसिद्ध हे सिध्दिंचे असती माहेरघर। करिता हया अध्यायाचे पठन व्हाल संकटांतूनी पार।।

।श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

।।श्री।।

## ।।अध्याय पाचवा।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री नवनाथाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

जयजयाजी करुणासागरा। पंढरीनाथा रुक्मिणीवरा। भक्तिसार कथा पुढे चालवावया। मति द्यावी या सिंधुसुतासी।।१।। गोपीचंद मग स्वग्राम सोडूनी। फिरे भिक्षा मागत ग्रामोग्रामी। आहारापुरती भिक्षा मागुनी। पुढे गमन तो करीतसे।।२।। त्याची भगिनी चंपावती। पौलपट्टणी तिलकचंद नृप पत्नी। गोपीचंदाची वार्ता ऐकोनी। सासुसासरे करिती टीका।।३।। येरी कडे हा गोपीचंद। पाहता पाहता ग्रामवृंद। पौलपट्टणी येऊन शुद्ध। पाणवठी तो बैसला।।४।। परिचारिका तया देखती नयनी। मग त्या राजसदना परतोनी। म्हणती गोपीचंद येऊन ग्रामी। पाणवठ्यावरी बैसलासे।।५।। नृप म्हणे भगिनीचे तया नाव सांगून। अश्वशाळेत ठेवा आणून। तेथेची तयाते भोजन घालून। बोळवावे तेथूनची।।६।। परिचारिका जाऊन गोपीचंदा म्हणती। भेटण्यास भगिनी चंपावती। नृपनाथे बोलाविले

तुम्हासी। तरी आपण चलावे।।७।। ऐशापरी अश्वशाळे माजी नेवोन। बैसविला तेथेची नृपनंदन। परिचारिका म्हणती देऊ धाडून। तुमची भगिनी चंपावतीते।।८।। मग ती परिचारिका घेवोनी अन्न। अश्वशाळेत आली लगबग करोन। म्हणे महाराजा भोजना अन्न। आहे पाठविले तुम्हासाठी।।९।। मानापमान दोन्ही समान। पाळिताती सिध्द योगीजन। ऐशिया विचारी लक्षुनी मन। गोपीचंद भोजनास बैसला।।१०।। मग हस्ती धरुन चंपावतीसी। वेगे मेळी आणिले निगुतीसी। मग हस्त उचलोनी तियेसी। रायाते दावित्या जाहल्या।।११।। म्हणती त्या होता प्रजानाथ। ऐसा कासया आला सोयरेगृहास। येवोनी बैसला अश्वशाळेत। भोजन करितो निर्लज्जापरी।।१२।। ऐसे नानापरी त्या युवती। कीटक शब्दे तया निंदीताती। ते शब्द ऐकोनी चंपावती। परम दु:खी झालीसे।।१३।। मग ते स्त्रीमंडळ सोडोनी। चंपावती आली स्वसदनी। खंजीरे स्व उदर फोडूनी। प्राणरहीत ती झाली।।१४।। ते पाहुनी युवती कोल्हाळी। धावती झाली स्त्री मंडळी। प्राणगत झाली पाहता बाळी। एकची कल्लोळ माजविला।।१५।। अश्वशाळेत मग गौडनाथ। अश्व रक्षका लागी पुसत। एवढा कोल्हाळ का सदनांत। झाला आहे कळेना।।१६।। अश्वरक्षकासी हे होता श्रवण। ते करती सर्व वृत्तांत कथन। म्हणे मनी मीच दु:खाचे कारण। दाखवीन मी यांते नाथपंथ।।१७।। मग स्मशानवटी जाऊन तेथे। म्हणे भस्म

करु नका प्रेताते। गुरु जालिंदरास आणून येथे। चंपावती उठवीन मी।।१८।। मग ते म्हणती तिचा वाम कर। काढून देतो जाई सत्वर। पाहू दे गुरुचा चमत्कार। रक्षू आम्ही ह्या प्रेताते।।१९।। वृत्त समजता जालिंदर धावला। नमुनी गोपीचंदे त्या वृत्तांत कथिला। वेगे उभय पोचले पौलपट्टणाला। राजांगणी उभय संचरले।।२०।। मग हस्त काढुनी दृष्टी। कवळून भस्म संजीवनी बोले होटी। भस्म होता सिंचन भुजेसी। हाके सरशी चंपावती उठली।।२१।। मग महाराजास होई पश्चाताप। जालिंदर मग म्हणे त्यास। सांभाळावे आपणही याच्या राज्यपदास। गोपीचंद जातसे तपासाठी।।२२।। जालिंदर राहूनी षण्मास प्रीती। मुक्तचंदा उपदेशिती अर्था अर्थी। कानिफासह शिष्य कटकाप्रती। घेवोनिया तीर्थास निघाला।।२३।। येरीकडे गोरक्ष स्त्रीराज्याप्रती जात। मार्गी चालता गुरु स्मरण मनात। गुरु असे आता संपत्ती मिरवीत। ओळखील मजला कैसा तो।।२४।। ऐसे तर्क वितर्क दाटले मनी। तो वेश्या कटक देखिले नयनी। कलिंगा नाम्नी तयांची मुख्य कामिनी। गोरक्ष विचार करीतसे।।२५।। जावे यासवे हा विचार चित्ती। बोलता झाला मग तये युवती। मी पण येतो आपुल्या सांगाती। कृपा करावी नेण्याची।।२६।। पाहुन त्याचे गायन सुस्वर वादन। कलिंगा विस्मय करी मनोमन। म्हणे हा तर नर धूर्जटी वाटे मज। नाम तयासी ती पूसे।।२७।। म्हणे मम नाम असे पूर्वंडा। तया मग म्हणतसे

कालिंगा। पुरुषांचे आगमन नसे त्या देशा। मरण तयांचे होतसे।।२८।। गोरक्ष मग म्हणे शुभाननी। नको संशय आता तुज मनी। मग सीमेवरी विविधास्त्र प्रेरुनी। स्त्री देशांत त्यासवे तो जातसे।।२९।। येरीकडे निशा होता मारुती। निघतसे तो सिमेपरती। परी अस्त्रांचे प्रभावे पडे संकटी। श्रीराम धावा तो करीतसे।।३०।। तये समयी श्रीराम प्रत्यक्ष येऊन। म्हणे हा नाथपंथी भक्त जाण। तयासवे रळी हे वायुनंदन। करु नये तू सहसाही।।३१।। मग तयासी वदे वायुनंदन। हा गोरक्ष स्त्रीदेशी जाऊन। मच्छिद्रा येईल तो घेऊन। मैनाकिनी दुःखी होईल की।।३२।। गोरक्ष मच्छिद्रा नेणार नाही। ऐसी युक्ती परी योजावी। ऐकून श्रीराम वदे मारुतीसी। चाल मग गोरक्षा भेटावया।।३३।। ग्रामानिकट स्वस्वरुपाते पालटोन। येती याचकपण धारण करोन। पाहून तया गोरक्ष करी नमन। म्हणे आपण भूदेव नोहेती।।३४।। दावू स्वपंकज ऐसे श्रीराम वदती। मान तुकवी तया मग प्राज्ञमूर्ती। मग प्रकट करुनी स्वरुप प्राप्ती। नाथ प्रेमे हृदय कवळिला।।३५।। मग म्हणे मैनाकिनी नृपदारा। परम ती आचरली तपाचारा। वचनी गोंवूनी मग वायुकुमरा। नाथ मच्छिद्राते मागितले।।३६।। त्याचसाठी एक मागणे तुजसी। अन्य काही नाही तपोराशी। तरी तू जाऊनी तया भेटीसी। मच्छिद्रा स्वसवे नेऊं नको।।३७।। गोरक्ष म्हणे हे इतकेच सोडोन। मागाल तरी देईन मी प्राण। परी या देशी मच्छिद्र जाण।

ठेवणार नाही सहसाही।।३८।। ऐसे बोलता तो गौरीनंदन। मारुतीसी क्रोध आला दारुण। परी तयासी म्हणे रघुनंदन। इतका अनर्थ कासयासाठी।।३९।। प्रारब्ध योग ऐसा असेल म्हणून। युक्तिने शांत केला वायुनंदन। मग गोरक्षा हृदय कवटाळून। रघुनंदन चालला।।४०।। असो स्वस्थाना गेला अयोध्यानाथ। येरीकडे अंजनीसुत। धारण करुनी सानवेष। मैनाकिनी प्रती पातला।।४१।। कीलोतळा आणि मैनाकिनी। तृतीय नाम तिचे पद्मिनी। कवर्णे अर्थी ही नामें मिरवीती। श्रवण करावे श्रोत्यांनी।।४२।। पर्वतामाजी मंदरगिरी। सिंहलद्वीप त्याची पायरी दुसरी। पद्मिनी जितक्या असती नारी। मैनाकिनी मुख्य त्यात असे।।४३।। एके दिवशी अभ्यंग करुनी। उभी राहिली धवळारी जाऊनी। उपरिचर वसु बेसावध बैसुनी। विमानातूनी जातसे।।४४।। विमानावरी गवाक्ष द्वार। त्यातुनी दिसे अवयव समग्र। मैनाकिनी ते दृष्टी पाहून। खदखदा ती हसतसे।।४५।। मग कोपे वदे तो मैनाकिनी। गदगदा हसशी मज पापिणी। पडशील तू ग स्त्रीदेशी जाऊनी। मग कैचा पुरुष पाहसी।।४६।। विनवूनी मग तयासी पश्चातापे। आपण आहा शांति भांडारे। कनवाळू आपण उःशाप देऊन माते। करावे महाराजा पदाश्रित।।४७।। मग तो म्हणे पद्मिनी ऐक वचन। स्त्रीराज्यात कीलोतळा स्वामीण। तिचे आयुष्य सरल्या पूर्ण। तै पदी बसशील तू माये।।४८।। परी मज भावे निवेदले चित्त। तरी महीं मिरवेल माझा

सुत। तो तुज स्वीकारुन होईल रत। मच्छिंद्रनाथ म्हणोनिया।।४९।। तुज पुत्र झालीया शेवटी। विभक्ती होईल मच्छिंद्रजेठी। मग तू स्वपदा येऊन गोरटी। भोग भोगी स्वर्गीचा।।५०।। तरी असो हे सारे कथन। वायुसुत म्हणे मैनाकिनी लागून। आता तव सुखासी पातले विघ्न। मच्छिंद्र शिष्य येतो की।।५१।। गोरक्ष असे तयाचे नाम। तुष्ट त्वा करावे तयाचे मन। ऐसे सांगून वायुनंदन। स्वस्थानी गमन करता झाला।।५२।। येरीकडे गोरक्षनाथ। वेश्याकटकी मार्गी येत। मुक्काम मुक्कामासी साधत। राजद्वारी तयासवे पातला।।५३।। राजद्वारी पातला वेश्याकटक। ऐसी ऐकता कीळोतळा मात। म्हणे घेऊनी या सभास्थानात। अवघे सभारंभेसी।।५४।। असो नाट्यद्वारा कलिंगे सहीत। वेश्या उभ्या राहिल्या करु नृत्य। तै कटी कवटाळूनी मृदुंगास। कुशळ पुरवंडा वाजवितसे।।५५।। चतुर गोरक्ष वाजवी मृदुंग। 'चलो मच्छिंदर आया गोरक्ष'। ऐसे पुनःपुनः ऐकून अक्षर। मच्छिंद्र अस्वस्थ होतसे।।५६।। मच्छिंद्र म्हणे मज मारुतीने गोविले। न व्हावे तेची घडून आले। वैभव येथीले मी गौरविले। परी फोल तुजविण गोरक्षा।।५७।। गोरक्ष म्हणे मी आराधिला मच्छिंद्र। तोची मज गुरु मी शिष्य। तयाविण मज नसे अन्य लक्ष्य। प्रेमे मच्छिंद्र तया कुरवाळी।।५८।। शैल्यराज नितंबिनी। मुख्य नायिका कीलोतळा स्वामिनी। मोह दर्शवी गोरक्षा लागुनी। स्व सुताहुनी वेगळा।।५९।।

आसन वसन भूषणांसहीत। स्व इच्छे ती तया उपचारित। पैल करुनी स्वसुत मीननाथ। संगोपीतसे ती गोरक्षबाळा।।६०।। ऐसा असोनी विविधोपचार। बरें न मानी गोरक्ष अंतर। चित्ती म्हणे पडतो विसर। आपणास योग धर्म विचाराचा।।६१।। मग तो म्हणतसे मच्छिद्राप्रती। आपण वसता या देशाप्रती। परी हे सारे अयोग्य नाथपंथी। योग्य काही न वाटे मजसी।।६२।। तरी पहा हे कृपाळु महाराज। उभारिला आपण जो कीर्तिध्वज। तो ध्रुव मिरवेल तेज:पुंज। ऐसे काही करी महाराजा।।६३।। गोरक्षे विज्ञापना युक्तिप्रयुक्ती। करुनी तोषविला मच्छिद्रयती। मनीची निवटूनी विषयभ्रांती। विरक्तता उदेली मच्छिद्रमनी।।६४।। मग तो म्हणे हे गोरक्षनाथ। सोडूनी हे सकल मायापाश। जाऊ आपण आपुला देश। करतळभाष त्यास दिधली।।६५।। मग मैनाकिनीस सांगे गोष्टी। गोरक्षे वैराग्य उपजविले पोटी। तया भाषे संतुष्ट दृष्टी। वचनामाजी मी गुंतलो असे।।६६।। तरी आता ऐक वचनी। उपाय एकच आहे नितंबिनी। तुवाची त्याते घ्यावे मोहोनी। बहुधा अर्थी करोनिया।।६७।। प्रभाती तिज वदे गोरक्ष वचन। माते मज करु वाटते तीर्थाटन। तरी मच्छिद्रनाथा सवे घेऊन। तीर्था आम्ही जातसो ।।६८।। मग ती वदे गोरक्ष तूच धीर। राज्यभार आता तूची वाहणार। धाकटा बंधू सवे घेऊन। राज्याते तूच सांभाळी।।६९।। गोरक्ष म्हणे नको राजकारण। आमुची संपत्ती योगधारण। करुन सुकृत

क्रियाआचरण। सुखी वनी आम्ही असावे।।७०।। यावरी बोले ती कीलोतळा। षण्मास संगती द्यावी मला। थोडकिया साठी उतावळा। होऊ नको मम वत्सा।।७१।। गोरक्ष वदे आता कोणता दिन। सांगावा मजसी निश्चयेकरुन। येरी म्हणे संवत्सर प्रतिपदा दिन। बोळवीन सुखे तुम्हासी।।७२।। प्रतिपदादिनी पाक करुनी निगुती। गुरुशिष्य बैसवूनी एकपंक्ती। वाढीता बोलती झाली युवती। मीननाथाचे काय करावे।।७३।। मम उ:शापाचा समय आला आता। फळासी येईल तुम्ही जाता। उपरिचर वसु तुमचा पिता। येऊनी नेईल मजलागी ।।७४।। हे सांगायाचे एकची कारण। मीननाथा संगे न्यावे आपण। मग अवश्य म्हणे मच्छिद्रनंदन। भोजन करुनी ते उठले।।७५।। मग कीळोतळेते करुन नमन। स्कंधी वाहीला मच्छिद्रनंदन। श्री मच्छिद्राते स्वसवे घेऊन। ग्रामा बाहेर गोरक्ष आला।।७६।। मग कीळोतळेने गोरक्षासी चोरुन। कनकवीट आणली भांडारातून। मच्छिद्रनाथाचे करी अर्पून। भस्म झोळीत टाकली।।७७।। मग श्री गुरुचा धरोनी हात। लगबगे चालला गोरक्षनाथ। पाऊला पाऊली ते दूर जात। दु:खे आरंबळे कीळोतळा।।७८।। ऐशिया दु:खाची सबळ कहाणी। उपरिचर वसुच्या पडली कानी। मग तो स्वत: विमानी बैसोनी। तियेपाशी पातला।।७९।। तिज वदे तू स्वर्गवासिनी शुभाननी। येथे आलीस शापे करुनी। तुझे शापमोचन गे येथोनी। झाले आहे सुख

मानीका।।८०।। म्हणे द्वादश वर्षे झालिया पूर्ण। भेटवीन तुजसी मच्छिंद्रनंदन। मीननाथादि तपोधन। गोरक्ष दृष्टी पाहशील तू।।८१।। मग त्या वचने कीळोतळेने। दासी दैर्भाया राज्यपद ओपीले। मग विमानी बैसोनी स्वश्वसुरासवे। स्वर्ग मार्गे निघाली ती।।८२।। येरीकडे मच्छिंद्र अन् गोरक्षनाथ। स्कंधी वाहुनी मीननाथ। शैल्यदेशसीमा पार करुन। गौडबंगाली ते आले।।८३।। मार्गी चालता सहज स्थिती। तो कानिफा पूर्वी भेटला तयाप्रती। तेथे पातल्या त्रिवर्ग मूर्ती। गोरक्ष नेत्री अश्रु दाटले।।८४।। म्हणे याची ठायी कानिफाभेटी। झाली माते कृपा जेठी। तुमची वार्ता तया वाग्वटी। येथेची लाधली महाराजा।।८५।। पुढे मार्गी करिता गमन। जालिंदराचे वर्तमान। सांगता झाला गोरक्षनंदन। श्री मच्छिंद्राकारणे।।८६।। मार्गी करुनी उदधी स्नान। जगन्नाथाचे घेऊनी दर्शन। तीन रात्री तेथेची राहून। तीर्थ विधी ते सारिती।।८७।। तेथोनी निघोनी पुढे मार्गी। गमन करीत मग योगी। तो सौराष्ट्र मुक्काम प्रसंगी। जाऊनी तेथे राहीले।।८८।। सदनोसदनी भिक्षा मागोन। गोरक्ष आला परम श्रमोन। मच्छिंद्रनाथे मीननाथास उठवोन। शौचास बैसविला गल्लीत।।८९।। विष्ठे व्यक्त झाला मीननाथ। पाहोनी मच्छिंद्र गोरक्षा बोलत। म्हणे मीननाथा नेऊन सरितेआंत। धुवोनी आणी बाळका।।९०।। अवश्य म्हणोन गोरक्षनाथ। मीननाथास नेई सरितेआंत। संचार करित असता सरीतेत। उत्तम खडक त्याने

देखिला।।९१।। मग पदी धरोन मीननाथ। खडकावरी तया आपटोनी त्वरीत। त्वचा काढोनी त्याचे रक्तमांस। जळचरांते तो ओपीतसे।।९२।। स्वच्छ त्वचा घेऊनी आला सदनी। शिबीरे नसे मच्छिंद्र मुनी। मच्छिंद्र आला शांभवी घेवोनी। म्हणे कोठे आहे मीननाथ।।९३।। गोरक्ष म्हणे सुकु घातले आहे त्याते। मच्छिंद्र बाहेर येवोनी पाहतसे। मग न्याहळोनी त्याच्या त्वचेते। धरणीवरी तो पडला।।९४।। भूमी लोळे अश्रु नयनी। नेत्री ढाळिता न समाये पाणी। वक्षस्थळादि पिटूनी अवनी। दाखवा मीननाथ आंक्रदतसे।।९५।। मग गोरक्ष कवळुनी भस्म चिमुटी। संजीवनी मंत्र जपे ओठी। त्वचेप्रती सोडिता झाला मुष्टी। मीननाथ सजीव उठला।।९६।। मग गोरक्षे पूसे मच्छिंद्रनाथ। म्हणे तुवा यासी मारीले किमर्थ। गोरक्ष म्हणे मोह भावार्थ। पहावयासी तो तुमचा।।९७।। मग मच्छिंद्र म्हणे वत्सा ऐक। तू शिष्य माझा अससी एक। तरी म्या ही परीक्षेचे कौतुक। तुझे बाळा पाहीले असे।।९८।। बा रे या जगी शाश्वत अशाश्वत। तुज कळे की नाही होतो भ्रांतीत। आता मज कळले गेले तुझे अज्ञान पण। हंसपुरुष तू मिरविसी।।९९।। ऐसे बोलता गुरुनाथ। गोरक्ष चरणी माथा ठेवीत। ऐसेच करीत ज्ञान विचार। संचार गुरुशिष्य करिताती।।१००।।

काळा निर्जन जणु पहाड येथे दु:खाचा। रिपू वाढवितात काही अंशी भार ह्या दु:खाचा। सुखासी करती दूर दु:खाचे भांडार ओढवी। घेती हरुनी मनाचे समाधान व शांती। बोचवी मनासी सतत करिती विषाद। करिती वक्र या जीवनाचा मार्ग जो सुलभ। करिता पठन हा अध्याय होईल रिपुंचे क्षालन। बहरवीती सुखाचे पीक करिती सुंदर जीवन। होऊनी दिक्पाल ते नवनाथ सर्व दिशांचे। पावन करतील जीवन सौंदर्यशाली या भक्तांचे।

।श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

।। श्री ।।

## ।। अध्याय सहावा ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री नवनाथाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

जयजयाजी कमळानना। दुष्टदानव असुर मर्दना। भक्तवत्सल चंद्रानना। यादवेंद्रा आदिपुरुषा।।१।। गुरुशिष्य प्रेमनिष्ठा कथा। ज्ञान विद्या परीक्षा तथा। चालवावया भक्तिसार कथा । द्यावी प्रेरणा या स्वामीभक्ता।।२।। गोरक्ष मच्छिंद्र संचार करीत। मार्गी गोदासंगमी स्नान करुन। भावे आत्मलिंग शिवाते पूजून। पश्चिमदिशे निघाले।।३।। आंवढया परळी वैजनाथ लिंग। करुनिया मग गोदातीर्थ। मार्गी वाल्मिकस्थान विपिनमय। गर्भगिरी ते येऊन पोचले।।४।। कानन ते घनदाट अचाट। दर्शन न होई महीपाठ। आठवूनी हस्तीची कनकवीट। मच्छिंद्र मनामध्ये दचकला।।५।। त्या परीस आणिक अर्थ। गोरक्षाचा लोभी स्वार्थ। पाहुनी घ्यावा परीक्षेत। भाव मच्छिंद्र मनी उदेला।।६।। म्हणे मग तो गोरक्षास। विपीन असे अतिघन कर्कश। नांदते काय तस्करी अरण्यात। मज भय आज संचरले।।७।।

ऐसे बोलता मच्छिंद्रनाथ। गोरक्ष विचार करी मनात। म्हणे मम गुरुते तस्करभय। काय म्हणूनी उदेले।।८।। मार्गी उदक पाहून वदे मच्छिंद्र। गोरक्षा घालून मम झोळी कक्षेत। तू करी गमन मी ही येईन। दिशा फिरुन पाडसा।।९।। अवश्य म्हणून घेई तो झोळी। वजनस्त लागे ती हस्तकमळी। म्हणून कक्षेतून काढिली झोळी। त्यात कनकवीट देखिली।।१०।। पाहता दृष्टी ती कनकवीट। म्हणे फुकाच भ्याला मच्छिंद्रनाथ। मग दाट लक्षूनी तृण अफाट। झुगारिली वीट त्यामाजी।।११।। वेगे पुढे मग जाई गोरक्षनाथ। मागुनी मच्छिंद्र लगबगा येत। परी ना आटोपे त्यास गोरक्षनाथ। दीड योजन अंतर पडतसे।।१२।। मग तेणे देखिला उंबरतरु। गोरक्ष तो पाहे दृष्टिपरु। मग मनी म्हणे तो व्हावे स्थिरु। येऊ द्यावे मच्छिंद्रनाथासी।।१३।। येऊनी तो म्हणे गोरक्षनाथ। अरे कर्कश अरण्य येथ पर्यंत। ऐसेची कानन भयानक वन। पुढे ही आपणास लागेल की।।१४।। आता नसे भय वदे गोरक्ष। विचार दाटला मच्छिंद्र चित्तात। चित्ती म्हणे काय केले वाटेत। सांडिली का याने कनकवीट।।१५।। मग ती झोळी घेऊन मच्छिंद्रनाथ। पाही तो नसे तेथ कनकवीट। मग मच्छिंद्र करी बहु आकांत। कनकवीट गेली म्हणोनी।।१६।। झाला म्हणे तो अनर्थ बहुत। तेणे हृदय दचकला गोरक्षनाथ। मग धरोनी मच्छिंद्राचा हात। पर्वतावरी त्यास तो नेतसे।।१७।। जपुन मंत्रधार कनकवर्णी। हाटकी मिरवला

नग दैदिप्यमानी। पाहीजे तितुके घ्या यातूनी। मच्छिंद्र धन्य धन्य म्हणतसे।।१८।। मग मच्छिंद्रास पूसे गोरक्षनाथ। कनकासाठी का केला आकांत। ‘करीन भंडारा मेळवून बहु संतजन’। मनीषा मच्छिंद्र सांगतसे।।१९।। मग मच्छिंद्रे पर्वती बैसवोनी। भस्म फेकी गंधर्वास्त्र मनी जपोनी। तेणे करुनी या मही तळवटी। चित्रसेन गंधर्व उतरला।।२०।। त्याते म्हणे नाना बैरागी संन्यासी। जपी तपी संत योग्यांसी। सुर देव दानव किन्नर गंधर्वांसी। मेळवोनी आनंद उत्सव करावा।।२१।। ऐशा आनंदी गहिनी आठवे गोरक्षासी। प्रेषूनी कनकगिरी गंधर्वासी। भेटोनी तेथे मधुविप्रासी। गहीनीसह तेथे आणविले।।२२।। शिव म्हणे यासी विद्या अभ्यासून। सकळ अधिकारी करावा पूर्ण। मी याचाच अनुग्रह घेईन। पुढील माझे अवतारी।।२३।। सकळ तोषले पावोनी मात। पावती आपुले स्वस्थान। परी मच्छिंद्र तेथे राहोन। अभ्यासिती गहीनी तें।।२४।। मच्छिंद्र पिता उपरिचर वसूने मग। मीननाथ केला कीळोतळा हस्तगत। मच्छिंद्राचा सकळ वृत्तांत। निवेदिला तियेसी।।२५।। अदृश्यास्त्र प्रेरुन स्वस्थाना गेला कुबेर। नगाचा हेमवर्ण गेला झाकळून। परी वस्तीस तेथेच राहीला उमाकांत। म्हातारदेव म्हणती त्या पर्वता।।२६।। त्याचे दक्षिण पर्वती मच्छिंद्रजती। जालिंदर राहील पूर्वेस पर्वती। गोरक्ष राहीला वामतीर्थ गर्गाद्रिपर्वती। तेथेच त्याने गहिनी अभ्यासिला।।२७।। मग प्रेषिला त्याने विप्राप्रती

गहिनीस। नंतर शके दहाशे वर्षास। घेते झाले ते सर्व समाधीस। कबरव्यक्त झाले आश्रम।।२८।। यावरी प्रश्न श्रोता विचारी। कबरयुक्त झाले नाथ काय म्हणोनी। तर यवनराजे येथे येतील म्हणोनी। कबरी तयांनी बांधिल्या।।२९।। गोरक्ष सटव्या ठेवोनी रक्षण। निघता झाला तीर्थाकारण। त्या सटव्या तेथे अद्याप राहून। रक्षिताती स्थानासी।।३०।। एका सुवर्ण विटेसाठी। कनकगिरी करी गोरक्ष जती। आता श्रोते ऐका सावध चित्ती। भर्तरी आख्यान सुरस जे।।३१।। एकदा उर्वशी विमानी बैसोनी। येत होती भूलोक अवनी। पाहता ती मित्रा वरुणी। रेत झगटे इंद्रिय स्थानी।।३२।। पडले परी ते विभक्त होऊन। द्विभाग झाले महीकारण। एकातून अगस्ती तनु होऊन। दुसरे पडले कौलीकाश्रमी।।३३।। कौलीके ठेवली होती भर्तरी। रेत पडले त्यात आकाशातूनी। द्रुमील नारायण अवतार घेईल। म्हणून रक्षी कौलीक भर्तरी।।३४।। कली लागता कौशिके ठेविली भंतरी। नेऊन गुहेत मंदराचळासी। द्वारकाधीश अंशे करुन त्यात संचरी। वाढू लागला दिवसेंदिवस।।३५।। नवमास वर्तता भर्तरी भंगत। त्यात निर्भळपणी हे बाळ विरक्त। शब्द रुदनी कोल्हाळ करीत। कुरंगमेळी तो पातला।।३६।। तेथेची एक हरिणी झाली प्रसूत। दोन बाळकांसी जन्म देत। तिचेच हे बाळ तिची समजुत। संगोपन त्रयांचे ती करीतसे।।३७।। पाच वर्षे हरिणी मागे तो हिंडत। समजतसे तो वनचर भाष सकळ। मार्गी

भेटे भाटा जयसिंग। कांता रेणुका असे तयाची।।३८।। हरिणीसवे बाळ देखे जयसिंग। तेज पाहून धरिली बाळकाची पाठ। पाठी लागून धरुनी मनगट। उभा केला बाळ तो ।।३९।। मातापिता याचे कोण असती। विचार करी ओपू नग त्या हस्ती। मग उचलून घेऊन स्वस्कंधी हस्ती। घेऊन जाई तो बाळका।।४०।। मातापिता पुसता बाळ बें बें करी। ठेवून घेतला तैसाच तयागृही। बाळ हळु शिकी बोली चाली। हाका मारी जननीते।।४१।। तया सवे ग्रामोग्रामी हिंडे भाट। हिंडता पातला काशी भागीरथी तट। स्नान करुन विश्वेश्वराच्या दर्शनास। गेला शिशु सवे विश्वेश्वर मंदिरी।।४२।। त्याते पाहून लिंगातून बोले उमाकांत। देखिले तुम्हा भर्तरी अवतारात। शिवलिंगातले शिवाचे सहज शब्द। जयसिंगाने ऐकीले।।४३।। शिवलींग 'भर्तरी' म्हणे यासी। हेची नाव ठेवावे आपण यासी। मग येऊन स्व कांते पासी। निवेदिले सर्व वर्तमान।।४४।। कानन चव्हाटी भर्तरी खेळे। ठेच लागून पडला तो महीते। श्वेतवर्ण तयाचा पाहून बाळ पळाले। म्हणती भर्तरी मरण पावला।।४५।। ऐश्या त्यास मही पाहे मित्रावरुणी। पुत्रमोह आला हृदय दाटूनी। बाळ घेऊन विप्रवेश धारण करुनी। जयसिंगाप्रती तो येतसे ।।४६।। तयांसी म्हणे मित्र वरुण । बाळ काया वाचा केले तुम्हा अर्पण। परी तुम्ही आता संशय टाकोन। संगोपन करा याचे।।४७।। त्यासी विप्र म्हणे मी मित्र वरुण। मुळापासून मग करी कथन।

भर्तरी पात्री जनन हरीणी संगोपन। सकळ वृत्तांत कथिला।।४८।। षोडश वर्षे होता भर्तरीनाथ। लग्न विचार सुचे मातपित्यास। विचार करती जावे स्वग्रामास। म्हणून निघाले मावळा देशी।।४९।। मार्गी चालता काननात। तस्करे येऊन मारले जयसिंगास। कुरवाळुनी पतीच्या प्रेतास। रेणूका देह सांडती झाली।।५०।। भर्तरी करीतसे बहुत शोक। पाहून तयासी वदे व्यवसाईक। जरी तू आता करशील शोक। जननी जनक मिळतील का।।५१।। मग तयासी अपार बोधून। आणीला तयाने मुक्कामावर। दुसरे दिवशी त्यासी सवे घेऊन। पुन्हा जातसे व्यवसायी।।५२।। तो त्या व्यावसायिका सवे सहज। करीतसे तो तयांचे काज। धान्य भरुन अतिशय अमूत। उज्जयिनी अवंती मार्ग धरीला।।५३।। पातले ते ग्रामाजवळी। करीते झाले ते शिबिर स्थळी। रचून गोण्या किनताने सकळी। शिबिरा वरी ते विराजले।।५४।। रात्री कोल्हाळ करती जंबूक। बोलते झाले जंबूक समस्त। द्रव्य हरुन नेतील महा तस्कर। बैसू नका सावध व्हा।।५५।। भर्तरीस कळतसे पूर्ण वचन। म्हणे भक्षण करीतो याचे अन्न। तरी याते श्रुत करुन वचन। उपकाराते सारावे।।५६।। व्यावसायिक पोटी घालून माल भारती। सावध पहारे देती भवती। येता तस्कर शतानुशती। शस्त्र जर्जर केले सर्वांसी।।५७।। पुन्हा राहता दीड प्रहर रात्र। जंबुक भुंकती सर्व मंडळासहीत। पुसता अर्थ भर्तरी वदे त्यास। काय कोल्हे वदले ते ऐका।।५८।।

उत्तर दिशेहून येईल शिववरदी राक्षस। तयापासी असतील चार रत्न। त्याते मारुन जो येईल। पूर्णलाभ होईल त्यासी।।५९।। पुसे व्यावसायिक लाभ केऊता। म्हणे त्या राक्षसाचा रुधिर टिळा रेखिता। पावेल मग तो सार्वभौमता। अवंतिके माजी दक्ष तो।।६०।। ऐसे भर्तरी बोलता त्याते। विक्रम नृप होता तेथे। ऐकताची शस्त्री हाताते। कवळुनिया तो निघाला।।६१।। परी श्रोते ऐका एक चित्ती। शिव वरदे त्या दानवाप्रती। धन कैसे लाभले हेची। तेची कथानक ऐकावे।।६२।। एकदा चित्रमा गंधर्वा निकट बैसवून। शिवपार्वती खेळती दोघे जण। तो अंबेने खेळी डाव जिंकोन। शिवावरी आणियेला।।६३।। उभय गुंतले वादाप्रती। गंधर्वास पुसे सत्य पार्वती। असत्य वदे गंधर्व शिव पक्षपाती। परम क्षोभली मृडानी।।६४।। म्हणे गंधर्वा तू असत्य वदसी। राक्षसरुपे वर्तशील मृत्युक्षिती। गंधर्व होतसे भयभीत अती। शिवासी शरण तो जातसे।।६५।। शिव म्हणे चित्रमा गंधर्वनाथा। न करी शापाची सहसा चिंता। पुढे सुरोचन गंधर्व महीपर्वता। शक्रशापे वर्तला की।।६६।। होशील मुक्त त्याचे पुत्राचे हाती। तव रुधिर टिळक रेखील तो स्वमाथी। तैसा टिळक रेखिता माथी। मही भोगील भोगार्ते।।६७।। आता श्रवण करावे कथानक। सुरोचन कैसा झाला शापीत। अमरपुरी एकदा शक्र गंधर्वादिक। नृत्य पाहात बैसले।।६८।। लावण्यलतिका तेथे नृत्य करती। वेधला सुरोचन पंचबाणी।

एकाएकी सभेंत उठोनी। मेनकेते तो स्पर्शितसे।।६९।। बोलता झाला पाकशासन। हीनबुध्दी तू स्वर्ग पावो पतन। महीतली तू महागर्दभ होऊन। संचरसी सुरोचन गंधर्वा।।७०।।मग तयाने तोषविला पाकशासन। उ:शापे तयाने तोषिला सुरोचन। म्हणे मथुराधीश जो नरेंद्रोत्तम। सत्यवर्मा असे नाव तयाचे।।७१।। सत्यवती तयाची कन्या लावण्यवती। तोषवूनी मग तुवा विक्रमाप्रती। विवाह करता तू सत्यवतीसी। येईल तो तव उदरासी।।७२।। पाहशील जेव्हा तू पुत्रमुख। होईल दूर तव शापदु:ख। मग होऊन भूलोकाते विन्मुख। स्वर्गलोकवासी होशील तू।।७३।। तया पाहतसे कुल्लाळ नाम कमठ। नेऊन स्थापितसे गर्दभमंडळात। परी दारिद्र्ये विकतसे तो गर्दभांस। परी हया गर्दभास रक्षितसे।।७४।। रात्री तेथे कोणी नाही पाहुनी। गर्दभ वदे कुल्लालासी मनुज वाणी। सत्यवर्म्याची सुंदर कन्या द्यावी। करुनी मजसी ती कांता।।७५।। भीतीने कुल्लाल निघे ग्रामाबाहेर। परी अडविती तयासी द्वारपाल। उभा करती त्यास राजा समोर। कुल्लाल सत्य कथा सांगतसे।।७६।। राजा विचारी म्हणे ऐक मम वचन। जरी गर्दभ मज ताम्रनगरी करुन। देईल तर मग त्यासी कन्या देऊन। स्वीकारीन त्यासी जावई म्हणून।।७७।। गर्दभे पूर्ण करता राजाचे वचन। नृपती देतसे सत्यवती आणून। परी कुल्लालास म्हणे ऐक वचन। नगरी सोडून जावे तुवा।।७८।। गर्दभ म्हणे मग रायाते। शक्रशापें पावलो गर्दभ

देहाते। प्रत्यक्ष मी सुरोचन गंधर्व असे। नृप मग संतुष्ट जाहला।।७९।। राव निघून जाता स्वसदनी। कमठ सत्यवतीसी घेऊनी। अवंतिका नगरीचा मार्ग धरुनी। गमन करी रात्री तो।।८०।। गर्दभास कमठ म्हणे एक संदेह असे। आपण वर्तता पशू ऐसे। तरी या मिषें संग मनुर्ष्ये। कैसी रीती घडेल की।।८१।। तो वदे ॠतु समय प्राप्त होता सत्यवती। दावीन आपुली मी स्वरुप कोटी। गंधर्व वेषे इच्छा पाटी। पूर्णपणी आणीन मी।।८२।। ॠतुवती होता ती सत्यवती। सुरोचन गंधर्वे पाचारीले एकांतासी। करुनी आसुरी विवाह कामार्थ रती। गर्भ संभवला त्याच रात्री।।८३।। मग तिज करी संपूर्ण कथन। म्हणे आता मी पाहता पुत्रवदन। होईल माझे शापमोचन। स्वर्गवास मग करीन मी।।८४।। सुलक्ष समयी झाली प्रसूती। बारसे केले द्वादश दिवशी। पाळणा घालूनी बालकासी। विक्रम नाम ठेवीले।।८५।। अर्क जो प्रवर्तला अस्त प्रदेश। सुरोचन सांडोनी गर्दभ वेश। मग प्रवेशुनी तो सदनात। कौतुके पाही पुत्रमुख।।८६।। पाहता पुत्र मुख गेल्या शापकोटी। मग अमरी जाणवले शक्रपोटी। विमान घेऊनी पाठवी मातली। तो येऊन म्हणे चलावे अमरस्थानी।।८७।। गंधर्व निघता स्वर्गाप्रती। हंबरडा फोडी सत्यवती। गंधर्व म्हणे तू स्मरता अवनी वरती। भेटी देईन गे तू ते।।८८।। मग सत्यवतीचा धरुन हस्त। कमठा ओपूनी मोहीत। म्हणे तनयासह करी सांभाळ। मग तो अमरस्थानी निघाला।।८९।।

पुढे षोडश वर्षावरुते। चाकरीत ठेविला विक्रम रायाते। पाईक चाकरी अर्पूनी याते। ग्रामरक्षणी ठेवीले।।९०।। तेथे भर्तरी सांगे वनचर भाष। म्हणे उत्तर दिशेहून येईल राक्षस। त्याला वधील कोणी समोर जाऊन। तयाने रुधिर टिळा रेखावा।।९१।। प्रथम ग्राम द्वारी रेखावा। दुसरा आपुले भाळी रेखावा। ऐसे रेखितो जो रुधिर टिळा। तो अवंती नृपत्वातें मिरवेल।।९२।। ऐकूनी ते विक्रमे जाऊनी। असिलता प्रहारे भेदिता घायी। राक्षस कासावीस होऊन देही। महीतळी पडला तात्काळ।।९३।। मग विक्रमे भाळी टिळा रेखिला। राक्षस दिव्य गंधर्वरुप पावला। चित्रमा शापकथन सांगी त्याला। मग तो स्वस्थानी पावला।।९४।। येरीकडे विक्रम पाही राक्षस शरीर। विख्यात अद्‌भूत रत्ने चार। चिंतामणी तीन वैडुर्यवंत कामद। चारही रत्ने विक्रमा लाभली।।९५।। मग तो म्हणतसे धन्य भर्तरी। ज्यामुळे मज ही रत्ने लाभली। ऐसा अवतार दक्ष स्व सांगाती। असता त्रैलोक्यात मिरवेन।।९६।। पुढे चालता पाही द्वारग्राम। त्या द्वारासी रुधिर टिळा उत्तम। चर्चूनिया परतला अती त्वरीत। व्यावसायिक शिबिरा तो आला।।९७।। मग द्रव्य लोभे तोषवूनी जकाती। म्हणे घ्यावे मागून भर्तरी प्रती। नेऊन त्या जकाती एकांती। एक रत्न त्यास देतसे।।९८।। मग घेऊनी भर्तरीस सांगाती। भेटला जाऊन माता सत्यवती। सांगे वचनी भर्तरी विषयी। म्हणे हा दूसरा सुत मान माते।।९९।। आधीच वत्सल माय ती

सत्यवती। त्यावरी पुत्राची ऐकोनी युक्ती। परम मोहाने भर्तरी जती। प्रितीने ठेवूनी घेतला।।१००।।

पितरांचे ऋण असीम असते या जीवावरती। करुनी तृप्त तयांसी जीवन सुलभ जे करती। करिता अध्याय पठन पितरांची होईल तृप्ती। सुख समृध्दिचे पाट ओसंडूनी वाहती। करतील रक्षण भक्ताचे बनुनी वज्रपंजर। जाळुनी दु:खास देतील आनंद सतत। करतील उद्धार कुळाचा भक्ताचा राखुनी मान। सुप्रसिध्दि देऊनी भक्तास करतील महान। राखतील हे नवनाथ सन्मान पितरांचा। होऊनी गुरु करतील नाश पितृपीडेचा।

।श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

।। श्री ।।

# ।।अध्याय सातवा।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री नवनाथाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

जयजयाजी श्री जगदुध्दारा। पूर्णब्रह्म सनातना। पुढे ग्रंथरचना महिमाना। बोलवी शिष्यवत्सल गणेशा।।१।। मोक्षपुऱ्या असती सप्तम। तयांतील अवंतिका ग्राम। तेथील नृपती नरेंद्रोत्तम। शुभ्रविक्रम विराजे।।२।। तयाची कन्या सुमेधावती। झाली उपवर लावण्यवती। विचार करी नरेंद्रोत्तम नृपती। राज्यासनी जामाता स्थापावे।।३।। परि करावे ऐसे म्हणे प्राज्ञिक। समारंभी गंजशुंडेस। माळ ओवूनी राज्यासनास। स्वामित्वपणी मिरवावे।।४।। मग तो सहज ईश्वरसत्ते। लोकांत मिरवेल महीपती। कन्या ओपूनी उपरांती। सर्वसुख मग भोगावे।।५।। दिव्यमाळा शुंडी ओपोनी। गजराज मिरविला नगरातुनी। गजाने मग दुर्गानिकट जावोनी। विक्रमग्रीवी माळा घातली।।६।। मग तयासी गजस्कंधी वाहून। शृंगार मंडपी तया आणवून। अर्पूनी तयासी कनकासन। सन्मानपूर्वक बैसविला।।७।। परी कुल्लाळ तयाची जाती। कैसी अर्पावी कन्या

त्यासी। मग कमठा बोलावूनी राज्याप्रती। राजा वृत्तांत पूसतसे।।८।। ऐकोनी आहे तो गंधर्वसुत। माता सत्यवती पिता सत्यवर्म। तोषले मग रायाचे मन। आनंदे राज्यासनी अभिषेकिला।।९।। या उपरी आपली कन्या गोरटी। अर्पिली विक्रम नृपाप्रती। सत्यवर्मही अर्पी स्वराज्याप्रती। सार्वभौम नृपती मिरविला।।१०।। बंधु भर्तरीस नृपे पाचारीले। तया युवराज्य अर्पियते। मग उभय बंधु समाधाने। राज्यकार्य सांभाळती।।११।। सुमंत मंत्रिक म्हणे कन्या पिंगला। देऊ करु राया भर्तरीला। परी रजक त्याची ज्ञाती समजता। शोध केला जातीचा।।१२।। तेव्हा तो म्हणे भर्तरी लागुनी। म्हणे तुमचा पिता मित्रावरुणी। तरी स्वमंगलाते त्या बोलावूनी। आम्हा दृष्टी दाखवा की।।१३।। मित्रावरुणी मग म्हणे त्याते। राया विक्रमाच्या ताताते। सुरोचन गंधर्वा पाठवीन तेथे। दिव्य पुष्पवृष्टी करीन मी।।१४।। तेणे अवश्य म्हणोनी सुरोचन। मानववेषी मंडपी येवून। देई वधुवराते आशीर्वचन। होई स्वर्गातून पुष्पवृष्टी।।१५।। हा अहिताचा विषय प्याला। राया भर्तरीस गोड वाटला। हितालागी सर्वस्वी चुकला। अचलपद तोची राया।।१६।। मित्रावरुणीस बोले अत्रिसुत। चिंता न करी भर्तरीतात। माझे प्रसादे जाण सत्य। जगामाजी मिरवेल तो।।१७।। येरीकडे भर्तरी नृपती। पारधीस्तव काननाप्रती। मृगये करता हिंडे निगुती। नाना वने उपवनादि।।१८।। चैत्रमास रश्मीचे तीव्रपण। चमू हळहळली तृषे करुन। मग भर्तरी मृगया सांडून। उदक शोधू धावतसे।।१९।। मग

अत्रिसुत काय करीत। मायेचे सरोवर रचूनी तेथ। शीत निर्मल नीरयुक्त। छंदे व्यक्त दाखवी।।२०।। येरीकडे भर्तरी नृप। क्लेशें हिंडता काननांत। सरोवर पाहुनी अकस्मात। जलप्राशना तो आला।।२१।। अत्रिसुत पुसे त्याचे गणगोत। म्हणे गुरु कोण सांग येथ। राय म्हणे नसे गुरु अजुन। मग तू जल स्पर्शु नको ।।२२।। राय म्हणे आपण अनुग्रह देऊन। आपणच वाचवा माझा प्राण। म्हणे तयासी मग अत्रिनंदन। द्वादश वर्षे तप आचरी।।२३।। तयासी भर्तरी बोले वचन। नाही जाहलो मी मुक्तऋण। तरी द्वादशवरुषें प्रपंच करुन। पुण्ययोग मी आचरेन।।२४।। मग मौळी ठेवूनी हस्त। म्हणे मी दत्तात्रेय अत्रिसुत। परी तव दैव भाग्यवंत। मम कर मौळी विराजला।।२५।। अनुग्रह तया होता प्राप्त। सरोवर जाहले गुप्त। परी पाचारुनी भोगावतीस। नृपतृषा क्षमवी अत्रिनंदन।।२६।। मग भर्तरी मृगया करुन। अवंतिका स्थाना जावोन। पाकशाळेत पक्वान्ने सेवून। पिंगलागृही तो संचरला।।२७।। मोदे मृत्यू आपणा आधी यावा मला। ऐसी मात वदे पिंगला। राजा म्हणे तुज आधी मला। मृत्यू येता काय करशील।।२८।। वदे ती मग ऐशा गोष्टी। मी राहणारच नाही महीपाठी। हा देह वाहुनिया हव्यवाही। गमन करीन तुम्हासह।।२९।। एके दिनी राव जाई पारधीसी। मृगया खेळता विपिनासी। आठवे चित्ती तो पिंगलेसी। म्हणे पाहू तिचे साचपण ।।३०।। मग रुधिरवस्त्रे देवूनी सेवकाहाती। म्हणे जावे राजसदनाप्रती। सांगावी वार्ता

पिंगलाराणीसी। राव निमाला म्हणावे।।३१।। सेवकाहाती वृत्त कळता। जाहली विव्हळ राणी पिंगला। अंतःपुरात शोक कल्लोळ माजला। हृदय पिटती आक्रोशे।।३२।। पिंगलेने मग स्वामीवस्त्र नेसून। घेती झाली सतीचे वाण। सांडूनी स्वशरीराते अग्नित। गुंडाळोनी गेली ज्वाळांमधी।।३३।। असो पाहीली मार्गवाट। राव भर्तरी येई सैन्यासहीत। येता अवंतिका नगरीस। दुःखवार्ता श्रुत झाली।।३४।। दिली दुःखवार्ता सेवकानी। परम दुःखी जाहली पिंगला राणी। अग्नीत मग स्वदेह अर्पूनी। जाहली सती महाराजा।।३५।। ऐकूनी वार्ता म्हणे नृप। मी अति पतित दुष्ट दुर्जन। मूढमतीने मी घेतला प्राण। पति न म्हणे मज पिंगले।।३६।। नानाप्रकारे शोक करीत। राव पडला शोकार्णवात। न वर्णवे तो आकांत। अशाश्वत सारे महाराजा।।३७।। उगवता मग दुसरा दिन। अस्थि संचयना आले आप्तजन। भर्तरी स्पर्शु न देई कोणा लागून। आप्तजन गेले माघारे।।३८।। ऐसी लोटली द्वादशवर्षे। शुचिष्मंत झाले शरीर कृश। ते पाहुनिया अतिक्लेश। मित्रावरुणी द्रवलासे।।३९।। तव तो प्राज्ञिक अत्रिनंदन। मित्रा वरुणीस सन्मान देऊन। म्हणे महाराजा कामना कोण। धरुनी येथे आलासी।।४०।। तुम्ही जावे स्वस्थानासी। मी भर्तरीचे आहे उद्देशी। स्वहीत करिता चिंता मानसी। पाळू नका महाराजा।।४१।। मच्छिंद्र शिष्य गोरक्षनाथ। तो मही भ्रमत तीर्थ। प्रज्ञावान तो येईल येथ। भर्तरीस शुध्दपंथा आणील तो।।४२।। असो गर्भाद्रींत मच्छिंद्रनाथ।

ठेवूनी गोरक्ष करावया तीर्थ। सकळ महीलागी भ्रमत। गिरनार प्रती पातला।।४३।। तयासी म्हणती अनुसूयानंदन। भर्तरी मम अनुग्रही नंदन। तो स्वकांते करता स्मशान। द्वादश संवत्सर सेवितसे।।४४।। त्यासी मी अनुग्रह जेव्हा दिला। तेव्हाची गुंतविला संकल्पाला। की सोडूनी मी वैभवपंथाला। नागपंथी मिरवेन मी।।४५।। मग गोरखे जपून व्यान अस्त्र। क्षणें आला अवंतिके प्रत। मग येवोनी स्मशान निकट। दूरोनी पाहे भर्तरीसी।।४६।। म्हणे ऐसा विरह जयासी। बाणलाहे पूर्ण मानसीं। तो वरपांगी वाग्वरासी। कदाकाळी मानीना।।४७।। मग जाऊनी अवंतिकेत। कुल्लाळ गृही संचार करीत। एक गाडगे आणून त्याने। बाटली नाम ठेवीले।।४८।। असो बाटली झाली शतचूर्ण। मग उठता झाला अहा म्हणून। तिचे खापर सकळ मेळवून। शोक अती तो करीतसे।।४९।। त्याचा शोक पाहुनी अपार। भर्तरी तया जवळ येऊन। म्हणे योगिया का चिंतातुर। शोक करिसी हे सांग।।५०।। म्हणे आपणावरुनी नृपती। घ्यावी जगाची अर्थ प्रचिती। माझी बाटली फुटल्या क्षिती। दु:ख जाणे मी एक।।५१।। योग्या शतानुशत मडकी मिळत। प्राप्त करुनी देईल क्षणांत। परी पिंगले समान स्त्रीरत्न। कैचे दुसरे मिळेल।।५२।। ऐसे ऐकता वचन। म्हणे राया नरेंद्रोत्तम। पिंगला उदय लक्षावधीने। केलीया मज देसील काय।।५३।। येरु म्हणे पिंगला नयना। दाविलीया पुरवीन इच्छिलि कामना। सारे राज्यवैभव सुखसेवना। संकल्पीन मी

तुजलागी।।५४।। ऐसी राजेंद्र बोले वाणी। सत्यार्थ म्हणतसे योगतरणी। मग कामिनी अस्त्र पिंगला नामी। प्रयोगाते तो उच्चारी।।५५।। मुख्य पिंगला जी भस्म झाली। तीच अनंत मूर्ती धरुनी उतरली। पाठी पोटी व्यापिली। सन्मुख उभी राहीली रायाच्या।।५६।। म्हणे मी पिंगला तुमची कांता। आहे सुखी मी स्वर्गी आता। आपणही आचरावे आपुल्या हिता। जावे मजसी लागेल की।।५७।। मग नृप धावोनी गोरक्षचरणी। लोटू पाहे दंडवत अवनी। परी सर्वज्ञ गोरक्ष धरुनी पाणि। रायाप्रती तो बोलतसे।।५८।। मच्छिंद्रनाथ गुरु माझा। आहे शिष्य तो दत्ताचा। तुलाही दत्तानुग्रह लाधला। गुरु तू माझा असशी की।।५९।। तरी राया सद्गुरु भ्राता। सांग की कामना केवी उद्भवली चित्ता। राज्यवैभव संसार दुहिता। पिंगला भोगू इच्छितसे।।६०।। म्हणे आता आचरेन पूर्ण योगा। साधीन सकल कलांसी प्रयोगा। माझा स्वामी अनुसूया कुशिगा। रत्न माते दाखवी का।।६१।। मग गोरक्ष आपुले शिंगी कंथा। झाला देता राया यशवंता। भिक्षा झोळी घेऊनी हाता। कुबडी फावडी ओपीतसे ।।६२।। यापरी गोरक्ष भर्तरीनाथ। पुसोनी निघाले विक्रमास। मग पदी पदी दुरावा होत। अर्ध कोस पै गेले।।६३।। परी कृशशरीरी भर्तरीनाथ। अशक्त पद ठेवी कंठेना पथ। मग व्यान अस्त्र भस्म चिमुटींत। स्थापिता झाला गोरक्ष।।६४।। मग ते भस्म चर्चिता भाळी। झडुनी गेली अशक्त काजळी। पोचले क्षणांत गिरनार माथी। अत्रिनंदना पायी ते लोटले।।६५।। असो पूर्ण

विद्यासंपन्न। भर्तरीते करुनी अत्रिनंदन। उपरी साबरी व्यक्त करुन। सदनाते पाठवी।।६६।। मग सकल देव करुनी प्रसन्न। पाहता श्रीगुरुचे चरण। मग सवे घेऊनी अत्रिनंदन। बद्रिकाश्रमी पातला।।६७।। येरीकडे गोरक्षनाथ। पाहता झाला गर्भगिरि पर्वत। परम आवडी आनंदभरीत। मच्छिंद्राते तो भेटला।।६८।। काही दिवस तेथे राहून। करिते झाले उभय गमन। वैदर्भ देशीचा मार्ग धरून। कौडिण्यपुरी ते पातले।।६९।। तेथील शशांग नृपनाथ। कोपला असे स्वसुतावर। दुता हस्ते खंडीत करुन पादहस्त। चौऱ्हाटी तयासी टाकले।।७०।। तो शशांगधर नृपती। प्रज्ञावंत धार्मिक विपुल संपत्ती। परी उदरी नसे संतती। उद्विग्न चित्त तो होता।।७१।। श्री शंकरे तया देऊनी दृष्टान्त। सांगे सापडेल लिंग अपर्णेसहित। करुनी ते भावे स्थापित। अर्चना करण्यास सांगितले।।७२।। तेथेच मित्राचार्य नाम ब्राह्मण। शरयु तयाची भार्या जाण। उभय करती तपश्चर्याचरण। संततीसाठी ते काळी।।७३।। इकडे स्वर्गी वर्तले वर्तमान। बैसले सर्व देव सिध्दगण। सुरोचना अप्सरा करी नर्तन। कामनाधरी ती शिवाची।।७४।। शिव वदे तू ऐसी भ्रष्टपणी। शीघ्र पावसी मृत्यु अवनीं। भद्रसंगमी जन्म घेऊनी। विप्रकुशी मिरविसी।।७५।। जाहला तियेसी पश्चाताप फार। म्हणे उ:शाप द्यावा सत्वर। म्हणती तियेसी मग दयासागर। माझिया स्पर्शे तू स्वस्थान पावसी।।७६।। तीच मित्राचार्या सदनी जन्मली। आराधितसे नित्य शिवचंद्र मौळी। शिवालयी आली असता ती तरुणी। तिज

पकडण्या शिव धावला।।७७।। मागे धावत मग सदाशिवाने। स्पर्शिले तिजसी स्वहस्ताने। तत्क्षणी ती सांडोन मानवतनुते। दिव्य अप्सरा ती जाहली।।७८।। शिवाचा रेत ते समयी। जाऊनी मिळाला कृष्णासंगमी। शशांगर अर्ध्य देते समयी। तयाच्या अंजुळीत तो आला।।७९।। तयाचे अंजुळीत आले बालक। पुढे कृष्णागार नाम तो मिरवित। ऐसी होता तयासी द्वादशवर्षे। माता स्वर्गवासी जाहली।।८०।। तदा शशांगर नृपनाथे। रचिले दुसऱ्या विवाहाते। मग भुजावंती राणीसह नांदे। सुखाने संसार संगमी।।८१।। असो एकदा भुजावती पाही कृष्णागारास। न जाणे ती सापत्नसुतास। कामना उद्‌भवली तिये चित्तास। पाचारीले तिने कृष्णांगारासी।।८२।। तो आपलाच सुत हे जाणता। बिभीली मनात ती तत्त्वता। पूसे मग सखीस मार्ग आता। तिने बहु युक्ती सांगितली।।८३।। पारधीहून येता राव जाई स्वसदनी। तिज खिन्न पाहून वदे तू पट्टराणी। दु:ख तव सांग मज झणी। रायाते ती सांगतसे।।८४।। महाराजा भ्रष्टबुध्दी तव नंदन। आपण पारधीस गेला हे पाहून। मम सदनी मग तो येऊन। स्पर्शितसे मम हस्ता।।८५।। ऐसे वचन बोलता भुजावती। परम क्रोधावला नृपती। आज्ञापी तो सेवकांप्रती। करा खंडीत याचे हस्तपाद।।८६।। सेवक त्या नेती चव्हाटदेशी। हस्तपाद छेदूनी चौरंगी टाकती। होऊन वेदनेने कासावीस अती। चौरंगावर कृष्णांगार पडियेला।।८७।। गोरक्ष मच्छिंद्र करिता गमन। समीप आले चौऱ्हाटे कारण। कृष्णांगारासी अती दीन

पाहून। परम चित्ती द्रविले ते।।८८।। सहज तये अंतरी दृष्टी करता। समजली त्यांसी तयाची माता। आणि कृष्णांगारासी वरता। अवतारदक्ष तो आढळला।।८९।। असो गोरक्ष मच्छिंद्राते। म्हणे राजसदना जाऊ त्वरीते। मागुन घेऊ ह्या चौरंगीते। नाथपंथी मिरवावया।।९०।। मच्छिंद्र म्हणे राया घडवून शासन। मगच आपण न्यावा शिवनंदन। गोरक्ष म्हणे याते विद्यार्णव करुन। तयाचेच हस्ती द्यावे शासन।।९१।। नृपाप्रती येऊन म्हणती नरेंद्रोत्तम। आपण केले हस्तपाद भग्न। तो तुमचा अन्यायी उत्तम। आम्हालागी आपण ओपावा।।९२।। मग चौरंगी स्कंधी वाहून। मार्ग गमितसे गौरीनंदन। मग ग्राम पाहून निघून। बद्रिकाश्रमी ते पातले।।९३।। काननी हिंडता तेथ पाही। तो एक गव्हर देखिले महीं। म्हणती चौरंगी निश्चय जो ही। येथेची कसून पहावा।।९४।। मग ठेवूनी चौरंगी गुहागृहांत। ऊर्ध्व दृष्टी करी म्हणती त्यास। शिळा सुटके उपरी दिसे त्यास। म्हणती ठेवी दृष्टी शिळेवरी।।९५।। जरी दृष्टी किंचित चुकुर। होता शिळा पडेल अंगावर। मग प्राण सोडून जाईल शरीर। चूर्ण होशील रांगोळी।।९६।। आणिक एक सांगणे तूते। दृष्टी रक्षावी जीवित्वानिमित्ते। मंत्र जपावा तपो अर्थे। फळे भक्षावी क्षुधेसी।।९७।। तो म्हणे मंत्ररुपे स्मरणशक्ती। आबुध्द करील माझी मती। सांडोनी मग तो फलप्राप्ती। योगाहूनी लक्षीतसे।।९८।। झाला तयाचा देह काष्ठासमान। बोल राहिले चलनवलनरहीत। बळ तान्हे असे पाहून। वारुळ वरी

रचियेले।।९९।। ऐसे परी चौरंगीते। झाले आहे निज देहाते। यावरील अर्थ पुढील स्वार्थे। पुढील अध्यायी ऐकावे की।।१००।।

आरोग्य हे मौलिक रत्न करी जीव संधान। अंतरबहिर्मल नासवती देहास करती मलीन। करिता पठन हा अध्याय मलाचे करतील शोधन। बनवतील देह निर्भय करुनी या देहाचे धावन। नवनाथ बनुनी भेषज देहास या भेदतील। पचवूनी ते बहिर्मल देह सुदृढ करतील। हे नवसिध्दिंचे मालक भेदिती अंतर्मन। करतील शुध्द मनास त्याचा अंतर्मल शोषून। नवसिध्दिंचे मालक जणू आई या भक्तांची। प्रसन्न ते होता मग भक्तास चिंता कशाची।

।श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

।। श्री ।।

## ।।अध्याय आठवा ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री नवनाथाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

हे रुख्मिणीवरा जगदीश्वरा। दीनबंधो दयासागरा। भक्तिअमृत हा ग्रंथ चालवावया। देई मती या समर्थभक्ता ।।१।। तपाकारण बैसवूनी चौरंगी। गोरक्ष मच्छिंद्र पोचले गिरनार गिरी। अत्रिसुत तया उभयता विलोकी। आनंदे कवळी मच्छिंद्राते।।२।। मग नाना तीर्थगमनादि योगसंयोग। सुख दुःखादि सकल प्रयोग। एकमेका निवेदोनी विचार प्रसंग। षण्मास तेथेची राहिले।।३।। मग गोरक्ष म्हणे दत्ताकारण। दूर करण्या जगाचे अज्ञानपण। हेच आमुचे जीवन निमित्तकारण। तरी द्यावी आज्ञा आम्हाला।।४।। ऐसे वचन परिसुन होई संतुष्ट। अत्रिसुत जाणूनी पुढील भविष्य मात। बोळविता झाला उभयांकारण। उभय पर्वततळी पातले।।५।। मार्ग धरिता काशीपुरी। पातले ते प्रयागस्थानी। तेथे नृपनाथ त्रिविक्रम नामी। धर्मप्राज्ञी नांदतसे।।६।। एके दिनी त्रिविक्रम नृपभारती। तयाची भरली आयुष्यभरती। होऊन तप्त शरीरी पाहून वृत्ती। परलोकगमन

त्याचे झाले।।७।। तयाची रेवती नामी ललना। अट्टहासे करी शोकरुदना। तेची रीती इतर प्रजाजना। दु:खप्रवाह लोटला असे।।८।। पाहून ते गोरक्ष म्हणे धन्य पुरुष। परम दु:ख जाहले प्रजाजनास। म्हणे परत देहगत करावा नृप। विचार ऐसा करितसे।।९।। परी राव नुरलासे जीवितपणी। मिळाला ऐक्यें ब्रह्मचैतन्यी। ऐसे देखता अजीवितपणी। उपाय उभय हरले ते।।१०।। गोरक्ष मच्छिंद्र पातले शिवालयात। तोच वाहून स्कंधी रायाचे प्रेत। करावया तयाचा प्रेतसंस्कार। सकल प्रजाजन तेथ आले।।११।। पाहुनिया जनशोक गोरक्षनाथ। म्हणे ऐशा नृपा उठवावे मच्छिंद्रनाथ। आपण जर न उठवाल यास। मीच उठवीन नृपालागी।।१२।। वदे मच्छिंद्र मीच याचे देहस्थित। होतो रक्षाया तुझा हेत। परी बा माझ्या शरीरास। द्वादशवर्षे सांभाळी।।१३।। ऐसे बोलोनी मच्छिंद्रनाथ। शीघ्र सोडोनी स्वशरीरास। करी प्रवेश राय शरीरात। उठोनी बैसला राज देही।।१४।। येरीकडे शिवालयी गोरक्षनाथ। वृत्त निवेदी शैव गुरुविणीस। ती वदे ठेवू प्रेत गुहा गृहांत। द्वादशवर्षे सांभाळीन मी।।१५।। येरीकडे मच्छिंद्रास होई वहीवाट। माहिती समान तो वर्ते पाठ। चतुर्थ प्रहरी शिव मंदिरी येत। गोरक्षा संपादणी पूसतसे।।१६।। मग त्याने सांगून संपादणीसी। म्हणे जातो आम्ही तीर्थाटनासी। आपण दृष्टि ठेवोनी स्वहितासी। स्वशरीरासी रक्षावे जी।।१७।। ऐसे लोटले वर्षमास। कांता रेवती प्रसूत होत। तेजस्वी बाळ पडता दृष्टीस। हृष्टतनु ती जाहली।।१८।।

तयासी लोटता द्वादश दिवस। पुत्रनाम ठेविले धर्मनाथ। ऐसेची लोटता पाच वर्ष। शिवालयी रेवती येतसे ।।१९।। मग शिवासी भक्तिभावे पूजुनी। म्हणे सुवासिनीत्व असावे मजलागुनी। ऐकून गदगदां हांसे शैवराणी। रेवती तिजसी कारण पूसे।।२०।। तिये कडून कळता वृत्तांत। होई अस्वस्थ ती चित्तात। वदे बारावर्षे उपरांत। नाथ सेवतील स्वशरीरा।।२१।। रेवती येऊनी निशा समयासी। रती रती छेदी मच्छिंद्र शरीरासी। वनांतरी विखरून मांस शरीरासी। निघून जाई ती स्वसदनी।।२२।। कैलासी उमा म्हणे शिवासी। रेवती विध्वंसीले मच्छिंद्र देहासी। ऐकून शिव वदे अंबेसी। शरीर वेचून रक्षावे सकळ।।२३।। कैलासगिरी शिवगण बहुत। त्यात वीरभद्र मम सुत। तया हाती ओपोनी समस्त प्रेत। रक्षण दृढ करण्या सांगावे ।।२४।। चामुंडा यक्षिणी झाल्या स्वर्गस्थित। कैलासी वीरभद्रास त्या निवेदीत। आपला शत्रु मरण पावला अवचट। देहाचे भाग आणीले आम्ही।।२५।। परी या मच्छिंद्राचा शिष्य गोरक्ष। तो परम प्रतापवंत दक्ष। तो जिंकुन नेईल शरीर प्रत्यक्ष। तरी आपण सावध असावे।।२६।। येरीकडे त्रिविक्रम देहात। प्रतापशील जो मच्छिंद्रनाथ। नित्य येऊनी शिवालयात। गुहागृही लक्षीतसे।।२७।। भोगी नित्य राजविलास। लोटूनी गेली वर्ष द्वादश। तो येरीकडे तीर्थाटनास। गोरक्ष सावध झाला असे।।२८।। नाना तीर्थे भ्रमण करीत गोरक्ष। पोचला गोदातटी भामानगरात। जाहला तो परम क्षुधा पिडीत। अकस्मात शेत तयाने देखिले।।२९।।

तेथे कृषीवल माणिका नामी। माध्यान्ह समय तो साधुनी। पात्री अन्ने घेऊन वाढोनी। भोजनाते तो बैसला ।।३०।। तयाते म्हणे गोरक्ष क्षुधाग्रस्त। आम्ही जाहलो तृषाकांत। म्हणूनी आलो होओनी अतिथ। तरी भिक्षा आम्हा ओपावी।।३१।। ऐशी ऐकता तयाची वाणी। म्हणे आपण आहा योगेंद्रमुनी। वाढीले हे पात्र भक्षुनी। परम संतुष्ट होआवे की।।३२।। मग हस्तपाद प्रक्षाळुन। अन्न पात्र ते पुढे घेऊन। जठराहुती मग देऊन। परम संतुष्ट जाहले।।३३।। गोरक्ष म्हणे तुवा दिले अन्न। तेणे मम चित्त जाहले प्रसन्न। तरी तव देही किंचितपण। सत्य असेल वद माते।।३४।। कृषीवल म्हणे महीपाठी। तुम्हीच हिंडता भिकेसाठी। ते तुम्ही मोह धरुनी पोटी। माते काय द्याल जी।।३५।। माणिक म्हणे गोरक्षा लागुन। काय आहे तुम्हा स्वाधीन। तरी आणिक काही तुजकारण। लागत असेल ते मागावे।।३६।। गोरक्ष म्हणे तू म्हणशी देऊ देणे। तरी त्वा स्वचित्ता सांभाळणे। तव मन इच्छील ते न करणे। हेच मागणे आहे मम।।३७।। वदून ऐसे गोरक्ष निघत। बद्रिकेदारा नमुन त्वरीत। पाहू चालला चौरंगीनाथ। तया स्थळी गोरक्ष आला।।३८।। त्वरीत दाराची शिळा काढून। पाहे तयाचे शरीरा कारण। तो वारुळ गेले वेष्टून। सर्व अंगी तयाच्या ।।३९।। मग शरीराचे वारुळ काढून। तयाते मग सावध करुन। हस्तपाद फुटले तया तपाकारण। कवळुनी बाह्यात्कारी आणले त्या।।४०।। गोरक्षे कृपे करीता अवलोकन। शरीरशक्ती आली दारूण। मग तो

उठून वंदी गोरक्ष चरण। म्हणे सनाथ झालो मी।।४१।। गोरक्ष परम चित्ती कृपा वेष्टुनी। मौळी ठेवला वरदपाणि। अनुग्रह पूर्ण पुन्हा देवूनी। ब्रह्मसनातन केला असे।।४२।। मग चौरंगीसी शिवा भेटवून। मग षण्मास तेथेची राहून। सकल दैवते तुष्ट करून। तपोबले तया केले सघन।।४३।। मग चौरंगीसह वैदर्भदेशी येऊन। तयासी कौडिण्यपूर दावित। म्हणे बा येथ तव माता तात। भेट घेई तू तयांची।।४४।। येरीकडे रायासी कळता वृत्त। येई ग्रामाबाहेर तो कटकासह। वातास्त्रे गोरक्ष सर्वा दावी गगन। सकल त्या स्तविती दीनवाणी।।४५।। राये पाचारिता बोले चौरंगीनाथ। आम्ही न येऊं तव गृहात। मग सापत्न मातुश्रीचा वृत्तांत। चौरंगीने त्यास निवेदीला।।४६।। तापे कोपला राय मनी। मग पत्नीते तो ताडन करी। मग राया त्या शांत करुनी। गोरक्ष आशीर्वचन देतसे।।४७।। मग चौरंगीसह चालला मुक्काम। पहाते झाले ते प्रयाग स्थान। स्नान करून घेऊन शिवदर्शन। पुजारीणीस वृत्त पूसतसे।।४८।। तिने कथिला घडिला वृत्तांत। राज्ञीने केला असे देह नष्ट। गोरक्ष म्हणे कोणेतरी ठाया लागून। मच्छिंद्र देह असेल की।।४९।। गोरक्षे देहाचा शोध घेत। तो चामुंडा शिवगणी समुदायांत। अस्थि त्वचा मांस देखे समस्त। गोरक्ष मही परतला।।५०।। मग उभय भस्म झोळी सिध्द करुन। विविधास्त्रै त्यै प्रेरुन। मार्गावरी स्यंदनी अर्क अडवून। आदित्य मार्ग रोखिला।।५१।। त्यास म्हणती वीरभद्रा नीती सांगावी। तैसी आदित्य करी शिष्टाई। परी

मच्छिंद्र देह मिळणार नाही। वीरभद्र त्यास सांगतसे।।५२।। माजले मग तुंबळ युध्द। गोरक्ष चौरंगी विविधास्त्रे प्रेरीत। जपिता त्यांनी संजीवनी मंत्र। राक्षस जीवंत उठले।।५३।। श्रीरंग सोडूनी वैकुण्ठासी। येते झाले गोरक्षापासी। म्हणती बा विपरीत महीसी। पुत्रा हे काय मांडले।।५४।। तरी आता कृपा करुन। अदृश्य करी दानवांकारण। येरी म्हणे गुरुशवा आणून। द्यावे आधी मजलागी।।५५।। मग शिवे बोलावूनी चामुंडेसी। मच्छिंद्र शवाते आणले महीसी। म्हणे बा घेई आणि राक्षसांशी। शांत दृष्टी दावी का।।५६।। असो वीरभद्र आणि दानव समस्त। रणी निमाले प्रतापवंत। त्यावरी गोरक्षे जल्पूनी अग्निअस्त्र। सकल केले भस्म तेणें।।५७।। वीरभद्र निमाल्या उमाकांत। मुख तयाचे झाले म्लान। काही न बोले बैसे जटा वेष्टून। पुत्रमोहे तो स्फुंदतसे।।५८।। गोरक्ष म्हणे वीरभद्राते उठवीन। परी अस्थि आणाव्या ओळखून। येथे राक्षसांचे झाले क्रंदन। राक्षस अस्थी मिरवीती।।५९।। आणितो ऐसे वदे शंकर। रणभूमीत तो करी संचार। मग तेथे अस्थी उचलोनी सत्वर। कर्णी आपुल्या लावतसे।।६०।। अस्थी शिव शिव शब्द करीत। परीक्षुन शंकर गोळा करीत। मग जेथे होता गोरक्षनंदन। तेथे अस्थी आणून ठेवल्या।।६१।। गोरक्षे करता संजीवनी प्रयोग। वीरभद्र उठला देह धरुन। म्हणे माझे धनुष्यबाण। कोठे आहे सांग की।।६२।। शिवाने हृदयी कवळुनी त्यास। सांगितला सकळ वृत्तांत। उपरी त्यास म्हणे उमाकांत। स्नेह नाथी धरावा।।६३।।

मग सकल समुदाय एक करुन। जाते झाले गोरक्ष नमून। येरीकडे राव त्रिविक्रम। राज्यवैभवी गुंतलासे ।।६४।। गोरक्ष भेटे राव त्रिविक्रमास। रायासी कथिला शववृत्तांत। ऐकोनी अती तळमळ चित्तात। मच्छिंद्राच्या होतसे।।६५।। मग पाहूनी उत्तम दिन। महीचे राव घेतले बोलावून। राज्यपदी स्वहस्ते अभिषेक करुन। पुत्र धर्मराज स्थापिला।।६६।। यासही लोटला एक मास। राव त्रिविक्रम आपुल्या मंदिरी खास। देह सांडूनी शिवालयास। तत्क्षणी पातला।।६७।। मग करुनी रायाचे प्रेतदहन। स्नाना गेले सकळ जन। परी धर्मराज दारुण। शोक करी अद्‌भूत पै।।६८।। रेवती म्हणे तव मच्छिंद्र पिता। आणि प्रवेशादि सकळ वार्ता। सांगती झाली निजसुता। धर्मराया संतुष्ट जाहला।।६९।। मग मच्छिंद्र आणि गोरक्ष। येऊन पोचले धामा नगरात। माणिक कृषीवलाचे स्मरण। गोरक्षाते जाहले।।७०।। गोरक्ष जाणून तयाचा नेम। म्हणे वाटे व्हावे गुरु आपण। येरी म्हणे मज गुरू करीशी। तर तूच हो गुरु मजशी।।७१।। कर्ण लागता गोरक्षाननी। सज्ञानमंत्र ब्रह्मखाणी। परमकृपे कर्णी फुंकोनी। मच्छिंद्राप्रत आणले त्या।।७२।। येरीकडे धर्मनाथे। राज्यी स्थापला त्रिविक्रम सुत। मग माघ द्वितीयेस गोरक्षे। अनुग्रह धर्मनाथास दिला ।।७३।। येरीकडे रेवातीरी तेही रेवेत। विधिरेत पडले अकस्मात। चमस नारायण संचार करुनी त्यात। देहद्वारी मिरविला।।७४।। तव कृषी नाम सहनसारुक। पातला तेथे अकस्मात। उचलोनी बाळ अति

सुकुमार। कांतेस आणून देतसे।।७५।। परमप्रीतीने त्या उभयतांनी। सांभाळीला रेवण नाम देऊनी। ऐसी द्वादशवर्षे गेली। पित्याहून आगळा तो दिसे।।७६।। एके दिनी वृषभामागे रेवणनाथ। जाता सामोरा आला अत्रिसुत। पाहुनी त्या वृषभ पळत। रेवणावरी दत्त आदळला।।७७।। दत्तात्रये कृपे मौळी ठेवला कर। परी अनुग्रहाचे केले अंतर। तयासी घडले नव्हते भक्तिश्रम। सिध्दिची एक कला दिधली।।७८।। तेवी प्रत्यक्ष नाथ रेवण। भुलला सिध्दिप्रकरणे करुन। सिध्दि बुध्दी अत्रिनंदन। हातीचा सोडला नायके।।७९।। आरंभिले मंत्रप्रयोगे गायन। दत्तमहिमा ऐसे म्हणून। सहज बोले प्रयोगा कारण। महिमा सिध्दी प्रकट झाली।।८०।। सिध्दी म्हणे मग तयासी। कामना कोणती असे तुजसी। पाहुनी प्रत्यक्ष सिध्दीसी। परम तोषला रेवणनाथ।।८१।। म्हणे निधान असता आपुले हाती। दैन्य भोगावे कवणार्थी। कनकवटे भरुन सदनासी। संतुष्ट करी तो पित्याला।।८२।। मग रेवण ब्रह्मसुत। काय करीतसे नित्यानित्य। बुंधल ग्राम थोर अत्यंत। मार्गावरी नांदतसे।।८३।। तै पांथस्थ येता मुक्कामासी। पाचारुनी नेतसे सदनासी। कामनेसमान आहारासी। अन्न देतसे नित्यशा।।८४।। रोगभोगादि मनुष्ये येती। सर्व दुःखाची पावूनी शांती। धन्य म्हणून गृहास जाती। यशकीर्ती वर्णित पै।।८५।। मग जगात होऊनी प्रसिध्द। सर्वत्र म्हणती हा सिध्द। देशविदेशी जनांचे वृंद। रेवणसिध्द म्हणती त्यासी।।८६।। एके दिनी ग्रामी आला मच्छिंद्र।करी श्रीगुरुचिंतन धर्मशाळेत।

तो त्या गावचे काही जन। म्हणती रेवणसिध्दा भेटावे।।८७।। ऐसे ऐकता मच्छिंद्रनाथ। जाऊनी पाहे अंतरी गुप्त। दृष्टी देखता म्हणे चित्तात। अवतार असे हा चमस।।८८।। मग मच्छिंद्रे पक्षिकुळ पाचारून। घालिता झाला इच्छाभोजन। वनचरांसी ही तैसे पाचारून। ग्रास स्वहस्ते देतसे।।८९।। जन रेवणसिध्दा सांगती। धर्मशाळेत उतरला एक जती। पक्षीश्वापदें कोट्यानुकोटी। तयापाशी येताती।।९०।। ऐकून रेवण आला स्वसदनी। मग सिध्दिते प्रत्यक्ष करुनी। म्हणे पक्षीकुळ वनचराते तोषवी। अशक्य ब्रह्मवेत्त्यावाचूनी ती म्हणे।।९१।। मग म्हणे आता श्लाघ्यवंत। आधी व्हावे आपण ब्रह्मव्यक्त। त्यावरी बोले रेवणनाथ। ब्रह्मवेत्ता करी माते।।९२।। येरी म्हणे चातुर्यखाणी। अत्रिनंदन तुझा स्वामी। त्याते स्तवोनी उगमी। साध्य करुन घेई की।।९३।। सिध्दिचे ऐसे ऐकून वचन। मग सर्व भोग त्याग करुन। जयाठायी भेटला होता दत्त। जावोनी तेथे बैसला।।९४।। ऐकोनी असे त्याचा गुरु दत्त। मच्छिंद्र गिरनार पर्वती येत। कथन करी अत्रिसुतास। वृत्त रेवणसिध्दाचे।।९५।। मग अत्रिसुत अन् मच्छिंद्रनाथ। व्यान अस्त्र प्रेरुनी तेथ येत। पाहती अस्थिमय रेवणनाथ। वाट पाहे दत्ताची।।९६।। मग तयासी वर देऊनी। जाते झाले स्वस्थानासी। येई रेवण विठग्राम माणदेशी। सरस्वती जाह्नविक तेथ नांदती।।९७।। तयांची सहा अपत्ये काळे कवळली। आता सातवे ही प्राणसोडी। मग रेवणनाथे झगडूनी मृत्युसी। मागी तो सात बाळे।।९८।। मृत्यु वदे आला

जरी कोपोन। तरी मी काय हीनदीन। क्षयकर्ता प्रत्यक्ष उमारमण। तयापाशी आपण जावे।।९९।। यमराज बोल ऐकोनी। उठता झाला मग तेथोनी। व्यान अस्त्र मुखी स्तवोनी। कैलासाते पातला।।१००।।

सुख आनंद ओसंडूनी वाहती या जीवनात। नाशविती ते पाझर जारण मारणादि कर्म। परयंत्रादि कर्म करती जीवन हे दुर्धर। पाडिती जीवनी दुःखाचे सावट ते घोर। परि करिता अध्याय पठन होईल परयंत्रादिंची माघार। नवसिध्दिंचे हे मालक देती भक्तांसी आधार। पाजूनी अमृताचे बिंदू करती संजीवन। असे हे नवनाथ करती भक्तजीवाचे पालन।

।श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

।। श्री ।।

## ।।अध्याय नववा।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री नवनाथाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

जयजयाजी भक्ततारका। मम दैवता ज्ञानार्का। नरहरि नामें पुण्यश्लोका। गणेशाहस्ते ग्रंथ पुढे चालवी।।१।। ग्रामद्वारी येता रेवण। हटकती तया विजयध्वज शिवगण। येरी म्हणे मी रेवणनाथ। भवभेटीतें आलो असे।।२।। कार्य पुसता वदे रेवण। शिवाने चोरीला विप्रतनय। तरी तयासी शिक्षा करुन। जाईन घेऊन विप्रनंदन।।३।। ऐकून समस्त शिवगण क्षोभले। येणे त्यांवरी स्पर्शास्त्र प्रेरीले। त्या सर्वा महीपाठी खिळविले। पाहून इतर गण शिवाप्रती आले।।४।। शिवाज्ञे धावले अष्टभैरव। रेवणनाथ मनी म्हणे कासया युध्द। एकची अस्त्र प्रतापवंत। शिवालागी प्रेरावे।।५।। जल्पून तयाने वाताकर्षण अस्त्र। शिवासीच पाडीले महीवर। तयाचे अष्टगणही सर्व। पडले जर्जर होऊन।।६।। गंधर्वे विष्णुस केले निवेदन। परम अवस्थेसी त्या ऐकून। मग परम तातडी करोन। कमलापती

धाविन्नला।।७।। त्यास वदे रक्षिणे असेल प्राण। तरी सप्तबाळे द्या आणोन। ऐसे नाथ बोले वचन। विष्णू त्याते बोलतसे।।८।। सप्तबाळे जीवदशा व्यक्त। तुम्हासी करतो हस्तगत। देह तुम्ही करा निर्माण। नाथे बाळे जीवित केली।।९।। असो पूर्वी सरस्वती उद्देशेकरुन। ब्रह्मवीर्य गृहातें पडले खचोन। सर्पिणी मस्तकी अकस्मात येवोन। आदळले ते समयी।।१०।। पद्मिणी सर्पिणी अंडे प्रसवित। वटवृक्ष पोखरी अंडे राहीले तसेच। आविर्होत्र नारायण त्यात। ईश्वरसत्ते संचरला।।११।। बाळ अट्टाहासे करी रुदन। तै पातला कोशधर्म नाम ब्राह्मण। सुरवर स्वर्गीचे तया बोलत। बालका नेऊन संगोपन करी।।१२।। जाहला पद्मिणी नागिणी पोटी। रक्षिला गेला वटतरु तळवटी। सिध्द होईल पुढे भविष्यापोटी। वटसिध्द नागनाथ नाम याचे।।१३।। कोशधर्मे बाळ उचलीले प्रेमे। आपुले धाम सेविले आनंदे। बाळा पत्नी सुरादेवीस दाविलें। केले सर्व वृत्तांत कथन।।१४।। बाळ वाढीला त्या द्विज घरात। केले तयाचे मौंजी बंधन। बाळ नित्य खेळे मनोहर। अर्क जेवी दुसरा।।१५।। खेळत असता भागीरथी तटी। मुलांस गड्या म्हणून बैसवी पंक्ती। लटिकेच अन्न वाढून तयांसी। रसाळ वाणीने तोषवितसे।।१६।। पाहुन तयांचा हा खेळ। अत्रिसुत स्वतः होऊनी मूल। तयासी सिध्दी अर्पून। म्हणती कृपासिध्द होईल की।।१७।। कृपासिध्दी तया झाली प्राप्त। बालकांसी नित्य अन्न

सेववीत। ऐकून हे सारे तयाचे तात। काय घडले हे पुसती।।१८।। ऐकून तात म्हणे दत्तात्रेय मुनी। त्रय देवांचा अवतार भुवनी। सुफळ प्रारब्धे गेला भेटोनी। तुजलागी पाडसा।।१९।। मग बाळ कोल्हापूरी संचरोन। पूसे कोठे आहे अत्रिनंदन। जन वदती येती ते भिक्षेकारण। कळेना परी कवण्यारुपी।।२०।। यावरी येऊनी लक्ष्मीदेवळी। भेटून म्हणे तेथील पुजाऱ्यांसी। ग्राम भोजन घालावे ऐसे मनी। म्हणे तो 'बरे आहे'।।२१।। अन्न संतर्पण सुरु होत। राव रंक सकल होती तृप्त। अत्रिसुत जेव्हा भिक्षेस जात। वदती त्या जेवावे अन्नछत्री।।२२।। तव अत्रिसुत योगकारण। देखता ओळखी सिध्दि अन्न। पूसे कोण करी हे संतर्पण। वदती वटसिध्द नागनाथ जी।।२३।। अत्रिसुताचा असे एक नेम। भिक्षारहीत न सेवावे अन्न। तो मागून घेऊन शुष्कान्न। काशीक्षेत्री भोजन सारीतसे।।२४।। नागनाथ मग म्हणे जनास। कोरडे अन्न न्या गृहांत। करा तयासी मम नाम श्रुत। भिक्षा न घेतल्या सांगा मज।।२५।। तो दत्तात्रेय अत्रिसुत। आले भिक्षेसी अकस्मात। वाढतो म्हणती नागनाथाचे अन्न। मागे पाय घेई अत्रिसुत।।२६।। नाथासी लगबगे कळवले वृत्त। शीघ्र चपळत्वे तो धावत। श्रद्धया जाई अत्रिसुता निकट। चरणी माथा ठेवीतसे।।२७।। अत्रिसुत मग परीक्षुन पहात। म्हणती तापें तापला नाथ। मग मस्तकाखाली घालून हस्त। उठविले तया महाराजे।।२८।। मग कृपे मौळी हस्त ठेवून। केला तयासी ब्रह्म परायण।

अपरंपार तयाचे अज्ञानपण। मूळा पासोनी नाशिले।।२९।। मग उभय काशीक्षेत्री जात। तेथूनी बद्रिकेदार वाट। मंत्र प्रयोगी बद्रिकाश्रमास। क्षणात जाऊन पोचले।।३०।। उमा रमणाज्ञे अनुसुया सुत। तयासी सद्‌विद्या अभ्यासित। सांगुनी सकळ अस्त्र विद्येप्रत। तपालागी त्या बैसविले।।३१।। द्वादश वर्षे होता तप। अत्रिसुत नागनाथा बोळवीत। म्हणे बा रे महीचे तीर्थ। सांगोपांग पूर्ण करी।।३२।। ऐसे करता तीर्थाटन। पातला तो स्वग्राम। द्वारी उभे करुन जन। ध्यानादि तो करीतसे।।३३।। जाणुनी हे मग मच्छिंद्रनाथ। स्वअस्त्रादि युक्त युध्द करीत। दत्तात्रेय शिष्य तो हे जाणत। वदे मी दत्तानुग्रही मच्छिंद्र।।३४।। मुक्तद्वार ठेवी तया उपदेशून। मच्छिंद्र जाई तीर्थाकारण। मग दर्शना येती अपार जन। दु:ख तयांचे निवटीतसे।।३५।। उठविली मृत्युतूनी शिष्य पत्नी। मृत्यु होता जन धावती तयाप्रती। उठवी तयांसी मृत्युतूनी। नागनाथ त्या सदना धाडीतसे।।३६।। संकट पडले यमधर्मास। सांगे विधिसी सत्यलोकात। विधी येऊन मग नाथाप्रत। राहवीले त्या कर्मा।।३७।। मग नागनाथ नवसिध्दांमाझारी। विद्या ओपी कवित्व साबरी। देव जिंकोनी ते सत्वरी। विद्यावरु ते मिरविले।।३८।। एक कोटी एक लक्ष। नागनाथाची विद्या प्रत्यक्ष। परोपकारी सौम्य दक्ष। पीडाकारक ती नव्हती।।३९।। असो एकदा विधिचे रेत। जाऊन पडीले कुशवेष्टित। देह वाढला तेथ सबळवंत। पिप्पलायन तत्र संचरले।।४०।।

सत्यश्रवा विप्र ते बाळ पाहत। परी तो बाळा हात न लावीत। तै मुनी नारद वदे त्यास। सदनास नेऊन पाळीयास।।४१।। ऐक हे बाळक ब्रह्म ठेलें। पिप्पलायन नारायण जन्मले। ऐकून हे सुरवरांचे बोलणे। बाळ घेऊन तो सदनी आला।।४२।। देऊन बालक निजपत्नी हाती। 'चरपट' याचे नाम सुरवर वदती। मग त्यासी तेच नाम स्थापिती। बाळ वाढू लागले।।४३।। आदिनाथास वृत्त झाले श्रुत। तो दत्तात्रेयासी वदत। नवनाथातील पिप्पलायन। अवतार मिरवीती चर्पट म्हणून।।४४।। तयास विद्या स्थापावी आपण। ऐकून उमारमणाचे वचन। दत्त म्हणे पश्चातापाविण। हित प्राप्ती मिळेना।।४५।। तैसाठी नारदमुनी आपण। एक लहान विद्यार्थी होऊन। सेविले तयाने विप्र सदन। कुलंब म्हणूनी राहीला।।४६।। एके दिनी ग्रामीचा यजमान। करण्यास घरी ओटी भरण। पाचारण्या आला विप्रसदन। विप्राने चर्पटीस धाडीले।।४७।। परी होता मंगल ओटी भरण। कुलंब चर्पटीचे कान फुंकून। लाविता जाहला तो भांडण। यजमानासवे चर्पटीचे।।४८।। वृत्तांत ऐकून क्षोभला विप्र। धावूनी मग तो स्थान सेवत। चर्पटी मुखावरी केले ताडन। चर्पटी मनी परम क्षोभला।।४९।। चर्पटीने मग त्यागिले स्वसदन। येई जेथ असे भगवती मंदिर। मग कुलंब वेषी नारद येऊन। तयासह तो ग्रामाबाहेर आला।।५०।। मार्गी करुन भिक्षाटन। पाहते झाले बद्रिकाश्रम। नमिती उभय श्रीकेदार समर्थ। तोच प्रगटले मच्छिंद्र

दत्त।।५१।। उभये तयांसी भावे नमित। मग चर्पटीनाथ तयासी पूसत। कोणता गुरु पाहू येथ। नारदे दत्तात्रयाते सोपविला।।५२।। मग अत्रिसुते ठेविला वरदहस्त। ब्रह्म दर्शन झाले खुणा व्यक्त। अत्रिसुत अभ्यासित मंत्र सकलशास्त्र। विद्यावंत केले चर्पटीनाथा।।५३।। गिरनार सेवी श्रीगुरु अत्रिसुत। चर्पटनाथ निघे तीर्थाटनास। श्रीरामेश्वर गोकर्ण जगन्नाथ। तीर्थे करीत चालला।।५४।। तीर्थे करिता अपरिमित। सच्छिष्य नव झाले त्यांत। ते नव शिष्य प्रख्यात वंत। सिध्दकला जाणताती।।५५।। राघवसिध्द बाळसिध्द। गोकाट सिद्‌ध जांबु सिध्द। नैमित्तिक सारेंद्रक हुक्ष प्रसिध्द। द्वार भैरव रणसिध्द तो।।५६।। ऐसे चर्पटाचे नवसिध्द वर्ण। शाबरी विद्येंत असती पूर्ण। चौऱ्यांशी सिध्द नवांपासून। उदयवंत ते पावले।।५७।। महीचे सकळ जाहले तीर्थ। मग बद्रिकाश्रमी नमुन उमारमण। मग जपुन आदित्यादि मंत्र। सत्यलोकात तो पोचला।।५८।। तेथे तो चतुरानना वंदित। म्हणे कोण आला सिध्दमंत्र। नारदे केले त्याचे जन्म कथन। विधी अतिशय आनंदला।।५९।। चर्पटीस पुसता कामना कोण। म्हणे मनकर्णिका भोगावती स्नान। विधी म्हणे जाऊ पर्वणीस स्नानास। एक संवत्सर रहा येथे।।६०।। पूर्वी नारद जातसे अमरपुरासी। तो सहस्राक्ष देखता त्यासी। कळीनारद ऐसे म्हणे नारदासी। नारद परम क्षोभला।।६१।। सांप्रत चर्पट आणि नारदमुनी। वर्तती एकचित्ते खेळणी। चैन न पडे

एकमेकावाचूनी। एकमेका क्षणार्ध।।६२।। बंधुसी नारद वदे एक दिनी। जाऊ अमरकुसुम वाटिका श्रमी। मग गमनकळे घेऊन तयासी। कुसुमवाटिकेत नारद आला।।६३।। मग नारद अन् चर्पटनाथ। मन मानिल्या फळे भक्षित। गंध प्रवाही कुसुमे तोडीत। ब्रह्मदेवा आणून देती।।६४।। हे पाहून रक्षक पाळतीवरती। गुप्त बैसती अन्य क्षेत्री। चरपट जाता फळे तोडण्यासी । चरपटातें त्यांनी धरियेले।।६५।। चरपट कवळे भस्मचिमुटी। वातकर्षण जल्पे होटीं। तेणे करुन बनकर थाटी। व्याप्त झाले सकळीक।।६६।। आणिक बनकर पाहून स्थिती। येऊन म्हणती महाराजा नृपती। एक जोगी अर्कस्थिती। आला असे महाराजा।।६७।। मग इंद्रे प्रेषिला सुरवरमेळ। चर्पटी जल्पतसे वाताकर्षण। देवांची गात्रे झाली शवसमान। देव निमाले हेर सांगती।।६८।। मग निघे स्वतः पाकशासन। हेर म्हणती जाईल प्राण। तरी दशकराते सहाय्य करुन। येथे आणावा महाराजा।।६९।। वार्ता ऐकता शिवशंकर। गणांसह येत तेथे सत्वर। विष्णुस ससैन्य करी पाचारण। सकल तेथे पातले।।७०।। चर्पटी सिध्द करुनी वचन। प्रयोगी अस्त्र वाताकर्षण। शिवासह देव झाले विगलीत। महीवरी ते पडले।।७१।। शिवगण जे शिवासहित। देवांसह अमरनाथ। परम पाहुन अवस्थित। विष्णु मनी क्षोभला।।७२।। निघाला घेऊन सुदर्शन। गांडीव सजविले लेवोन। इतके चर्पटनाथे लक्षुन। मोहनास्त्र

तो प्रेरीतसे।।७३।। वाताकर्षण प्रयोग नेटी। क्षणी फेकिता भस्मचिमुटी। तेणे सर्वांचे विष्णु कटकी। श्वासोच्छवास दाटले।।७४।। मग चर्पटी घेऊन कौस्तुभमणी। सुदर्शन वैजयंती आदी घेऊनी। गमनाचा मंत्र चिंतुन मनी। सत्यलोकी तो आला।।७५।। ऐसे त्या सचिन्ही पाहता विधी। परम दचकला विशाळ बुद्धी। पुसे चिन्हे कोठून आणली। वृत्तांत कथन करी चर्पट।।७६।। मग त्यासी म्हणे अमरनाथ। आजा तुझा विष्णु निश्चित। महादेव तो आराध्य दैवत। या वाचून जीवित्व न चाले।।७७।। मग चर्पटी वातप्रेरक जल्पून। सावध केले सकळ देवजन। चरपट अवतार पिप्पलायान। सर्व देवालागी समजला।।७८।। सहस्त्र नयन समजुनी स्वचित्तात। कळीचे नारद कदा न म्हणत। पर्वणी पावली मणिकर्णिकेत। चर्पटीनाथा विधी नेतसे।।७९।। मग करुन भोगावती स्नान। सप्त पाताळ दृष्टि पाहून। बळी अन् वामना वंदन करुन। चर्पटी इच्छा पूर्ण करी।।८०।। असो इंद्र म्हणे वाताकर्षण विद्यासबळ। देव-दानवही झाले निर्बळ। नाथपंथीचे हे महाबळ। साध्य कैसे करावे की।।८१।। वाचस्पती म्हणती यत्न ऐसा। यज्ञ करावा सोमभासा। यानिमित्ते नाथ राजसा। घेवोनी यावे स्वर्गासी।।८२।। मच्छिंद्र पिता उपरिचर। जाऊनी पाचारील मच्छिंद्रनाथ। आला असता तो अमरपुरीत। गौरवोनी संतुष्ट करावा।।८३।। अवश्य म्हणोनी वसुनाथ। तात्काळ विमानयानी बैसत। येई बद्रिकाश्रमी मच्छिंद्राप्रत।

मच्छिंद्र वंदन करीतसे।।८४।। उपरिचर म्हणे शक्रापोटी।अर्थ उदेला मखकोटी।तरी आपण नवही जेठी। साह्य व्हावे कार्यार्था।।८५।। अवश्य म्हणून जालंदर, कानिफा, चौरंगी। मच्छिंद्र, गोरक्ष, अडबंगी। गोपीचंद रायादि अन्य जोगी। विमानातून अमरपुरी पोचले।।८६।। मग वाचस्पती आणि मच्छिंद्रनाथ। म्हणती सुरवर पाळा ऐक मात। सिंहल द्विपी स्थान अद्‌भूत। यज्ञ तेथे करावा।।८७।। दंपत्य बैसोनी सहस्रनयन। मंत्र प्रयोगी बृहस्पती आपण। यज्ञ आहुती नवही जण। स्वाहा म्हणूनी कुंडी टाकती।।८८।। दहा नाथ यज्ञ आहुती। प्रवाही चाले मच्छिंद्र जती। पुत्रमोह धरुनी चित्ती। अभ्यासाते बैसविला।।८९।। अभ्यास करिता मीननाथ। वाचस्पती शक्रासी बोलत। बैसवी उपरिचर वसु दंपत्यार्थ। अमरपाळ हेतू समजला।।९०।। येरीकडे मच्छिंद्रनाथ। सुतासी विद्या अभ्यासीत। तो समय जाणोनी सापेक्ष। इंद्र मयूर वेषें नटलासे।।९१।। निकट तरु शाखेवरती। विद्या अभ्यासीत गुप्त पंथी। वातास्त्र वाताकर्षणादि जपती। वात प्रेरक अस्त्र त्या लाधले।।९२।।ऐसी विद्या होता सघन।परम हरुषला सहस्रनयन। परि एक संवत्सर होता यज्ञ। अभ्यासीत तव वरी।।९३।। मग मच्छिंद्रास वदे अमरनाथ। माते घडला अन्याय एक। म्या माये धरुन मयूर वेष। अभ्यासिले विद्येते।।९४।। मच्छिंद्र म्हणे इंद्रा तू कृत्रिम। आणिले ठकवावया कारण। तरी चोरुनी घेतले विद्यारत्न। निष्फळ होई तुजलागी

।।९५।।ऐसे बोलता सकळ जती। मग उपरिचर वसु वाचस्पती।गौरवोनी अपार युक्ती। तुष्ट केले चित्तात।।९६।। म्हणती शक्रे द्वादश वर्षे तप आचरता। विद्या फळेल तत्त्वता। परी नाथपंथी छळ न होता। पदरावरी विद्या पडेल।।९७।। शके सत्राशें दहापर्यंत। प्रकटरुपे मिरविले नाथ। मग येऊनी आपुले स्थानांत। गुप्तरुपे राहीले।।९८।। पुढे चौऱ्यांयशी सिध्दांपासुन। नाथपंथ मिरविला अति सामर्थ्याने। येथूनी चरित्र झाले संपूर्ण। सर्व नाथांचे महाराजा।।९९।। नवनाथ भक्तिसार चरित्र पूर्ण। असे रसाळ अमृतपूर्ण। परी वदवावया नवशतीत संपूर्ण। स्वामीच समर्थ असती ते।।१००।।

धर्म अर्थ काम मोक्ष हे चार असती पुरुषार्थ। देतील आधार जीवास नवनाथ करुनी जीवन सार्थ। करिता पठन हा अध्याय भक्ता मिळती राज्यपद। ऐकून लहान थोर सर्व देती मान आणि सुखास्वाद। उजळूनी या जीवनास सुंदर मोहक ते करतील। फुले फुलवूनी सुखाची सुंदर बगीचा बनवतील। देऊनी आधार नवनाथ करतील कनक सुंदर। किमयागिरी दाविती जीवनी हा चमत्कार। करुनी हिरा हे आयुष्य ते झळकवतील। एकाहून एक दुःखाचे सावट मालवतील।

।श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।